कर्नाटक सरकार

# समाज विज्ञान

## भाग - I

## मराठी माध्यम

## (सुधारित)

# 7

## इयत्ता सातवी


कर्नाटक पाठ्यपुस्तक संघ (रजि.)

100 फूट रिंग रोड, बनशंकरी 3 रा टप्पा

बेंगळूरु - 560 085.

# Preface

The Textbook Society, Karnataka, has been engaged in producing new textbooks according to the new syllabi which in turn are designed on NCF - 2005 since June 2010. Textbooks are prepared in 12 languages; seven of them serve as the media of instruction. From Standard 1 to 4 there is the EVS, mathematics and $5^{th}$ to $10^{th}$ there are three core subjects, namely, mathematics, science and social science.

NCF - 2005 has a number of special features and they are:

- connecting knowledge to life activities.
- learning to shift from rote methods.
- enriching the curriculum beyond textbooks.
- learning experiences for the construction of knowledge.
- making examinations flexible and integrating them with classroom experiences.
- caring concerns within the democratic policy of the country.
- making education relevant to the present and future needs.
- softening the subject boundaries-integrated knowledge and the joy of learning.
- the child is the constructor of knowledge.

The new books are produced based on three fundamental approaches namely, Constructive approach, Spiral approach and Intergrated approach.

The learner is encouraged to think, engage in activities, master skills and competencies. The materials presented in these books are integrated with values. The new books are not examination oriented in their nature. On the other hand they help the learner in the all round development of his/her personality, thus help him/her become a healthy member of a healthy society and a productive citizen of this great country, India.

Mathematics is essential in the study of various subjects and in real life. NCF 2005 proposes moving away from complete calculations, construction of a framework of concepts, relate mathematics to real life experiences and cooperative learning. Many students have a maths phobia and in order to help them overcome this phobia, jokes, puzzles, riddles, stories and games have been included in textbooks. Each concept is intoduced through an activity or an interesting story at the primary level. The contributions of great Indian mathematicians are mentioned at appropriate places.

We live in an age of Science and Technology. During the past five decades man has achieved great things and realized his dreams and reached pinnacle of glory. He has produced everything to make life comfortable. In the same way he has given himself to pleasures and reached the stage in which he seems to have forgotten basic sciences. We hope that at least a good number of young learners take to science in higher studies and become leading scientists and contribute their share to the existing stock of knowledge in order to make life prosperous. Ample opportunity has been given to learners to think, read, discuss and learn on their own with very little help from teachers. Learning is expected to be activity centered with the learners doing experiments, assignments and projects.

7th standard Social Science Textbook has been prepared based on the prescribed syllabus. And all the features of NCF 2005 and KCF 2007 have been included in the Text Book. This new Text Book has given importance to enhance the creativity of students by including activities. Many projects are included to help students to gain knowledge. This Text Book has been written in such a way that students need not memorise historical dates and other information.

The Textbook Society expresses grateful thanks to the Chairpersons, Writers, Scrutinisers, Artists, Staff of DIETs and CTEs and the Members of the Editorial Board and Printers in helping the Textbook Society in producing these textbooks.

**Prof. G.S. Mudambadithaya**
Co-ordinator
Curriculum Revision and Textbook Preparation
Karnataka Textbook Society
Bengaluru, Karnataka.

**Nagendra Kumar**
Managing Director
Karnataka Textbook Society
Bengaluru, Karnataka.

# Chairperson's Note

'Yesterday, today and tomorrow are inseparable parts of the present' so says great Allamaprabhu. History flows like an invisible river. Now and then it shows itself in its mortal and sometimes in an infinite form. It may appear as individuals, happening or in the form of certain values. The entire social fabric of the world is split into factions such as religions, colour, gender, language, the rich, the poor and raise its ugly heads in different identities. People have begun creating history of their own through various forms of conflicting details. As a result of this tendency history is not allowed to grow in all its true realities. Being a part of history, man has been trying to create new branches of this great tree of history. On the other hand history is like a chain in which every link represents a generation and these generations go on adding to the existing ones. As a result of this, we have to recognize that history has become a complex discipline. Basically history is a continuum. We can master our competence to understand History only by constant and deep study.

History is as vast as Time. In this book we deal with the continents of Asia, Europe and America. We have yet to study the various features of Africa, South America and Australia. A lot of research works have been going on in different fields of human endeavor and it is a challenge at least to give a bird's-eye-view of the results of these research works in our textbooks. Though we follow the spiral approach, our course becomes highly scientific and intricate.

The VII syllabus deals with Asia and Europe. We have made an earnest effort to acquaint the learners with the details of special geographical features of these continents. Indian History has been dealt with in greater detail keeping in mind the latest research findings in various aspects of history. As the syllabus is vast, naturally the pages have become more. It was a problem for writers to decide the depth and extent of details of the materials to be presented in the book.

We faced another problem while designing the book. It was how to present the sensitive issues such as religions, castes and gender. Ours is a multifaceted society. The learners at this level are sensitive to such issues. Therefore we have made a sincere and an objective effort to help learners realize the learning objectives to the best of our ability.

We would like to share the following points with classroom teachers

- The VII textbook is a continuation of V and VI standard textbooks. Therefore teachers have to keep in mind the portions covered in classes V and VI
- Portion to be covered is indicated using icons at the beginning and end of each chapter. Information given in the boxes is not to be tested in the examination. Box items come under the 'going beyond the syllabus', part of the curricular.
- At the beginning of each chapter a list of competencies to be master by the students is given. It is for the guidance of teachers. They have to see that learners have to master the competencies.
- Teachers are expected to bring to the notice of the chief coordinator, the good points and deficiencies well in time so that deficiencies may be set right in the next edition of the textbook. We welcome such suggestions from parents as well.
- Our grateful thanks to all those who have helped us in preparing this textbook.

**Dr. Aswathanarayana**
Chairperson
Textbook Preparation Committee

# Textbook Committee

| | | |
|---|---|---|
| **Chairperson** | : | ***Dr. Aswathanarayana,*** *Associate Professor, History Dept., Gnanabharathi Campus Bengaluru Universcity , Bengaluru 560056.* |
| **Members** | : | ***Sri M.N. Katti,*** *Lecturer In Geography, Govt P.U. College, B.P.Vadiya Road, Basavanagudi, Bengaluru-560026*<br>**Sri N. Ningaraju,** *Lecturer, Govt P.U.College, Yalahanka, Bengaluru*<br>**Sri Y. Ramakrishna Rao,** *Lecturer In Political Science, Govt. P.U.College, Ermalu Bada Post, Udupi Dist-574119*<br>**Sri S.B. Kadakoladavar,** *Asst. Teacher, Vidyaranya P.U. College,High School Section, Dharawad-1*<br>***Smt K.V. Shilpa,*** *Asst. Teacher, Higher Primary School,Channaiahna Kote, Viraj Pet Taluq, Madikeri(D)* |
| **Artist** | : | **Sri Taranath Kairangal,** *Drawing Teacher, Govt. High School, Manchikolnad, Bantwal Tq. D.K. Dist.* |
| **Scrutinizers** | : | **Sri Raghavendra Prabhu M.,** *Associate Professor, History (Retd.), Dambel, Ashoknagar, Mangaluru.*<br>**Sri K.R. Manjunath,.,** *Principal, M.E.S. P.U.College, T.T.M Layout,Bengaluru* |
| **Editorial Committee** | : | **Dr. M.V.Srinivas,** *Professor of History (Retd.), H.Road, Rajarajeshwarinagar, Bengaluru.*<br>**Dr. R.L.M. Patil,** *Professor of Political Science (Retd.). 1105 Poornaprajnanagar, Uttarahalli, Bengaluru.*<br>**Dr. Eshwarappa,** *Head of Dept. of Geography, Bengaluru University, Bengaluru.* |
| **Marathi Translation Committee** | : | **Sri P.K.Muchandikar,** *C.R.P., Belgundi Tal, Belagavi.*<br>**Sri. S.D.Pakhare** *A.M Govt. M.H.P.S Kadoli, Tal Belagavi.*<br>**Sri. M.M Kunte** *A.M.Ushatai Gogate Girls High School , Belagavi.*<br>**Sri. B.R. Patil** *Retd. H.M, Tal Belagavi .* |
| **Chief Co-ordinator** | : | **Prof. G.S. Mudambadithaya,** *Co-ordinator, Curriculum Revision and Textbook Preparation, Karnataka Textbook Society, Bengaluru.* |
| **Guidance** | : | **Sri Nagendra Kumar** *Managing Director, Karnataka Textbook Society, Bengaluru.*<br>**Smt C. Nagamani,** *Deputy Director, Karnataka Textbook Society, Bengaluru.* |
| **Programme Co-ordinator** | : | **Smt S.N. Leelavathi,** *Senior Asst. Director, Karnataka* |

## Textbook Revision Committee

### Chairman-in-Chief :

**Prof. Baraguru Ramachandrappa**
State Textbook Revision Committee, Karnataka Textbook Society, Bengaluru.

### Chairperson :

**Dr. T.R Chandrashekar**
Consultant, 4th Finance Commission, 3rd Floor,
Kaneuja Bhavan, Race course Road, Bengaluru-1.

### Members :

**Dr. Basavaraj**
Assistant Professor (Department of Political Science)
University of Tumakuru, Tumakuru.

**Dr. N.R. Hadapada**
Lecturer in Geography, Sri Channabasaveshwara
Pre-university College, B. Aralikatte, Hubballi Taluk,
Dharwad District.

**Sri. H.G. Rajesh**
Lecturer, Govt. Pre-university College, Dodderi,
Bengaluru South Taluk.

**Sri. P.M. Kaginkar**
Assistant Master, Govt. High School, Changavara, Sira Taluk,
Tumakuru District.

**Smt. Rajalakshmi. S.**
Assistant Mistress
Govt. Pre-university College (High School Section),
Srirampuram, Bengaluru North District.

**Smt. Shahina Begum**
Assistant Mistress
Stree Samaja, Sheshadripuram Highschool,
Bengaluru North District.

### Artist :

**Sri. D.N. Venkatesh**
Drawing Teacher, GHS, Uramara, Kasalagere, Mandya District.

## High Power Revision Committee Members

**Dr. M.S. Talwar**
#777, 'Jenugudu'
5th Block, Banashankari 6th Stage,
Metkalpalya, Bengaluru-60.

**Dr. Amaresh Yatagal,**
Assistant Professor,
Dept. of History and Archaeology,
Rani channamma University, P.G. Centre,
Toravi, Vijayapura - 586105

**Dr. N. Nandeeshwara**
Principal
S.M.R. P.U College,
Kallambella, Sira Taluk,
Tumakuru Dist - 572125.

**Sri. Manjunath Ayli**
History Lecturer,
Government Pre-University College,
Police Colony, Raichur - 584101.

### Chief Advisors :

**Sri. H.N. Gopalakrishna**
Managing Director,
Karnataka Textbook Society,
Bengaluru.

**Sri. K.G. Rangaiah**
Deputy Director,
Karnataka Textbook Society,
Bengaluru.

### Programme Co-ordinator :

**Smt. S. N. Leelavathi**
Senior Asst. Director,
Karnataka Textbook Society,
Bengaluru.

## Translators

**Sri. P.K. Muchandikar**
Govt.M.H.P.S. Benkanhalli
Tal & Dist Belagavi, 591108

**Sri. J.S. Mali**
Head Master
Govt. M.H.P.B.S. Kurli
Tal. Chikodi
Dist. Belagavi 591241

**Sri. S.D. Pakhare**
C.R.P. Hindalga
Tal & Dist Belagavi, 591108

**Sri. I.S. Patil**
C.R.P. Yallur
Tal & Dist Belagavi
590005

## About the Revision of Textbooks

Honourable Chief Minister Sri Siddaramaiah who is also the Finance Minister of Karnataka, in his response to the public opinion about the new textbooks from standard I to X, announced, in his 2014-15 budget speech of constituting an expert-committee, to look into the matter. He also spoke of the basic expectations there in, which the textbook experts should follow: "The textbooks should aim at inculcating social equality, moral values, development of personality, scientific temper, critical acumen, secularism and the sense of national commitment", he said.

Later, for the revision of the textbooks from class I to X, the Department of Education constituted twenty seven committees and passed an order on 24-11-2014. The committees so constituted were subject and class-wise and were in accordance with the standards prescribed. Teachers who are experts in matters of subjects and syllabi were in the committees.

There were already many complaints, and analyses about the textbooks. So, a freehand was given in the order dated 24-11-2014 to the responsible committees to examine and review text and even to prepare new text and revise if necessary. Eventually, a new order was passed on 19-9-2015 which also gave freedom even to re-write the textbooks if necessary. In the same order, it was said that the completely revised textbooks could be put to force from 2017-18 instead of 2016-17.

Many self inspired individuals and institutions, listing out the wrong information and mistakes there in the text, had sent them to the Education Minister and to the Textbook Society. They were rectified. Before rectification we had exchanged ideas by arranging debates. Discussions had taken place with Primary and Secondary Education Teachers' Associations. Questionnaires were administered among teachers to pool up opinions. Separate meetings were held with teachers, subject inspectors and DIET Principals. Analytical opinions had been collected. To the subject experts of science, social science, mathematics and languages, textbooks were sent in advance and later meetings were held for discussions. Women associations and science related organisations were also invited for discussions. Thus, on the basis of inputs received from various sources, the textbooks have been revised where ever necessary.

Another important aspect has to be shared here. We constituted three expert committees. They were constituted to make suggestions after making a comparative study of the texts of science, mathematics and social science subjects of central schools (NCERT), along with state textbooks. Thus, the state text books have been enriched based on the comparative analysis and suggestions made by the experts. The state textbooks have been guarded not to go lower in standards than the textbooks of central schools. Besides, these textbooks have been examined along side with the textbooks of Andhra Pradesh, Kerala, Tamil Nadu and Maharashtra states.

Another clarification has to be given here. Whatever we have done in the committees is only revision, it is not the total preparation of the textbooks. Therefore, the structure of the already prepared textbooks have in no way been affected or distorted. They have only been revised in the background of gender equality, regional representation, national integrity, equality and social harmony. While doing so, the curriculum frames of both central and state have not been transgressed. Besides, the aspirations of the constitution are incorporated carefully. Further, the reviews of the committees were once given to higher expert committees for examination and their opinions have been inculcated into the textbooks.

Finally, we express our grateful thanks to those who strived in all those 27 committees with complete dedication and also to those who served in higher committees. At the same time, we thank all the supervising officers of the Textbook Society, who sincerely worked hard in forming the committees and managed to see the task reach it's logical completion. We thank all the members of the staff who co-operated in this venture. Our thanks are also to the subject experts and to the associations who gave valuable suggestions.

**H.N. Gopalakrishna**
Managing Director
Karnataka Textbook Society (R)
Bengaluru.

**Prof. Baraguru Ramachandrappa**
Chairman-in-Chief
State Textbook Revision Committee (R)
Bengaluru.

## अनुक्रमणिका


| पाठ क्रमांक | इतिहास | पृष्ठ संख्या |
|---|---|---|
| 1 | विजयनगरचे साम्राज्य | 01 |
| 2 | बहमनी आदिल शाही | 15 |
| 3 | भक्तीपंथ आणि सुफी परंपरा | 31 |
| 4 | नायक  पाळेगार आणि नाडप्रभू | 43 |
| 5 | मैसूरचे वडेयर | 54 |
| 6 | दिल्लीचे सुलतान | 70 |
| 7 | मोगल | 79 |
| 8 | मराठे | 89 |
| | नागरिक शास्त्र | |
| 9 | आपले संविधान | 93 |
| 10 | मूलभूत हक्क आणि कर्तव्ये | 99 |
| 11 | राज्यांची मार्गदर्शक तत्वे | 106 |
| | भूगोल विज्ञान | |
| 12 | उत्तर अमेरिका – प्रेअरी प्रदेश | 110 |
| 13 | दक्षिण अमेरिका – अँडिज प्रदेश | 134 |

| पाठ 1 | विजयनगरचे साम्राज्य |
|---|---|

**पाठाचा परिचय**

13 व्या शतकात दिल्लीचा सुलतान अल्लाउद्दीन खिलजी याने सुरु केलेली दक्षिण भारत स्वारी (आक्रमण) 14 व्या शतकात सुद्धा सुरु होती. त्यामुळे दक्षिण भारतात असलेले देवगिरीचे यादव, हळेबीडुचे होयसळ (दोरसमुद्र), वारंगलीचे काकतीय, मधुरेचे पांड्य इत्यादी घराण्यांचे राज्यकारभार प्राबल्य कमी झाले. अशा वेळी दक्षिण भारतात उद्‌भवलेल्या कठीण प्रसंगाशी तोंड देण्यासाठी प्रबल राजकीयशक्ती निर्माण करण्यामध्ये विजयनगर यशस्वी झाले. यांनी तीन शतके प्रबल सत्ता गाजविली.

या पाठामध्ये विजयनगर साम्राज्यात राज्य केलेल्या विविध वंशातील प्रमुख राजांची माहिती दिली आहे. या राजानी राजकीय, सामाजिक, आर्थिक, साहित्य, कला आणि वास्तूशिल्प इत्यादी क्षेत्राला दिलेल्या योगदानाबद्दल विवरण केले आहे. तसेच घराण्याच्या नाशाला कारणीभूत ताळीकोटे युद्ध (रक्कसतंगडी युद्ध) आणि त्यांचे परिणाम याबद्धल विवरण केले आहे.

**सामर्थ्ये**

1) विजयनगरच्या राजांनी केलेल्या योगदानांचा अर्थग्रहण करणे.
2) विजयनगर साम्राज्याच्या काळातील राज्यकारभार, सामाजिक स्थिती, आर्थिक स्थिती, साहित्य इत्यादी बद्धल समजून घेणे.
3) विजयनगर साम्राज्याच्या काळातील कला, वास्तूशिल्प यांचे स्वरूप समजून घेणे.
4) विजयनगरच्या राजानी अनुसरलेल्या धर्मसमानतेबद्धल माहिती करून घेणे.
5) नकाशात विजयनगर साम्राज्याच्या सीमा आणि प्रमुख स्थळे ओळखणे.

संगमचे पुत्र हरिहर, बुकराय, कंपण, मारप्पा आणि मुद्दप्पा यांनी सामान्य शके 1336 मध्ये तुंगभद्रा नदीच्या दक्षिण तीरावर विजयनगर साम्राज्याची स्थापना केली. बळ्ळारी जिल्हयातील हंपी येथे त्यांची राजधानी होती. वराह हे त्यांचे राज्यचिन्ह होते.



**राज्यचिन्ह वराह**

सामान्य शके 1336 पासून 1646 पर्यंत विजयनगरच्या साम्राज्यावर संगमवंश (सा. शके 1336 ते 1485), साळुव वंश (सा. शके 1485 ते 1505) तुळुव वंश (सा. शके 1505 ते 1567) आणि हालमडी (अरविडू) वंश सा. शके (1570 ते 1646) अशा चार वंशानी राज्यकारभार केला.

## संगम वंश (सामान्य शके 1336 - 1485)

**हरिहर आणि बुक** हरिहर (सा. श. 1336-1357) हा या घराण्यातील पहिला राजा होय. त्यांने तुंगभद्रा नदीच्या प्रदेशावर कब्जा मिळविला. त्याने आपले राज्य पश्चिमेला कोकण किनारपट्टीपर्यंत, पूर्वेला नेलूर आणि कंडपावाळ पर्यंत उत्तरेला कृष्णा नदी आणि दक्षिणेला कावेरी नदीपर्यंत विस्तार केला अशा प्रकारे सुरवातीलाच राज्याचा भक्कम पाया घातला.

त्याला मुलगा नसल्यामुळे त्याच्या मरणानंतर त्याचा भाऊ बुकराय (सा.श. 1357-1377) सत्तेवर आला. याच्या काळात मधुरेच्या सुलतानाचा पराभव बुकरायचा मुलगा कंपण याने केला आणि साम्राज्याचा विस्तार केला. या दिग्विजयाची माहिती कंपण राजाची राणी गंगादेवी हिने लिहिलेल्या ‘मधुरा विजयम’ या संस्कृत कृतीमध्ये विवरण केले आहे. बुकने कोंडविडच्या रेड्डींचा पराभव करून पेनुकोंडचा प्रदेश विजयनगरच्या

साम्राज्यात समावेश केला. याने जैन आणि वैष्णव यांच्यामधील धार्मिक असंतोष लक्षात घेऊन सर्वधर्म समानतेला प्रोत्साहन दिल्याबदल सा.श. 1368 मध्ये श्रवणबेळगोळ येथील शिलालेखात विवरण मिळते.

बुकराय नंतर दुसरा हरिहर (सा.शके 1377-1404), इम्मडी बुक, इम्मडी विरूपाक्ष (सा.श. 1404-1406), पहिला देवराय (सा.श. 1406-1422), वीर विजयराय (सा.श. 1422-1424) यांनी राज्य केले.

### दुसरा देवराय (सा.श. 1424-1446) प्रौढ देवराय

संगम वंशातील प्रसिद्ध राजा प्रौढ देवरायाचा कालखंड विजयनगरच्या साम्राज्यात महत्वपूर्ण कालखंड होता. अधिकारावर आल्यानंतर धनुर्विद्येत पारंगत आणि घोड्याना प्रशिक्षण देण्याच्या कलेमध्ये तरबेज असलेल्या मुस्लिमांना घेऊन नवीन सैन्याची संघटना केली. या सैन्याच्या मदतीने आंध्रच्या कोंडुविडू प्रदेशातील रेड्डी नायकाचा पराभव केला. बहमनी सुलतान अहमद शानो याच्याशी युद्ध करून प्रसिद्ध असा मुदगल किल्ला, रायचूर आणि बंकापूर हे सुरक्षित ठेवले. यातील वीर सेनानी असलेला लक्कण्ण दंडेश याने केरळ आणि श्रीलंका राजावर विजय मिळवून त्यांच्याकडून खंडणी मिळविली.

सर्वधर्म सहिष्णूतेचा पुरस्कर्ता असलेला दुसरा देवराय याने आपल्या राजधानीमध्ये जैन आणि वैष्णवांची देवालये निर्माण केली. तसेच मशिदी बांधून दिल्या होत्या. त्याच्या राज्यात तेलगु कवी श्रीनाथ, संस्कृत पंडीत आणि कन्नड कवी तसेच मंत्री असलेला लक्कण्ण दंडेस इत्यादीनी आश्रय घेतला होता. प्रौढ देवरायाच्या काळात वीरशैव पंथात वाढ झाली.

पर्शिया देशाचा प्रवासी अब्दूल रजाक प्रौढ देवरायाच्या काळात विजयनगरला भेट दिल्यानंतर म्हणाला, 'विजयनगर अशी संपन्न व समृद्ध राजधानी माझ्या डोळ्यांनी पहिल्यांदा पहात आहे. नगराला सात किल्यांचे संरक्षण आहे. देवरायाची सेना लक्षा-वधी होती' असे वर्णन केले आहे.

प्रौढ देवरायाला 'गजाधीपती' (गजवेंटेगार), 'चतुसमूद्राधिश्वर', 'राजाधिराज' (अरिराय विभाड) अशा पदव्या होत्या. सा.शके 1446 मध्ये प्रौढ देवरायाचा मृत्यू झाल्यानंतर त्याचा मुलगा मल्लिकार्जून (सा.श. 1446-1465) आणि तिसरा विरूपाक्ष (सा.श. 1465-1485) यांनी राज्यकारभार केला. हे दोघेही दुर्बल असल्यामुळे प्रबल सेनानी साळुव नरसिंह याने राजधानीवर कब्जा मिळविला. याबरोबरच संगम वंशाची कारकिर्द सा.श. 1485 मध्ये संपुष्ठात आली.

## साळुव वंश (सामान्य शके 1485-1505)

सा.शके 1485 मध्ये अधिकारावर आलेला साळुव नरसिंह याने 6 वर्षे राज्य करून सा.शके 1491 मध्ये मरण पावला. त्यावेळी त्याची मुले लहान असल्यामुळे सा.शके 1491 ते सा.शके 1503 पर्यंत तेथील राज्यकारभार त्यांचा सेनापती तुळुव नरसनायक यांच्या अधिपत्याखाली चालला.

## तुळुव वंश (सा.श. 1505-1567)

तुळुव नरसनायकाचा मुलगा वीर नरसिंह याने तुळुव घराण्याच्या राज्यकारभारास 1505 मध्ये सुरुवात केली. 1509 मध्ये त्याचे निधन झाल्यानंतर त्याचा भाऊ कृष्णदेवराय सत्तेवर आला.

## कृष्णदेवराय (सा.श. 1509-1529)

कृष्णदेवराय हा विजयनगर साम्राज्यातील अत्यंत प्रसिद्ध राजा होता. अधिकारावर आल्यानंतर त्याला अनेक युद्धांना सामोरे जावे लागले.

> कृष्णदेवराय हे शूर, पराक्रमी, चतुर सेनानी आणि उत्तम राज्यकर्ते होते. कृष्णदेवरायाने शत्रूंचा नाश करून दक्षिण भारतात विजयनगरच्या साम्राज्याचा विस्तार केला असे इतिहासकार रॉबर्ट सिवेल सांगतात.

सा.शके 1510 उम्मत्तुरीनचा राज्यकर्ता गंगराज कडून शिवनसमुद्र किल्ला ताब्यात घेतला नंतर रायचूरचा किल्ला जिंकून घेतला. विजापूरच्या सुलतानाकडून गोवा जिंकून घेण्यासाठी पोर्तुगिजाना मदत केली. सा.शके 1513 मध्ये उदयगिरी किल्ला, सा.श.

1518 मध्ये कलिंगचा राजा गजपती प्रतापरुद्रचा पराभव करून त्याची राजधानी कटक जिंकून घेतली आणि गजपतीची मुलगी जगन्मोहिनी हिच्याशी लग्न केले.




सा.श 1522 मध्ये आदिलशाही राजा इस्माईल आदिल खानकडून रायचूर पुन्हा ताब्यात घेतले. पुढे गुलबर्गा, बीदर किल्ले जिंकून घेतले. बहामनी राज्याच्या प्रधानाला

डांबून ठेवून राजपूत्राला सोडवून बिदरच्या सिंहासनावर बसविले. त्यामुळे कृष्ण देवरायाने यवन राज्य 'प्रतिष्ठापनाचार्य' ही पदवी धारण केली. सा. शके 1529 मध्ये कृष्णदेवराय मरणाच्या वेळी विजयनगर साम्राज्य चारी दिशेला विस्तारलेले होते. विजयनगरच्या राजधानीला भेट दिलेला डोमींगो पेयस याने असे म्हटले की 'कृष्णदेवराय हा सौम्य (मृदू) स्वभाव व्यक्तिमत्वाचा, सदृढ शरिराचा होता.'

## रक्कस तंगडीचे युद्ध

कृष्णदेवरायानंतर अच्युतराय (सा.श. 1530-1542) आणि सदाशिवराय (सा.श. 1543-1565) यांनी राज्य केले. सदाशिवराय अजून लहान असल्यामुळे राज्यकारभाराची संपूर्ण जबाबदारी कृष्णदेवरायाचा जावई अरविडू वंशाचा रामराय यांने घेतली. याचे राजकीय धोरणामुळे विजयनगरच्या साम्राज्याच्या विस्तारासह श्रीमंती प्राप्त केली होती. त्याबरोबर वैऱ्यांची संख्याही वाढली होती.

दख्खनच्या सुलतानांचे राज्य दुर्बल झाले होते. मदतीसाठी बोलविलेल्या रामरायाने याचा फायदा घेत विजापूर आणि गोवळ कोंडयाचा प्रदेश जिंकून घेतला. हेच युद्धाचे मूळ कारण होते. विजयनगर साम्राज्याचे वैभव आणि समृद्धी पाहून सुलतानांच्या मनात द्वेष व मत्सर निर्माण झाला. त्यामुळे सुलतानानी आपले राजकीय भेदभाव विसरून एकत्र आले.

23 जानेवारी 1565 रोजी दख्खनच्या सुलतानांचे एकत्रीत सैनिक आणि विजयनगरचे सैनिक यांच्यामध्ये कृष्णा नदीच्या तीरावर झालेल्या रक्कस तंगडी युद्धामध्ये रामरायाचा वध झाला. विजयी सुलतानांनी विजयनगरची लूट केली. रणांगणातून पलायन केलेले रामरायाचे पुत्र तिरुमल आणि वेंकट हे पेनुकोंडला पळून गेले. पुढे पेनुकोंड, चंद्रगिरी व शेवटी वेलूर ही राजधानी करून अरविडू वंशजानी सा.श. 1570 ते 1646 पर्यंत राज्यकारभार चालविला या युद्धाचा परिणाम असा झाला की कर्नाटक मध्ये म्हैसूरु, केळदी, चित्रदुर्ग, यलहंका आणि सुरपूर इत्यादी सामंतराजे स्वतंत्र झाले.

## विजयनगरची सांस्कृतिक देणगी

**राज्यकारभार :** विजयनगर साम्राज्याचा राज्यकारभार बलिष्ट केद्रिंकृत होता. विकेंद्रीकृत राज्यकारभार पद्धती अंमलात होती. राज्यकारभारात राजाला सहाय्य करण्यासाठी विविध मंत्री, विविध प्रांताचे सेनापती होते. राज्यकारभाराच्या दृष्टीने साम्राज्याचे प्रांतामध्ये, प्रांताचे भागामध्ये, भागाचे नगरामध्ये, नगराचे खेड्यामध्ये वंशपरंपरेने आलेले अधिकारी (उदा:पाटील कुलकर्णी इ.) राज्यकारभार पहात होते.

राजा हा न्यायालयाचा प्रमुख होता. प्रांतामध्ये प्रांताधिकारी न्याय देत होते. म्हणून जमीनीच्या उत्पन्नातून 1/6 भाग संग्रह करत होते. यासह वाणिज्य कर, व्यापारी कर, रस्ते कर, बाजार कर, निर्यात कर, बिदागी, देणग्या इत्यादी राज्याच्या उत्पन्नाची साधने होती.

विजयनगरच्या काळात पायदळ, घोडदळ, हत्तीदळ आणि बंदूक धारी ही सैन्याची प्रमुख अंगे होती. अरबी घोडे हे विजयनगरचे आकर्षण झाले होते.

**सामाजिक स्थिती :** विजयनगरच्या काळात समाजामध्ये बालविवाह, सतीची पद्धत आणि देवदासी पद्धत अस्तित्वात होती. सामान्यणे एक पत्नीत्व कायदा असूनही श्रीमंत आणि राजे लोक बहुपत्नीत्व अनुसरत होते. स्त्रीयांना गौरवाचे स्थान होते. दिवाळी आणि दसरा हे सण सर्वजण मोठ्या आनंदाने (उत्साहाने) साजरे करत होते. दसरा सण राज दरबारात साजरा होत असे.

**आर्थिक स्थिती:** शेती हा बहुतेक लोकांचा प्रमुख व्यवसाय होता. भात, जोंधळा, ऊस आणि कापूस ही मुख्य पिके होती. विजयनगरच्या राजानी तलाव, कालवे, विहीरी बांधून शेतीला उत्तेजन दिले. विजयनगर हे आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र बनले होते. भात, खादी कापड, लोखंड, हिरे, साखर, कस्तुरी, चंदन, मसाल्याचे पदार्थ इत्यादी निर्यात करत होते. घोडे, रेशमी कपडे, मखमली कपडे इ. आयात करत होते.

विजयनगर हे हिऱ्यांच्या व्यापारासाठी आंतरराष्ट्रीय व्यापाराचे केंद्र झाले होते. कापड विणने हा प्रमुख हस्त उद्योग होता. भटकळ, होन्नावर, मंगळूरु ही प्रमुख बंदराची शहरे झाली होती. होण अथवा वरह ही सोन्याची नाणी होती. नाण्यांच्यावरती देवदेवतांची चित्रे होती.

**साहित्य:** विजयनगर साम्राजाच्या काळात संस्कृत, तेलगू आणि कन्नड साहित्य समृद्ध झाले. विद्यारण्य यांनी 'शंकर विजय' आणि 'सर्व दर्शन संग्रह' या कृतींची संस्कृत भाषेमध्ये रचना केली. विद्यारण्याचे भाऊ सायनाचार्य यांनी 'वेदार्थ प्रकाश' आणि 'आयुर्वेदिक सुधानिधी' ग्रंथाची रचना केली. विजयनरच्या राजानी आणि परिवारातील सदस्यानी सुद्धा साहित्याची निर्मिती केली. त्यांच्यामधील गंगादेवी यानी 'मधूरा विजयम' नावाची कृती, प्रौढ देवरायनी 'सुधानिधी' या महानाटकाची, कृष्ण देवरायानी 'जांबूवती कल्याण', 'मदालसा चरित्रम' 'रसमंजरी' इत्यादी कृतींची रचना केली. कुमारव्यासानी कन्नड भाषेत 'गदूगीन भारत', रत्नकार वर्णीयाचे 'भरतेश वैभव', चामरसांची 'प्रभुलिंग लिला' इत्यादी रचना प्रमुख आहेत. भीम कवींचे 'बसव पुराण' इत्यादी विरशैव साहित्याची समृद्धी झाली.

तेलगु भाषेतील साहित्याला प्रोत्साहन दिल्यामुळे कृष्णदेवरायांना 'आंध्र भोज' ही पदवी मिळाली. कृष्णदेवराय स्वतः कवी होते. तेलगु भाषेमध्ये त्यांनी 'आमुक्त माल्यद' साहित्याची रचना केली. कृष्णदेवरायाच्या दरबारातील अष्टदिग्गज प्रसिद्ध होते. अल्लसानी पेद्दण्णा, नंदी तिम्मण्णा, श्रीनाथ, सुरण्णा, तेनाली रामकृष्ण इत्यादीना आश्रम दिला होता.

**धर्म सहिष्णुता :** विजयनगरचे राजे सर्वधर्म सहिष्णू होते. त्यांनी राजधानी मध्ये मशीदी बांधल्या होत्या. बुकराय याने जैन आणि वैष्णव यांच्यामधील धार्मिक कलह लक्षात घेऊन सर्वधर्म सहिष्णुतेचा पुरस्कार केल्याबद्दल सा.श. 1368 मधील श्रवणबेळगोळ

येथील शिलालेख सांगतो. ख्रिश्चन, मुस्लीम, यहुदी, हिंदू कोणीही असला तरी विजयनगर साम्राज्यात निश्चिंतपणे जीवन जगू शकतो. राजे सर्वांना मानसन्मान (गौरव) देत होते. असे कृष्ण देवरायाच्या काळात विजयनगरला भेट दिलेल्या बार्बोसने म्हटले आहे.

**कला आणि वास्तू शिल्प :** विजयनगर साम्राज्याच्या काळात बांधलेली देवालये, इमारती आणि मूर्तींची शिल्पकला यांचा अभ्यास करुन प्रसिद्ध कला इतिहासकार पर्सीब्रौन म्हणतो की विजयनगरातील वास्तूशिल्प शैली ही 'द्राविड शैलीतील श्रेष्ठ विकसीत' स्वरूपाची आहे.



**हजार रामस्वामी देवालय, हंपी**

या काळातील देवालये कठीण अशा दगडापासून बांधलेली आहेत. हंपीचे विरूपाक्ष देवालयाचा कल्याण मंडप, हजार राम स्वामी देवालय, विठ्ठलस्वामी देवालय, कृष्णस्वामी देवालय, चुनखडीत बांधलेले कमल महल, शृंगेरी विद्याशंकर देवालय, ही प्रमुख आहेत. भव्य व्हरांडा, उंच शिखरे (गोपुर), विशाल कल्याण मंडप, सभा मंडप, वसंत मंडप इ. विजयनगर साम्राज्याच्या काळातील देवालयांची लक्षणे होती.



**विद्याशंकर देवालय, शृंगेरी**

काळहस्ती, श्रीशैल, तिरुपती, चिदंबरम, श्रीरंगम, कुंभकोणम, कांची इत्यादी ठिकाणी विजयनगरच्या काळातील वास्तुशिल्पे दिसून येतात.

अजंठा येथील लेपाक्षी देवालयात विजयनगरच्या काळातील शिवपुराणातील चित्रे कोरलेली आहेत. हंपी येथील विरूपाक्ष देवालयाच्या कल्याणमंडपाच्या वरील छावणीवर दशावतार आणि कल्याणला संबंधीत दृष्ये साकारलेली आहेत.

हंपी येथील दगडी रथ, नरसिंह आणि गणपती यांच्या मूर्त्या विजयनगर काळातील एकादगडात तयार केलेल्या शिल्पकला उठावदार दिसतात. कर्नाटक संगीत म्हणून परिचीत असलेले दाक्षिणात्य संगीत या काळात जनसामान्य लोकापर्यंत पोहचले होते. पुरंदर दास आणि कनकदास यांनी संगीत क्षेत्राला महान योगदान दिलेले आहे.



मोहरीचा गणेश, हंपी



उग्रनरसिंह हंपी



हंपी येथील दगडी रथाचे चित्र

## कालगणना (सा.शके)

| | |
|---|---|
| विजयनगर साम्राज्याच्या राज्यकारभाराचा काळ | 1336–1565 |
| संगम वंश | 1336-1485 |
| हरिहर | 1336–1357 |
| बुकराय | 1357–1377 |
| दुसरा (प्रौढ) देवराय | 1424-1446 |
| साळुव वंश | 1485-1505 |
| तुळुव नरसनायक | 1491-1503 |
| तुळुव वंश | 1505-1567 |
| कृष्णदेवराय | 1509-1529 |
| रक्कस तंगडीचे युद्ध | 23 जानेवारी 1565. |

## अभ्यास

### I. खाली दिलेल्या रिकाम्या जागा योग्य शब्द भरून पूर्ण करा.

1) श्रीलंकेच्या राजांना हरवून ................ मिळविलेला दुसरा (प्रौढ) देवरायाचा सेनानी ................. होय

2) कृष्णदेवरायाने गजपती प्रतापरुद्राची मुलगी ................ हिच्याशी विवाह केला.

3) विजयनगर साम्राज्यात वरह ................ नाणी होती.

4) विजयनगर साम्राज्यात सर्वधर्मातील लोक निश्चिंतपणे जीवन जगू शकतात असे सांगणारा विदेशी प्रवासी .............. होय.

5) द्राविड शैलीही विजयनगर वास्तूशिल्पाचे श्रेष्ठ विकसित स्वरूप आहे असे सांगितलेला कला इतिहासकार ................ होय.

## II. खाली दिलेल्या प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे द्या.

1) विजयनगर साम्राज्याचा संस्थापक कोण?

2) विजयनगर साम्राज्यात कोणकोणत्या वंशजानी राज्य केले?

3) संगम वंशातील प्रसिद्ध राजा कोण?

4) विजयनगर साम्राज्यातील अत्यंत श्रेष्ठ राजा कोण?

5) रक्कस तंगडीचे युद्ध केव्हा झाले?

6) विजयनगर साम्राज्याच्या उत्पन्नाची साधने कोणती?

7) विजयनगर साम्राज्यात कोणकोणते सण साजरे करत होते?

8) विजयनगर साम्राज्यातील प्रमुख पिके कोणती?

9) कृष्णदेवरायाच्या रचनांची (कृतीची) नावे लिहा.

10) विजयनगरला भेट दिलेल्या विदेशी प्रवाशांची नावे लिहा.

11) विजयनगरच्या काळातील प्रमुख देवालये कोणकोणती?

## III. खालील प्रश्नांना गटामध्ये चर्चा करून उत्तरे लिहा.

1) कृष्णदेवरायाच्या दिग्विजयाबद्धल माहिती लिहा.

2) विजयनगरच्या काळातील साहित्य कृतीची यादी करा.

## IV. खालील अ यादी संबंधीत ब यादीतील विषय ओळखून जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| गंगादेवी | आंध्रभोज |
| दुसरा देवराय | मधुरा विजयम |
| कृष्णदेवराय | विद्याशंकर देवालय |
| श्रृंगेरी | गजाधिपती |

## कृती.

1) विजयनगरातील स्मारकांचे फोटो जमवून त्यांचे विवरण लिहा.
2) विजयनगर काळातील मूर्तीशिल्पांची चित्रे जमवून विवरण लिहा.
3) पुरंदरदास आणि कनकदास यांची एकदोन कीर्तने संग्रह करून गटामध्ये गायन करा.
4) हंपीला शैक्षणिक सहलीला जा. सहली नंतर तुमचे अनुभव निबंध रूपात लिहा.

☆ ☆ ☆

| पाठ 2 | बहमनी आदिल शाही |
|---|---|

## पाठाचा परिचय

कर्नाटकाच्या इतिहासात विजयनगर साम्राज्याची स्थापना सा.श. 1336 मध्ये झाली. त्यानंतर 3 ऑगष्ट 1347 रोजी प्रथम मुस्लीम वंशाचे बहमनी साम्राज्य अस्तित्वात आले. बहमन घराण्याची स्थापना अल्लाऊद्दीन हसन गंगू याने केली. बहमनी सुलतान आणि विजयनगरचे राजे यांच्यामध्ये वारंवार युद्धे होत होती. काळाप्रमाणे अधिकारासाठी बहमनी राज्यात अंतःकलह होऊन सा.श. 1527 च्या सुमारास या घराण्याची विभागणी होऊन पाच बहमन शाही घराणी अस्तित्वात आली. त्यातील विजयपूरची (विजापूर) आदिल शाही प्रमुख होती. या घराण्यातील प्रमुख सुलतानांच्या कार्याविषयी परिचय दिला आहे. या बरोबरच साहित्य, कला, वास्तुशिल्प यांना जादा महत्व दिले होते.

या पाठात बहमनी राज्याचा सुलतान फिरोज शहा आणि प्रसिद्ध मुख्यमंत्री महमद गवान यांच्या कार्याबद्धल वर्णन केले आहे. यासह बहमनी राज्याच्या प्रमुख योगदानाबद्धल वर्णन केले आहे.

## सामर्थ्ये

1) फिरोजशहा आणि महमद गवान यांच्या योगदानाची माहिती करून घेणे.
2) बहमनी सुलतानांचे साहित्य, कला आणि वास्तुशिल्प कलेला दिलेले योगदान ओळखणे.
3) नकाशावर बहमनी राज्याला संबंधीत मुख्य ऐतिहासिक स्थळे ओळखणे.
4) विजयपूर आदिलशाहीतील प्रमुख सुलतानांच्या बद्धल समजून घेणे.
5) कला, साहित्य आणि शिल्पकले बाबत समजून घेणे.

विजयनगर साम्राज्याच्या सुरुवातीच्या काळातच या राज्याच्या उत्तरेला बहमनी साम्राज्याची स्थापना 1347 मध्ये झाली. याची स्थापना अल्लाऊद्दीन हसन गंगू बहमनशहा याने केली. यापूर्वी बहमन हा दिल्लीचा सुलतान महंमद बीन तुघलकच्या सैन्यात काम करीत होता.

## बहमनी सुलतान (सा. श. 1347 ते 1527)

बहमनी राज्य सध्याच्या कर्नाटक, महाराष्ट्र आणि आंध्र प्रदेश (तेलंगण) च्या काही भागात सामावलेले होते. कृष्णा नदी राज्याची दक्षिण सीमा होती. प्रारंभी कलबुर्गी त्यानंतर बीदर ही यांची राजधानी झाली. कृष्णा नदीच्या उत्तरेला बहमनी राज्य व दक्षिणेला विजयनगर साम्राज्य होते. ताजुद्दीन फिरोजशहा हा बहमनी वंशातील प्रसिद्ध सुलतान होता.



## ताजुद्दीन फिरोजशहा (सा. श. 1397–1422)

हा न्यायवादी, उदार आणि देवभक्त होता. कुराणाच्या प्रति तयार करून त्याप्रमाणे स्वतःचे जीवन जगण्यास सुरुवात केली. लेखक म्हणून बहुभाषाविद्या पारंगत प्राप्त फिरोजला भूमिती आणि धर्मशास्त्राची माहिती होती. त्याने अनेक पंडिताना, कवीना, कलावंताना त्याच्या दरबारात आश्रय देऊन त्यांचा गौरव केला. त्याने दौलताबाद (महाराष्ट्र) येथे आकाश निरिक्षण केंद्राची स्थापना केली. याने राजधानी कलबुरगीचे सौंदर्य वाढविले. शिवाय आपल्या नावाने भिमा नदीच्या काठी 'फिरोजाबाद' नावाच्या नवीन नगराची निर्मिती केली. याच्या काळात राज्यात आलेल्या सुफीसंत बंदेनवाज यांना काही गावे इनाम म्हणून दिली. बंदरांच्या विकासाला विशेष प्राधान्य दिले. याच्यापासून विदेशी व्यापारास प्रोत्साहन मिळाले.

## महमंद गवान (सा.श. 1463–1481)

बहमनी राज्याच्या इतिहासात इतर सुलतानापेक्षा जास्त प्रसिद्धी महंमद गवान यांना मिळाली. पर्शियन मूळ असलेल्या तिसऱ्या महंमदने सुलतानाचा मुख्यमंत्री म्हणून निस्वार्थ सेवा बजावली.

**प्रमुख बहमनी सुलतान**

अल्लाऊद्दीन हसन गंगू बहमन शहा, फिरोज शहा, अहमद शहा, आणि तीसरा महंमद शहा.

## कामगिरी

- महंमद गवानने विजयनगर साम्राज्याकडून हुब्बळी, बेळगावी आणि गोवा प्रदेश ताब्यात घेतला.
- राज्याचा कारभार इस्लाम नियमाना अनुसरून होता.
- त्याने महसूल आणि पोस्ट कचेरी उत्तमरित्या चालविल्या.
- त्याने जमिनीचा कर, जमिनीचे उत्पन्न आणि पाण्याची सुविधा यावर आधारित कर ठरविला होता. कर फक्त रोख रकमेच्या रूपातच गोळा केला जात होता.
- लोकांना त्रासदायक असलेले कर रद्द केले.

* स्वतः विद्वान असलेल्या महंमद गवानने बीदर मध्ये मदरसा (महाविद्यालय) स्थापना केली. त्याने इस्लाम धर्म आणि कायदा शिक्षणाला प्रोत्साहन दिले. येथे खगोल शास्त्रज्ञ, गणित, इतिहास इ. अध्ययन चालू होते. विद्यार्थ्यांना मोफत शिक्षण आणि विद्यार्थीवसतीगृहांची सोय होती. मदरसांच्या ग्रंथालयामध्ये सुमारे 3000 पुस्तके होती.
* एकूणच बहमनी राज्याचा महंमद गवान हा श्रेष्ठ राज्यकर्ता होता. एवढे असूनसुद्धा राज्याचे सरदार गवानाच्या कार्याबद्धल मत्सर वाटून घेत होते. आतमध्ये चाललेला हा कलह शेवटी त्याच्या मृत्यूला कारणीभूत ठरला. गवानाच्या समाधीवर 'निस्वार्थी गवानाचा खून झाला' असा उल्लेख आहे.

## सांस्कृतिक योगदान

**शिक्षण:** बहमनी सुलतानानी इस्लाम विद्याभ्यासाला अधिक प्रोत्साहन दिले. कुराण पठण हा एक शिक्षणाचा भाग होता. यांच्या काळात कलबुरगी, बीदर, एलिचपूर आणि दौलताबाद इत्यादी इस्लाम धर्माची विद्या केंद्रे झाली होती. धार्मिक शिक्षण मशिदीमध्ये व मदरसामध्ये दिले जात होते. गरीबांसाठी आणि अनाथांसाठी मदरसा मध्ये मोफत जेवण व रहाण्याची सोय आणि विद्यार्थी वेतन मिळत होते. शाळांमध्ये कुराण, तर्कशास्त्र आणि सुफी पंथाची तत्वे शिकवित होते.

**साहित्य:** बहमनी सुलतानाने साहित्यकारांना, कवीना, विद्वानाना, लेखकाना राजाश्रय दिला होता. सुलतान असलेले फिरोज शहा, दुसरा महंमद शहा आणि महंमद गवाण हे लेखक, मंत्री आणि कवी होते. यांच्या काळात पर्शियन, अरेबिक, उर्दू साहित्याचा विकास झाला. बंदेनवाज नावाचे प्रसिद्ध सुफी संत आणि ग्रंथकार या काळातीलच होते. यांनी आणि इतर विदेशी विद्वांनानी विकसीत केलेली भाषा 'दखनी' म्हणून प्रसिद्ध होती. पुढे हिच भाषा उर्दू भाषेच्या विकासासाठी कारणीभूत ठरली.

**वास्तूशिल्प:** बहमनीचा इतिहास हा वास्तुशिल्प कलेसाठी प्रसिद्ध आहे. त्यांनी कलुबरगी, बीदर आणि इतर स्थळाना बांधलेल्या इमारतीत हिंदू मुस्लीम शैली दिसून येते. ही दखनी शैली म्हणून परिचीत आहे. बहमनीनी निर्माण केलेली पहिली इमारत म्हणजे कलबुरगीची 'जामा मशीद' होय. ही महमद शहा यांनी बांधली. लहान लहान घुमटानी बांधलेले येथील सभांगण आकर्षक आहे. कलबुरगीच्या जवळ सुलतानाची समाधी आहे. ती मोठ्या आकाराची समाधी आहे. बंदेनवाज समाधी ही आणखी एक प्रमुख होय.

बीदरची सोळाखांब मशीद आणि किल्ल्याच्या आतील सुंदर राजमहल प्रसिद्ध आहे. या इमारती अलंकार, शिल्पकृती, लाकडाचे कोरीव काम यांनी सज्ज आहेत. बीदरच्या जवळ असलेल्या अष्टुरच्या बारा समाधी सुंदर आहेत.

बहमनी काळातील अत्यंत प्रमुख कृती म्हणजे गवानची मदरसा होय. त्याची लांबी 242 फूट, रुंदी 222 फूट, उंची 56 फूट असून 3 मजली अशी रचना आहे. पाच शतकांच्या अगोदरची मदरसा इमारत आपला मागील इतिहास आजही सांगते.



**बीदरचा किल्ला**



जामा मशिद, कलबुरगी



बंदेनवाज समाधी, कलबुरगी



गवानाची मदरसा, बीदर

## शाही घराणे

महंमद गवाननंतर बहमनी राज्य जास्त काळ टिकले नाही. तिसऱ्या महंमद नंतर अधिकारावर आलेले सुलतान दुर्बल, असमर्थ होते. याच्यानंतर उत्तराधिकारी असलेला महंमद लहान होता. राज्यातील एकता टिकविण्यास असमर्थ ठरला. या वंशाचा सुलतान कालीमल्ला शहा याच्या मरणानंतर बहमनी राज्य पाच शाही घराण्यामध्ये विभागले गेले.

1) विजयनगरची (विजापूर) आदिल शाही.

2) बीदरची बरीद शाही.

3) गोवळ कोंडयाची कुतुब शाही.

4) अहमद नगरची निजाम शाही.

5) विरारची इमाद शाही.

## विजयपूर (विजापूर) ची आदिल शाही (सा. श. 1489–1686)

| | |
|---|---|
| युसूफ आदिल खान | सा.श. 1489–1510 |
| इस्माईल आदिल खान | सा.श. 1510–1534 |
| पहिला इब्राहम आदिल शहा | सा.श. 1535–1558 |
| पहिला अली आदिल शहा | सा.श. 1558–1580 |
| दुसरा इब्राहम आदिल शहा | सा.श. 1580–1626 |
| महंमद आदिल शहा | सा.श. 1626–1656 |
| दुसरा अली आदिल शहा | सा.श. 1656–1672 |
| सिकंदर आदिल शहा | सा.श. 1672–1686 |

युसूफ आदिल खान हा विजयपूर आदिल शाही घराण्याचा संस्थापक होय. हा उत्तम राज्यकर्ता आणि धर्मसहिष्णुतावादी होता. याच्यानंतर दुसरा इब्राहिम आदिल शहा अधिकारावर आला.

## दुसरा इब्राहिम आदिल शहा (सा.श. 1580–1626)

दुसरा इब्राहिम हा विजयपूरच्या श्रेष्ठ सुलतानापैकी एक होय. याच्या काळात राज्याच्या नुसत्या सीमाच वाढल्या नाहीत तर समृद्धीही वाढली होती. व्यापार आणि आर्थिक व्यवहार वाढले होते. याला 'जगद्‌गुरु बादशहा' ही पदवी होती. इब्राहिम हा धर्मसहिष्णू होता. अनेक हिंदू कवी तसेच संगीतकारांना आश्रय दिला होता. स्वत:च्या राजमहालातील दत्त मंदिराची दुरुस्ती करून पूजेची व्यवस्था केली. हिंदू-मुस्लीम सांस्कृतीक एकतेसाठी इब्राहिमने बरेच श्रम घेतले. 'किताब-इ-नवरस' नावाचे एक उर्दू पुस्तक लिहिले. तसेच हिंदू संगीत मुसलमानामध्ये जनप्रिय करण्यासाठी प्रयत्न केले. या संगीताच्या कृती हिंदू देवता सरस्वती, गणपती, भैरव इत्यादीच्या स्तुती पासून सुरू होतात. तो स्वतः एक उत्तम संगीतकार होता. भव्य इमारत 'इब्राहिम रोजा' यानेच बांधले.



**इब्राहिम रोजा, विजयपूर**

## बीदरची बरीद शाही (सा.श. 1489–1619)

बहमनी राज्याची विभागणी झाल्यानंतर दखखनचे बीदर आणि त्याच्या सभोवतालचा प्रदेशावर बीदरच्या बरीद शाही घराण्याने राज्य केले. खासिमबरीद हा बरीद घराण्याचा संस्थापक होय. याच्यानंतर बीदरवर राज्य केलेले इब्राहिम आणि त्याचा भाऊ खासिम हे असमर्थ होते. यांच्या वर्तणुकीमुळे बरीद शाही घराण्याला उत्तरती कळा लागली. अशावेळी विजयपूरच्या इब्राहिम आदिल शहाने बीदर ताब्यात घेतले. अशा प्रकारे बरीद शाही राज्य इब्राहिमच्या विजयपूर राज्यात विलीन झाले.

## गोवळकोंडा ची कुतुब शाही (सा.श. 1512–1687)

**खुलीकुतुब शहा** याने स्वतंत्र गोवळकोंडा राज्याची स्थापना केली. याने दीर्घकाळ उत्तम राज्य चालविले. सा.श. 1543 मध्ये त्याच्याच एका मुलाने त्याचा वध केला.

**इब्रहिम** याला हिंदू धर्माबद्धल अत्यंत सहानुभूती होती. याच्या दरबारात राज्यकारभार चालविण्यासाठी मोठ्या प्रमाणात हिंदूचे अधिकारी होते. त्याने आपल्या राजधानी असलेल्या गोवळकोंडयाचे एक सुंदरनगर निर्माण केले. सा.श. 1589 च्यावेळी इब्राहिमने आपली राजधानी गोवळकोंडयाहून हैद्राबादला नेली. इब्राहिम नंतर आलेले अब्दुल्ला कुतुब शहा, अबुल हसन इत्यादी सुलतान असमर्थ असल्यामुळे गोवळकोंडा मोंगलाना शरण गेले.

## अहमद नगरची निजाम शाही (सा.श. 1490–1636)

सा.श. 1490 मध्ये जुन्नरचा प्रांताधिकारी असलेला निजामशाही वंशाचा मल्लीक अहमद याने स्वतंत्र अहमदनगर राज्याची स्थापना केली. याने दौलताबाद ताब्यात घेऊन राज्याचा विस्तार केला. याच्यानंतर बुर्हान, हुसेन निजाम शहा, मुर्तजा हे नावालाच सुलतान होते. चांदबीबीच्या मरणानंतर अहमदनगर पतन पावले. शेवटी मोगलराजा शहाजहानच्या काळात अहमदनगर संपूर्णपणे मोगल साम्राज्यात सा.श. 1637 मध्ये विलीन झाले.

## बिरारची इमाद शाही (सा.श. 1490–1580)

बहमनी साम्राज्याच्या पतनानंतर आस्तित्वात आलेल्या पाच दक्षिण सुलतानांच्या राज्यापैकी बिरारची इमाद शाही घराणे आहे. हा बीदरच्या उत्तरेला वर्धा, तपती, पेनगंगा आणि वैनगंगा नद्यांच्या मधील प्रदेश आहे. फता–उल्ला याने सा.श. 1490 मध्ये या घराण्याची स्थापना केली. याची राजधानी एलीचपूर होती. 'इमाद–उल–मुल्क' ही फत्ता–उल्लाची पदवी होती. सा.श. 1504 मध्ये त्याच्या मरणानंतर त्याचा मुलगा अल्ला–उद–दीन इमाद शहा अधिकारावर आला. तो समर्थ सुलतान झाला नाही. नंतर याचा मुलगा दरिया इमाद शहा अधिकारावर आला. याच्या कालावधीतच जवळच्या राज्याबरोबर बिरार युद्ध सुरू झाले.

दरिया इमाद शहा याच्या मरणानंतर त्याचा मुलगा बालक बुरहान शहा अधिकारावर आला. याच्या काळात राज्य कारभाराचे सर्व अधिकार त्यांचा वजीर (सेनापती) तुशाल खान याच्या हाती गेले. पुढे विरार राज्य विजयपूर सुलतानांच्या ताब्यात गेल्यामुळे विरार राज्याचा शेवट झाला.

## आदिल शाहीची कामगिरी

विजयपूरच्या आदिलशाहीनी सुमारे 200 वर्षाच्या राज्यकारभारामध्ये शिक्षण, साहित्य, संगीत, चित्रकला आणि कला व वास्तुशिल्प क्षेत्रात भरीव कामगिरी केली आहे.

**शिक्षण:** आदिल शाही हे शिक्षण प्रेमी आणि पालक होते. यांची शिक्षणनिती इस्लाम संस्कृती वाढविणारी होती. मशीद, मदरसा (कॉलेज) शिक्षणाची केंद्रे होते. येथे

ज्ञान, धर्म, कायदा, काव्य, अलंकार शास्त्र इ. शिकवत होते. या शैक्षणिक संस्थानी राजाश्रय घेतला होता.

**साहित्य:** आदिल शाहीनी साहित्य क्षेत्राला दिलेले योगदान महत्वपूर्ण आहे. काहीजण स्वतः कवी असल्यामुळे साहित्य क्षेत्राला उच्च श्रीमंती प्राप्त झाली होती. पर्शियन, अरेबिक, उर्दू, कन्नड भाषेमध्ये अनेक साहित्य कृतींची रचना झाल्या.

| | | |
|---|---|---|
| पर्शियन कवी | : | फेरीस्ता 'तारीख-इ फरिस्ता' आणि 'गुलशन-ए- इब्राहिम' |
| उर्दू कवी | : | अब्दूलन 'इब्राहिम नामा' |
| मुल्ला नस्रती | : | 'अलिनाम' |
| कन्नड कवी | : | तोरवेय नरहरी कवी : 'तोखे रामायण' |

**संगीत:** युसूफ आदिलशहा आणि दुसरा इब्राहिम आदिल शहा महान संगीतकार होते. इब्राहिम आदिल शहाची 'कितान-ए-नवरस' ही कृती संगीत क्षेत्रातील श्रेष्ठ कृती झाली आहे. याने संगीत शाळा स्थापन केली. राज वंशातील आणि श्रीमंतवर्गातील स्त्रियाना संगीतामध्ये आवड होती.

**वर्ण (रंगीत) चित्रकला:** दुसरा इब्राहिम हा चित्रकलेचा भोक्ता होता. याने दरबारात अनेक पर्शियन कलाकाराना आश्रय दिला होता. त्यांचा राजवाडा, मशिदींच्या भिंती, वरील छावणीवर फुले, झाडे, वेली इत्यादी निसर्ग चित्रे सुंदर अशी रेखाटली आहेत. ही रंगीत चित्रे त्याकाळातील लोकांच्या आशा, आवड, परंपरा जोपासण्यासाठी उपयोगी ठरली.

**कला आणि वास्तुशिल्प:** कर्नाटकच्या वास्तुशिल्प इतिहासामध्ये विजयपूरच्या आदिलशाहीच्या रचनाना महत्वाचे स्थान आहे. त्यांच्या रचना म्हणजे किल्ले, राजवाडे, मशिदी आणि समाधी इ. होत. त्यानी निर्माण केलेली स्मारके ही इंडो-इस्लामीक शैलीमध्ये आहेत.

**अ) किल्ले:** विजयपूरच्या किल्ल्यांची रचना विशिष्ट प्रकारची असून 96 घुमट, (किल्ल्यांच्या पवळी वरती बांधावयाचे घुमट) 6 महाद्वार आहेत.

## ब) राजवाडे

**गगन महल:** गगन महलची निर्मिती इब्राहिम आदिल शहाने सा.श. 1620 मध्ये केली. गोपूर असलेली ही गगन महल तीन मजली आहे.

**मेहतर महल:** हा सुद्धा तीन मजली राजवाडा आहे. याची सुद्धा निर्मिती दुसरा इब्राहिम आदिल शहाने केली. हे अति सुक्ष्म कलाकृतीसाठी प्रसिद्ध आहे. याबरोबर असार महल मध्ये रंगीबेरंगी चित्रे असलेल्या खोल्या आहेत.



**असर महल, विजयपूर**



**गगन महल, विजयपूर**

## क) मशिदी

**जुम्मा (जामी) मशीद** याची निर्मिती अली आदिल शहाने केली. ही भव्यअशी मशीद प्रार्थना भवन या नावाने ओळखतात. ही भव्य इमारत अलंकारीत नसून अत्यंत साध्या सरळ पद्धतीने बांधलेली आहे. ही कला स्मारकांच्यामध्ये एक नवीन शैली म्हणून ओळखतात.

**इब्राहिम रोजा:** याची निर्मिती विजयपूर मध्ये दुसरा इब्राहिम आदिल शहाने त्याची पत्नी ताजबेगमच्या आठवणीसाठी निर्माण केली. यामध्ये इब्राहिम आणि त्याच्या कुटूंबीयांच्या सदस्यांच्या समाधी आहेत.हा भारतातील एकमेव रोजा आहे. याचे 'दक्षिण भारतातील दखनी ताजमहल' असे वर्णन केले आहे.

| |
|---|
| एका उंच अशा कट्ट्यावर समाधी आणि मशीद बांधलेली असून, सभोवती उद्यान (बाग) आणि संरक्षक भिंतीनी युक्त रचनेला रोजा असे म्हणतात |

**गोलघुमट :** महंमदाला रोजापेक्षाही मोठी वास्तू बांधायची होती. म्हणूनच त्याने विजयपूरमध्ये गोलघुमट हे समाधी मंदिर सा.श. 1656 मध्ये बांधले. या वास्तूच्या मध्यावर विशाल असा घुमट आहे. घुमटाच्या आतील भागात (Whispering Gallery) 'कुजबुजणारा सज्जा' आहे. हा त्यावेळच्या तांत्रिक कौशल्याधारीत बांधलेला आहे. 'गोलघुमट' हा जगातील दुसऱ्या क्रमांकाचा घुमट असलातरी भारतातील पहिल्या क्रमांकाचा मोठा घुमट आहे. ही वास्तू जगातील आश्चर्यापैकी एक आहे.



**गोलघुमट, विजयपूर**



मुल्ख मैदान तोफ,
विजयपूर



जामा मशीद, विजयपूर

**इतर प्रमुख स्मारके:** बारा कमान, बडे कमान, आनंदमहल, उपलीबुरूज, ताज विहीर, चांद बावडी इत्यादी इतर प्रमुख स्मारके आहेत.

## कृती

1) बहमन शाही आणि आदिल शाहीच्या वास्तुशिल्पांची चित्रे (फोटो) संग्रह. करून विवरण लिहा व आलबम तयार करा.
2) भारतामध्ये असलेल्या हिंदू, ख्रिश्चन, आणि मुस्लीम संस्कृतीची देवालये, चर्च आणि मशीदी व इतर स्मारकांची चित्रे (फोटो) संग्रह करून आलबम तयार करा.

## काल गणना (सामान्य शक)

| | |
|---|---|
| बहमनी राज्याच्या कार्यकाळ | : 1347 पासून 1527 |
| बीदरमध्ये मदरसाची स्थापना | : 1461 |
| आदिल शाहीचा कार्यकाळ | : 1489 पासून 1672 |
| इब्राहिम रोजाची निर्मिती | : 1626 |
| गोलघुमटची निर्मिती | : 1656 |

## अभ्यास

### I. रिकाम्या जागी योग्य शब्द भरा.

1) बहमनी साम्राज्याची .................... मध्ये स्थापना झाली.

2) कलबुरगी ................. सुलतानांची राजधानी होती.

3) फिरोज शहा सुलतानने भिमा नदीच्या काठावर ............. नगराची निर्मिती केली.

4) महमद गवानने .............. येथे मदरसा बांधविली.

5) बरीद शाही घराण्याचा संस्थापक .............. होता.

6) गोवळकोंड्याचा संस्थापक ............... होता.

7) इमादशाही घराण्याच्या संस्थापक ................ होय.

### II. खालील प्रश्नांची उत्तरे एका वाक्यात लिहा.

1) बहमनी घराण्याचा संस्थापक कोण?

2) महमद गवान कोण होता?

3) सोळाखांब मशीद कोठे आहे?

4) आदिलशाही सुलतानामध्ये सर्व श्रेष्ठ कोण?

5) दक्षिण भारतातील ताजमहल म्हणून कोणत्या स्मारकाला म्हणतात?

6) गोलघुमट कशासाठी प्रसिद्ध आहे?

7) जगद्‌गुरू बादशहा ही पदवी कोणाला होती?

## III. खालील प्रश्नांची गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

1) महमद गवानचे कार्य सांगा.

2) पाच शाही घराण्यांची नावे लिहा.

3) दुसरा इब्राहिम आदिल शहा धर्म सहिष्णुतेचा पुरस्कर्ता होता याची चर्चा करा.

## IV. खालील अ यादीला संबंधीत ब यादातील विषय ओळखून लिहा.

| अ | ब |
|---|---|
| आदिल शाही | अहमदनगर |
| कुतूब शाही | बिरार |
| निजाम शाही | विजयपूर |
| इमाद शाही | बीदर |
| बरीद शाही | गोवळकोंडा |

☆ ☆ ☆

| पाठ 3 | भक्तीपंथ आणि सुफी परंपरा |
|---|---|

## पाठाचा परिचय

दक्षिण आणि उत्तर भारतामध्ये आळ्वार, दास आणि उत्तर भारतामध्ये संत, सुफी संत भक्ती पंथाने समाजामध्ये जागृती निर्माण केली. या पाठामध्ये भक्ती पंथाचा आशय, अर्थ आणि लक्षणे सांगितलेली आहेत. दक्षिण भारतामधील आंडाळ, अक्कमहादेवी, कनकदास, पुरंदरदास, शिशुनाळ शरीफ यांचा परिचय दिला आहे. तसेच उत्तर भारतातील कबीरदास, गुरुनानक, तुळसीदास, मीराबाई, श्रीचैतन्य आणि सुफी संत्तांचा परिचय दिला आहे. विभिन्न धर्मांच्या लोकांमध्ये भक्ती पंथांनी साध्य केलेली एकरूपता तसेच स्थानिक भाषा समृद्ध बनविण्यासाठी केलेल्या योगदानाचे विवरण केले आहे.

## सामर्थ्ये

1) सामाजिक समानतेसाठी भक्तीपंथानी दिलेल्या उपदेशांचा अर्थ समजावून घेणे.
2) दासरपद आणि संतांच्या शिकवणी समजावून घेऊन आत्मसात करणे.
3) सुफी संतांनी दिलेले विशिष्ठ उपदेश विद्यार्थ्यांना समजावणे.

भारत हा अनेक संस्कृत्यांनी नटलेला एक देश आहे. या आपल्या देशामध्ये जात व्यवस्था, अंधश्रद्धा, तत्वहिन आचरण  समाजात रूढ होते. सामान्य लोकांना मोक्ष म्हणजे मृगजळासारखे होते. त्यासाठी ते योग्य नाहीत अशी धारणा मध्ययुगातील समाजात होती. अशा परिस्थितीमध्ये उदयाला आलेले काही भक्ती पंथ आणि सुफी परंपरेच्या संतांनी धार्मिक व सामाजिक सुधारणेसाठी पुढाकार घेतला. त्यानी वैश्विक बांधव्याला महत्व देऊन, मोक्ष मिळविण्यासाठी भक्ती हाच उत्तम मार्ग आहे असे सांगितले. या संप्रदायाला भक्ती पंथ म्हणतात.

भक्ती म्हणजे देवाला शरण जाणे होय. भक्ती हा संस्कृत शब्द भूज या धातूपासून आला आहे. भूज म्हणजे ज्ञान असा अर्थ होतो.

## भक्ती पंथाचे सार

1) भक्तीपंथ उच्च-निच या भेदभावाचे खंडण करतो, समानतेची शिकवण देतो.
2) भक्ती पंथातील संतांनी तत्वहीन आचरणाला विरोध केला.
3) या संतानी लोकांच्या एकतेसाठी कार्य केले.
4) अनेक देव नसून देव एकच आहे. धर्म म्हणजे प्रेम आणि मानवसेवा होय असे सुफीसंतानी सांगितले.

## दक्षिण भारतातील भक्ती परंपरा

### आंडाळ



आंडाळ

तमिळनाडूमधील विष्णूभक्त 12 आळ्वारापैकी 'आंडाळ' एक होय. विष्णू चित्तांची मानलेली मुलगी ही 'आंडाळ'. विष्णू चित्तदेखील एक आळ्वार होते. यांना पेरियाळ्वार या नावाने ओळखले जाते. आळ्वारांचे मूळ नाव गोदादेवी. ती कृष्ण भक्त होती. श्री विल्लीपुत्तुरमधील कृष्णदेवस्थानामध्ये यांचे वडील फुलांचा हार बनवून देवाला अर्पन करीत होते. आंडाळ यांचे कृष्णावर फार प्रेम होते व कृष्णाला ती आपला पती मानत होती. यानी 'तिरूप्पमै' नावाचा ग्रंथ रचून देवाला समर्पित केला. तमिळनाडू मध्ये 'तिरुप्पमै' च्या प्रचारामध्ये यांनी फार प्रसिद्धी मिळविली. आळ्वारांच्यामते सर्व विष्णूभक्त समान, त्यांची जात विचारणे म्हणजे घोर पाप करणे होय.

## अक्कमहादेवी


अक्कमहादेवी

12 व्या शतकातील वचन चळवळीमध्ये भाग घेतलेली घाडसी महिला म्हणजे अक्कमहादेवी होय. कन्नड वचन साहित्याला यांनी दिलेली देणगी ही अत्यंत मोलाची आहे. शिवमोग्गा जिल्हयाच्या उडूतडीमध्ये अक्कमहादेवी यांचा जन्म झाला. यांचे वडील निर्मलशेट्टी व आई सुमती. लहान-पणापासूनच त्या शिवभक्तीमध्ये दंग असायच्या. चन्नमल्लिकार्जुनांना त्या आपला पती मानत होत्या. जबरदस्तीने अक्कमहादेवी यांचे लग्न आई वडीलांनी राजकुमार कौशिक यांच्या बरोबर लावले. गुरु, लिंग व जंगम सेवेमध्ये व्यत्यय येत असल्याने अक्कमहादेवीनी राजभोगाचा त्याग केला. वस्त्रत्याग करून घराबाहेर पडल्या. बसवेश्वरानी स्थापन केलेल्या अनुभव मंटप मध्ये काही दिवस राहील्या. तेथे 'चन्नमल्लिकार्जुन' या धारण नामाने अनेक वचनांची रचना केली. सर्व भक्त लोकांना अक्कमहादेवीबद्धल अपार गौरव व आदर होता. कल्याणहून श्रीशैलला जाऊन शेवटचा काही काळ त्या श्रीशैलमध्ये व्यतीत केला. अखेर कदळी वनामध्ये त्यांचा मृत्यू झाला.

## पुरंदर दास (सा. श. 1480-1564)


पुरंदरदास

कन्नड दास साहित्यातील श्रेष्ठ व्यक्ती म्हणजे पुरंदर दास होय. पुरंदर दास यांचा जन्म पुरंदरगडमध्ये झाला. त्यांचे मुळ नाव श्रीनिवास नायक, वडील वरदप्प नायक व आई लिलावती. पुरंदर दासांची पत्नी लक्ष्मीबाई अत्यंत धार्मिक स्त्री होती.

कंजूस आणि नास्तीक असे श्रीनिवास नायक देवाच्या परिक्षेमध्ये पराजित होऊन आपल्या संपत्तीचा त्याग करून परमेश्वरांच्या नामस्मरणामध्ये लीन झाले. किर्तन करीत अनेक गावांचा प्रवास करीत कृष्णदेवरायांच्या संस्थानामध्ये गेले. तेथे व्यासरायांनी यांना दिक्षा

दिली व 'पुरंदर' असे नामकरण केले. अशातऱ्हेने ते पुरंदरदास झाले. पुरंदर दासांच्या पदामध्ये मानवी मुल्यांचा अंतर्भाव आहे. यानी आपल्या किर्तनातून जाती पद्धतीचे खंडन केले. यामध्ये तत्व, नीती व संगीत यांचा संगम पहावयाला मिळतो. यांना 'कर्नाटक संगीत पितामह' म्हणून ओळखतात. 'पुरंदर विठ्ठल' या धारण नामाने अनेक किर्तनांची रचना केली. 'दास म्हणजे पुरंदरदास' अशी स्तुती त्यांचे गुरु व्यासरायानी केली.

## कनकदास (सा.श. 1508–1606)



कनकदास

दास साहित्यातील श्रेष्ठ किर्तनकार कनकदास यांचा जन्म सुमारे सा.श. 1508 मध्ये हावेरी जिल्हयातील बंकापूर तालूक्यातील बाड गावामध्ये झाला. यांचे मूळ नाव तिम्मप्पा. वडीलांचे नाव बिरप्पा आणि आईचे नाव बच्चम्मा होते. हे शूरवीर असून एक उत्कृष्ट कवी देखील होते. बाड गावच्या शेजारील 78 गावाला नाडगौड (पाटील) आणि मुख्य नायक म्हणून कार्य करीत होते. याना सोनं मिळाल्यामुळे कनक असं नाव आले असावे अशी कथा आहे. कौटुंबीक जीवनात वैराग्य प्राप्त करुन व्यासरायांचे शिष्य झाले. पुढे ते कनकदास म्हणून ओळखले जाऊ लागले. यानी अनेक किर्तनांची रचना केली. 'आदि केशव' हे त्यांचे धारण केलेले नाव. कागिनेलेच्या आदि केशव देवाचे ते उपासक होते. यांनी आपल्या किर्तनातून अंधश्रद्धेचे खंडन करून भगवंताकडे जाण्याचा मार्ग लोकांना दर्शविला. आपल्या कीर्तनातून यानी जाती पद्धतीची विडंबना मांडली आहे.

**कनकन किंडी (कनकदासाची खिडकी):** उडूपीच्या देवालयामध्ये तेथील पुरोहितानी कनकदासाना प्रवेश दिला नाही. कनकदासांची भक्ती पाहून श्रीकृष्ण पश्चिमाभिमूख होऊन खिडकीमधून कनकदासाना दर्शन दिले अशी आख्यायिका आहे. कनकदासानी हरिभक्तीसार, नळचरित्रे, रामध्यान चरिते अशा शट्पदी काव्यांची रचना केली. तसेच मोहन तरंगिनी नावाची कृती त्यांनी रचली.

### शिशुनाळ शरीफ


शिशुनाळ शरीफ

शिशुनाळ शरीफ हे पहिले कन्नड मुस्लीम अनुभवी कवी होते. यांना 'कर्नाटक कबीर' म्हणून ओळखले जाते. शिशुनाळ या गावामध्ये 1819 मध्ये यांचा जन्म झाला. यांचे वडील इमाम साहेब व आई हज्जमा. शरीफ यांना लहानपणापासूनच हिंदू मुस्लीम दोन्ही धर्माची चांगली माहिती होती. मुल्की परीक्षा पास होऊन काही काळ शिक्षक म्हणून सेवा बजावली. गुरु गोविंद भट्ट यांच्याकडून दिक्षा घेऊन अनेक तत्वपदांची रचना त्यानी केली. त्यांच्या पदामध्ये रिवायत् (मोहरम पद) आहेत. धार्मिक नीतीपद, अलावीपद, सवाल-जवाब पद आहेत. शिशुनाळमध्ये यांची समाधी आहे. हिंदू-मुस्लीम लोक यांचा आदर करतात. जाती धर्म यांची चौकट ओलांडून यानी मानवी मूल्यांची जोपासना केली.

## 3.2 उत्तर भारतातील भक्ती परंपरा

### कबीरदास (सा.श. 1398-1518)


कबीरदास

भक्तीपंथामधील प्रसिद्ध संत कबीर हे रामानंदांचे शिष्य होय. यांनी हिंदू-मुस्लीम धर्मामध्ये समरस्यता आणण्याचा प्रयत्न केला. वाराणशीमधील विनकर मुस्लीम समाजातील निरू आणि निमर या दांपत्याचा मानलेला मुलगा होता. जाती पद्धती, अवडंबराचे जीवन, ब्राह्मण श्रेष्ठता, धार्मिक असमानता यांचे खंडन केले. अल्ला आणि राम ही एकाच देवाची दोन नावे आहेत असे सांगितले. कबीरदास म्हणतात हिंदू आणि मुस्लीम लोक म्हणजे एकाच मातीपासून बनलेली मडकी होय. मी राम आणि अल्लाचा मुलगा आहे असे कबीर म्हणत. देहदंड, उपवास, तिर्थयात्रा, पवित्र स्थानापासून आपण देवाला प्रसन्न करू शकत नाही. पण पवित्र भक्तीने मात्र आपण देवाला प्रसन्न

करू शकतो. कबीरदास आपली शिकवण लोकांना अर्थ होईल असे ‘दोहे’ (दोन ओळींची कवीता) च्या माध्यमातून दिली. यांच्या अनुयायाना कबीरपंथी म्हणून ओळखले जाते.

## गुरुनानक (सा.श. 1469–1539)



गुरुनानक

गुरु नानक शीख धर्माचे संस्थापक होय. यांचा जन्म सध्याच्या पाकिस्तानातील पंजाबमधील तळवंडी गावामध्ये 1469 साली झाला. वडीलांचे नाव मेहताकलू (कालूचंद) आणि आईचे नाव तृप्ता होते. गुरुनानक यांनी हिंदू-मुस्लीम धर्मातील समान विचारांना लोकामध्ये ठासून मांडले. ग्रंथ साहेब या शिखांच्या पवित्र ग्रंथामध्ये जपजी नावाने ओळखले जाणारी गीते आहेत. देवाचे नामस्मरण करणे व चांगले कार्य करण्याला शिखपंथ महत्व देतो. स्त्रि-पुरुषामधील समानतेबद्धल जोर देऊन सांगितले आहे. गुरुनानक हे अत्यंत आस्तिक होते. विश्वामध्ये देव एकच आहे असे ठासून सांगितले. फसवणुक, छळ, चोरी, हिंसा करू नये, गुरु कडून भक्ती व भक्ती मार्गाने मुक्ती मिळविता येते असे सांगितले. मूर्तीपूजा, जातपद्धती, सतीपद्धती अशा सामाजिक अनिष्ठ प्रथांचा त्यांनी विरोध केला. भारत भ्रमण करताना ते कर्नाटकला देखील आले होते. त्यांनी वास्तव केलेल्या बीदरमधील खोलगट स्थळाला नानक झरा (गोड पाण्याचा झरा) म्हणून संबोधतात.

## तुळसीदास (सा.श. 1532–1623)



तुळसीदास

उत्तर भारतामधील भक्ती मार्गाचे प्रतिपादन करणाऱ्यापैकी तुळसीदास अग्रगण्य संत होते. ब्राह्मण कुटुंबामध्ये जन्मलेल्या तुळसीदासानी हिंदी साहित्याला दिलेली देणगी मोलाची आहे. यानी ‘रामचरित मानस’ या ग्रंथाची रचना केली. हिंदी साहित्यातील ही श्रेष्ठ कृती आहे. उत्तर भारतामध्ये ‘तुळसी रामायण’ म्हणून ही कृती प्रसिद्ध आहे. रामभक्त तुळसीदासानी दैवभक्ती, परिशुद्ध जीवन, प्रिती, प्रेम, सहनशिलता, उदार भावना लोकाच्या मनामध्ये रूजविले.

## मीराबाई (सा.श. 1498–1569)



मीराबाई

'कलियुगातील राधा' या नावाने प्रसिद्ध असलेल्या मीराबाई भारत देशातील एक महान किर्तनकार होत्या. त्यांचा जन्म राजस्थानातील रजपूत राजघराण्यात झाला. राजा रतनसिंग यांची मुलगी मिराबाईचा मेवाडच्या राजकुमाराबरोबर विवाह झाला. बालपनापासूनच आध्यात्मिक ओढ असल्यामूळे पूजा, ध्यान आणि किर्तनामध्ये वेळ व्यतीत करीत होत्या. यांच्या कृष्ण भक्तीला सासूचा कठोर विरोध होता. या त्रासाने मिराबाईने राजभोगाचा त्याग करून श्री कृष्णाच्या क्षेत्रामध्ये म्हणजे वृंदावनाला गेल्या. त्यांनी रचलेल्या किर्तनामध्ये भक्ती, प्रेम भरून ओसंडत होते. गिरीधर गोपाल हे त्यांच्या भगवंताचे नाव होते. त्यांच्या शेकडो भजनामुळे मिराबाई जनमानसात अजरामर झाल्या.

## चैतन्य (सा.श. 1485–1533)



चैतन्य

चैतन्य यांचा जन्म पश्चिम बंगाल मधील नवद्विप (नाडीया) येथे सा.श.1485 मध्ये झाला. वडील जगन्नाथ मिश्रा व आई सचिदेवी होय. विश्वंबर हे चैतन्य यांचे पुर्वीचे नाव होते यांचे गुरु ईश्वरीपुरी होय. चैतन्य आपल्या वयाच्या 25 व्या वर्षी संसाराचा त्याग करून सन्यास स्वीकारला. जातीभेदाचा तिव्र विरोध केला. मुक्तीसाठीचा एकमेव मार्ग म्हणजे भक्ती होय अशी शिकवण त्यानी दिली. चैतन्य यांनी भारतभर तिर्थयात्रा केली आणि प्रेमाचा संदेश दिला. प्रेम, बंधुता आणि दानशिलत्व हे चैतन्यांच्या उपदेशाचा सारांश आहे. सध्याचे हरेकृष्ण पंथ यांच्यापासून प्रभावित झाले आहे. चैतन्य याना श्री कृष्णांचा अवतार मानणारी बंगालमधील जनता त्यांना 'चैतन्य महाप्रभू' म्हणून संबोधित असत.

## भक्ती पंथांचे परिणाम

- ✲ भक्ती संत हे हिंदू-मुस्लीम यांच्यातील समानता राखण्यास कारणीभूत झाले.
- ✲ भक्ती संतानी लोकांच्या स्थानिक भाषेत साहित्याची रचना केली. त्यामुळे भारतीय भाषा समृद्ध झाल्या.

## सुफी परंपरा

हिंदुंच्यामध्ये कबीर, कनकदास, श्री चैतन्य अशा संतांनी धर्मजागृती केली. त्याप्रमाणे मस्लिमांच्यामध्ये सुफी संतांनी धर्मजागृती केली. हिंदू-मुस्लीम यांच्या एकतेसाठी झटले. सुफी पंथाचा उदय अरेबियामध्ये होऊन भारतामध्ये प्रवेश झाला.

सुफी हा शब्द 'साफ' या शब्दापासून आला आहे. साफ म्हणजे शुद्ध अथवा स्वच्छ असा अर्थ होतो. साधे लोकरी कपडे घालणाऱ्या विचारवंताना सुफी म्हणतात. सुफी पंथाला कुराण मुळआधार आहे.

## सुफी पंथाचे सार

1) देव एकच असून तो सर्व शक्तीमान आहे. आपण सर्व त्याची मुले आहोत.

2) चांगल्या कामाला महत्व दिले आहे.

3) सर्व मानव समान आहेत.

4) जाती पद्धतीचा विरोध केला आहे.

कालपरत्वे योग, वेदांत आणि बौद्ध धर्माच्या मतांच्या चिंतनाने, सुफिसंत प्रभावित झाले. धर्म म्हणजे प्रेम, मानवाची सेवा हे सुफीसंतांचे मूळ तत्व आहे.

### निजामुद्दीन औलिया



हे भारताचे प्रमुख सूफी संत होय. यानी दिल्ली मध्ये राहून गरीबीचे जीवन व्यतीत केले. गवताच्या काडयाची मशिदी हे त्यांच्या उपक्रमाचे केंद्र स्थान होते. दिल्लीच्या सुलतानानी दान म्हणून दिलेल्या गावाचा यानी त्याग केला. राजकारणापासून दूर राहिले. त्यांना भेटायला आलेल्या भक्ताना सद्गुण आणि करूणेचे (दयेचे) संदेश देत होते.

### ख्वाजा बंदेनवाज

बंदेनवाज हे प्रसिद्ध चिस्ती सूफी संत होय. हे दिल्लीच्या नासिरूद्दिन यांचे शिष्य होते. बंदेनवाज म्हणजे शरण येणाऱ्यांचे रक्षण करणे असा अर्थ होतो. गेसुदराज असे यांचे दुसरे नाव होते. गेसुदराज म्हणजे 'लांब केसाचा' असा अर्थ होतो. या अगोदरचे नाव सैयद महंमद हुसैनी होते. यांना संस्कृत, अरबी, पारसी, दखनी (उर्दू) अशा अनेक भाषा अवगत होत्या. हे कलबुरगी येथे राहिले. राजा फिरोज शहा यांचा खूप गौरव करत होते. यांनी दखनी भाषेमध्ये साहित्याची रचना केली. आजदेखील कलबुरगीच्या दर्ग्यामध्ये यांच्या साहित्याचे भांडार पाहू शकतो. कलबुरगीमध्ये प्रत्येक वर्षी यांचा उरूस चालतो.

### चिस्ती पंथ

सूफी पंथामध्ये चिस्ती हा एक प्रमुख गट होता. याची स्थापना मुइनिद्दिन चिस्ती यानी केली. यानी अजमेरला येऊन तेथेच आपल्या केंद्राची स्थापना केली. देवभक्ती, गुरुसेवा, सन्मार्गाने चालणे ही चिस्ती अनुयायांची लक्षणे होती. चिस्तींना हिंदू-मुस्लीम यातील एकते बद्धल काळजी होती. यानी लोकांच्यासाठी स्थानिक भाषेतून ग्रंथरचना केली. आग्र्याचे फत्तेपूर येथील सलीम चिस्ती प्रसिद्ध होते.



**सलिम चिस्तीचे थडगे, आग्रा**

| | |
|---|---|
| लाहोर (आजचे पाकिस्तान) | : शेख ईस्माइल |
| अजमेर | : ख्वाजा मोइनुद्दिन चिस्ती |
| दिल्ली | : निजामुद्दीन औलिया |
| अर्काट | : टीपू मस्तार औलिया |
| कलबुरगी | : ख्वाजा बंदेनवाज |

## कालगणना (सा.श.)

| | |
|---|---|
| निजामुद्दीन औलिया | 1238 ते 1325 |
| कबीरदास | 1440 ते 1518 |
| गुरुनानक | 1469 ते 1539 |
| पुरंदरदास | 1480 ते 1564 |
| श्री चैतन्य | 1485 ते 1533 |
| मिराबाई | 1498 ते 1569 |
| कनकदास | 1508 ते 1606 |
| तुळसीदास | 1532 ते 1623 |

## अभ्यास

### I. योग्य शब्दाने रिकाम्या जागा भरा.

1) अक्कमहादेवी यांच्या वचनाचे धारण नाव ................ होय.
2) पुरंदर दास .................. संस्थानामध्ये होते.
3) 'आदिकेशव' हे ................ यांचे धारण नाव आहे.
4) कर्नाटकचे कबीर असे ...............याना म्हणतात.
5) चैतन्य यांचे पूर्वीचे नाव .............. होते.
6) सुफी संत ख्वाजा बंदेनवाज यांचे दुसरे नाव .............. होते.

### II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) आंडाळ यांचे पूर्वीचे नाव काय?
2) अक्कमहादेवी यांचा जन्म कोठे झाला?
3) कर्नाटक संगिताचे पितामह कोण?
4) कनकदासांच्या आई वडीलांचे नाव काय?
5) प्रथम कन्नड मुस्लीम कवी कोण?
6) शिखांचा पवित्र ग्रंथ कोणता?
7) कलीयुगातील राधा असे कोणाला संबोधले जाते?
8) सुफी पदाचा अर्थ लिहा.
9) भारतातील सुफी संतांची नावे लिहा.
10) चिस्ती पंथाची स्थापना कोणी केली?

### III. दोन अथवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) कबीर दासानी केलेले उपदेश लिहा.
2) गुरुनानक यांची शिकवण लिहा.
3) भक्ती पंथाचे परिणाम लिहा.
4) सूफी पंथाचे सार लिहा.

## IV अ गटातील संबंधित ब गटातील विषयांशी जोडी जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| गुरुनानक | सूफीसंत |
| चैतन्य | शीख धर्म |
| निजामुद्दीन औलिया | कलियुगाची राधा |
| मिराबाई | हरेकृष्ण पंथ |

### चर्चा करा.

भक्ती संतांच्या शिकवणी बद्धल चर्चा करा.

## उपक्रम

1) भक्तिसंतांची भावचित्रे माहितीसह संग्रह करा.
2) श्री चैतन्य, गुरुनानक, मिराबाई, तुळसीदास, कबीर, सूरदास, आणि सूफी संतांचे जीवन चरित्र वाचा.
3) मिराबाईची भजने ऐका.
4) इंटरनेटवरून सूफीसंतांचे विचार संग्रहीत करा. भारतातील अनेक धर्मातील समाजावर त्यांचा पडलेला प्रभाव आणि आत्ताचा समाज या विषयावर चर्चा आयोजित करून एक पान अहवाल लिहा.

☆ ☆ ☆

| पाठ 4 | नायक पाळेगार आणि नाडप्रभू |
|---|---|

## पाठाचा परिचय

विजयनगरच्या पतनानंतर काही दशकात कर्नाटक मुख्य तीन भागात विभागला गेला. ते म्हणजेच विजयपूर, केळदी आणि म्हैसुरू. विजयपूर राज्याच्या पतनानंतर कर्नाटकाचा बहुतेक भाग मोगल आणि मराठयांच्या अधिपत्याखाली आला. यामध्ये आपले राज्य स्वतंत्रपणे सांभाळून केळदी आणि मैसुरू राजानी विजयनगरची परंपरा आपापल्या प्रदेशात चालू ठेवली. इतकेच नाहीतर चित्रदुर्ग, यलहंका (बेंगळूरु), सुरपूर इत्यादी सेना विभाग निर्माण झाले.

या पाठात केळदीचे नायक, चित्रदुर्गचे नायक, सुरपूरचे नायक आणि यलहंकाचे नाडप्रभू यांच्या कार्याची माहिती दिलेली आहे.

## सामर्थ्ये

1) मोठे व्यंकटप्पा नायक आणि शिवप्पा नायक यांचे कार्य समजून घेणे.
2) रानी चन्नम्माची वीरगाथा समजून घेणे.
3) केळदीच्या नायकांची परधर्म सहिष्णूतेचा गौरव समजून घेणे.
4) चित्रदुर्गच्या पाचव्या मदकरी नायकाचे शौर्य व कार्याबद्धल माहिती मिळविणे.
5) सूरपूरचे नाल्वडी वेंकटप्पा नायक यांच्या कार्याची ओळख करून घेणे.
6) सुरपूरच्या नायकांनी सांस्कृतिक क्षेत्राला दिलेल्या योगदानाची माहिती मिळविणे.
7) यलहंकाचे नाडप्रभू असलेले पहिले केंपेगौडा आणि दुसरे केंपेगौडा यांचे कार्य समजून घेणे.

## केळदीचे नायक (सा.श. 1499–1763)

**नायक** विजयनगर साम्राज्याच्या अधिपत्याखाली अनेक लहान लहान राजे होते. याना नायक अथवा पाळेगार म्हणत. हे नायक आपल्या ताब्यात असलेल्या सीमांचे रक्षण करत. म्हणून त्यांना 'पाळेयपट्टू' म्हणत. नायकामध्ये केळदी आणि चित्रदुर्गांचे नायक हे प्रमुख होते.

विजयनगरच्या काळात शिवमोग्गा जिल्हयात केळदी राज्याची स्थापना सा.श. 1499 मध्ये झाली. पुढे ते स्वतंत्र बनले. केळदीच्या नायकानी कर्नाटकची किनारपट्टी व मलनाड प्रदेशावर राज्यकारभार केला.

केळदी संस्थान विशाल आणि संपन्न होते. शिवमोग्गा, दक्षिण कन्नड, उडुपी, केरळचे कासरगोड, कोडगू, हासन, तुमकूरु, चित्रदुर्ग, धारवाड आणि उत्तर कन्नड या भागाचा केळदी राज्यात समावेश होता.

**मोठे व्यंकटप्पा नायक (सा.श. 1582–1629)** व्यंकटप्पा नायक केळदी राजामध्ये अत्यंत प्रसिद्ध होता. याच्या काळात केळदी संपूर्ण स्वतंत्र झाले. यानी किनारपट्टी वरील चंद्रगिरी नदीपर्यंत विजय संपादन केला. उल्लाळची राणी अब्बकाच्या मदतीने मंगळूरुमध्ये पोर्तुगीजांचा पराभव केला. विजापूरच्या आदीलशहाच्या सैन्याचा पराभव करून हानगल येथे विजयस्तंभ उभारला. त्याने सर्व धर्माना प्रोत्साहन दिले.

### शिवप्पा नायक (सा.श. 1645–1660)

शिवप्पा नायक हा केळदीचा प्रसिद्ध राजा होता. याने किनारपट्टीवरील पोर्तुगीजाकडून किल्ला जिंकून 'पश्चिम समुद्राचा राजा' ही पदवी धारण केली. राज्याच्या रक्षणासाठी बेकल, चंद्रगिरी (केरळ) आणि मंगळूरु इ. ठिकाणी सुरक्षित किल्ले निर्माण केले. धर्मावर श्रद्धा असलेल्या शिवप्पाने आपले सामर्थ्य वाढविण्यासाठी अनेक यज्ञ केले.

व्यापार वृद्धीसाठी गोव्याच्या व्यापाऱ्याना आपल्या राज्यात येऊन व्यापार करण्यास प्रोत्साहन दिले. गोव्याचे ख्रिस्ती शेतीमध्ये निपूण होते. त्याना आपल्या राज्यात स्थलांतरीत होण्यास जमीन, पैसे देऊन प्रोत्साहन दिले.

**शिवप्पा नायकाची सिस्तू** शिवप्पा नायकानी लागू केलेल्या महसूल व्यवस्थेला 'सिस्तू' असे म्हणतात. यापद्धतीप्रमाणे जमिनीची उत्पादन क्षमता लक्षात घेऊन त्यावरून महसूल ठरवला जात असे. उत्पन्नाच्या 1/3 भाग महसूल रूपात संग्रहित केला जात असे. अशा क्रमबद्ध महसूल व्यवस्थेला 'शिवप्पा नायकाची सिस्तू' असे म्हणतात. यामुळे डोंगराळ असलेल्या भागाचा विकास झाला.

**राणी चन्नम्माजी (सा.श. 1671–1696)** शिवप्पा नायकनंतर त्यांची सून राणी चन्नम्माने राज्य चालविले. तिने मोगलांच्या सैन्याला पळवून लावून शिवाजी महाराजांचा मुलगा राजारामला संरक्षण दिले. कन्नड राज्याची शौर्य, त्यागाची मूर्ती चन्नम्माने म्हैसूरुच्या सैन्याबरोबर युद्ध केले.

केळदी राजानी देवालयांची, मठांची तसेच कारागृहाची स्थापना केली. इक्केरीचे अघोरेश्वर देवालय शिल्पकलेसाठी प्रसिद्ध आहे. मठ अन्नछत्र आणि शिक्षणाची केंद्रे होती. सर्व धर्मांना भरपूर दान दिले. चन्नमाजीने मंगळूरात चर्चसाठी जमीन दिली.

मैसुरू राज्याबरोबर सततची स्पर्धा आणि आंतरिक युद्धामुळे केळदी राज्य दुर्बल बनले. पुढे हैदरने ते जिंकून घेतले.

## कालगणना (सा.श.)

* केळदी राज्याचा कार्यकाल : 1499-1763
* मोठे व्यंकटप्पा नायक : 1586-1629
* शिवप्पा नायक : 1645-1660
* राणी चन्नमाजी : 1671-1696
* हैदर अलीने केळदीचा पराभव केला : 1763

### I] रिकाम्या जागा योग्य शब्दाने भरा.

1) पोर्तुगीजाना हरविण्यासाठी मोठ्या वेंकटप्पा नायकाला मदत केलेली उल्लाळची राणी ....................होय.

2) राणी चन्नम्मानी मोगलाना पळवून लावून ............ ला संरक्षण दिले.

### II] खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) केळदीच्या इतिहासात पश्चिम समुद्राचा राजा असे कोणाला म्हणतात?

2) गोव्याच्या ख्रिश्चनाना शिवप्पा नायकाने कसे प्रोत्साहित केले?

3) सिस्तू म्हणजे काय?

4) राणी चन्नम्माजी कोण होत्या?

### III] दोन किंवा तीन वाक्यात उत्तरे द्या.

1) मोठ्या वेंकटप्पा नायकाचे कार्य कोणते?

2) केळदीच्या नायकानी केलेल्या कामगिरीची माहिती लिहा.

## चित्रदुर्गचे नायक

चित्रदुर्गच्या नायकाना कर्नाटकाच्या इतिहासात मोठे स्थान आहे. त्यांनी 16 व्या शतकापासून 18 व्या शतकापर्यंत राज्यकारभार केला.

13 नायकानी 211 वर्षापर्यंत या संस्थानावर राज्य केले. मंत्री तिमप्पा नायक (सा.श. 1568-1589) हा या संस्थानचा पहिला राजा होय. पहिला कस्तुरी रंगप्पा

नायक (सा.श. 1603-1652), कस्तुरी चिक्कण्णा नायक (सा. श.1675-1686) बिच्चु गती भरमाप्पा नायक (सा.श. 1689-1721) मोठा मदकरी नायक (सा.श. 1721-1749) इत्यादी प्रसिद्ध राजे होऊन गेले.

## राजा वीर मदकरी नायक (सा.श. 1754-1779)

हा चित्रदुर्गच्या नायकापैकी अत्यंत प्रबळ आणि प्रसिद्ध राजा होता. वयाच्या केवळ 12 व्या वर्षी तो सिंहासनावर बसला. मदकरीने बऱ्याच युद्धामध्ये हैदर अलीला सहाय्य केले होते. परंतु तरीसुद्धा हैदर अली मदकरी नायकाच्या शौर्याचा मनातल्या मनात मत्सर करीत असे. त्याने चित्रदुर्गच्या सात पदरी किल्ल्याला वेढा घातला. पण तो भारी किल्ला जिंकणे हैदरला शक्य झाले नाही. त्यामुळे त्याच्या सैनिकानी किल्ल्यात प्रवेश करण्याच्या गुप्त मार्गाचा शोध लावला. पहारेकरी नसताना त्या मार्गाने किल्ल्यात प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. त्यावेळी पहारेकऱ्याची पत्नी ओब्बव्वा हिने बाजूला असलेल्या मुसळाने अनेक शत्रू सैनिकाना ठार केले. आजसुद्धा आपल्याला चित्रदुर्ग किल्याच्या पश्चिमेला 'ओब्बव्वाची खिंड' पहावयास मिळते.

स्वतःला पराभूत न मानता हैदर अलीने पुन्हा एकदा चित्रदुर्गला वेढा दिला. भयंकर युद्ध झाले. या युद्धात मदकरीचा पराभव झाला. मदकरीच्या राजवटी बरोबर चित्रदुर्गच्या नायकांचा वंश संपुष्टात आला.

चित्रदुर्ग हा एक डोंगरी आकर्षक किल्ला आहे. समकेंद्रीत सात तटानी बंदीस्त आहे. त्याच्या आत काही देवालये व तलाव आहेत. चित्रदुर्गच्या नायकानी अनेक देवालयांची निर्मिती केली. भरमसागर आणि भीमसमुद्र ही जलाशये त्यांची देणगी आहे. आपल्या शौर्य व साहसासाठी ते प्रसिद्ध होते.

## कालगणना (सा.श.)

| | |
|---|---|
| तिम्मण्णा नायक | : 1568-1589 |
| बिच्चुगत्ती भरमप्पा नायक | : 1689-1721 |
| मोठे मदकरी नायक | : 1721-1749 |
| राजा वीर मदकरी नायक | : 1754-1779 |

## खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) मत्ती तिम्मण्णा नायक कोण होता?
2) राजा वीर मदकरी नायक याबद्धल टिपा लिहा.
3) ओनके ओब्बवाचे आपण आजही स्मरण का करतो?
4) चित्रदुर्गच्या नायकानी निर्माण केलेल्या तलावांची नावे लिहा.

## सुरपूरचे नायक

यादगिरी जिल्हयातील सुरपूर हे कृष्णा आणि भीमा नद्यांच्या मध्ये वसलेले होते. सा.श. 1636 पासून 1858 पर्यंत एकूण 12 नायक राजानी राज्यकारभार चालवला. 'गड्डीपिड्डनायक' हा या घराण्याचा संस्थापक होय. त्यांचे पूर्वज विजापूरच्या सैन्यामध्ये होते. विजयनगरच्या अवनतीनंतर वेगवेगळ्या गटात विभागले गेले.

त्यानंतर विजयपूरच्या आदीलशहाच्या सांगण्यावरून 'वागीनगेरी' येथे आपला राज्यकारभार सुरू केला. पितांबरी बहरी पिड्डनायक (सा.श. 1687-1726) याने 1707 मध्ये सुरपूरची निर्मिती करत त्याला राजधानीचा दर्जा दिला.

त्यानंतर ब्रिटीश आणि हैद्राबादच्या निजामानी एकमत करून हे संस्थान आपल्या अधिपत्याखाली घेतले. राजा कृष्णप्पा नायक नंतर त्याचा मुलगा राजा नाल्वडी वेंकटप्पा नायक (सा.श. 1843-1858) हा अधिकारावर आला. त्याचवेळी उत्तर भारतामध्ये प्रथम स्वातंत्र संग्राम (सा.श. 1857) ची झळ सुरपूरला येऊन धडकली. नाल्वडी वेंकटप्पा नायकने दक्षिण भारतातील सर्व राजाना एकत्र करून ब्रिटीशांच्या विरुद्ध लढण्यास सज्ज केले. अरब, रोहिल यानासुद्धा सैन्यात समावेश करून घेतला.

एवढेच नव्हे तर सैन्याला प्रशिक्षण देण्यास सुरूवात केली. ही सर्व माहिती ब्रिटीश अधिकारी 'थॉर्न हिल' ला मिळाल्यावर 24 डिसेंबर 1857 रोजी त्यानी कॅप्टन कँबल याना पत्र लिहून तातडीने कारवाई करण्याचा आदेश दिला.

ब्रिटीशांच्या सैन्याचा एक गट 1858 मध्ये सुरपूर मध्ये घुसला. दोन्ही गटामध्ये चकमक उडाली. रागाने लाल होऊन सुरपूरचे सैन्य स्टूअर्टवर चाल करून गेले. तसेच त्याची हाडे मोडली. न्यूबेरीला ठार मारले. इकडे नाल्वडी वेंकटप्पा नायक विशेष असे अरब रोहिलचे सैन्य आणण्यास हैद्राबादला गेला. तिकडे ब्रिटीश सुरपूरमध्ये घूसले. त्यांनी सुरपूरचा पराभव करून आपल्या ताब्यात घेतले. हैद्राबादमध्ये फिरणाऱ्या नाल्वडी वेंकटप्पा नायकांची माहिती वनपर्ती राजाकडून ऐकून हैद्राबाद निजामचा प्रधानमंत्री सालारजंगने ब्रिटीशाकडून स्वतःला फायदा होईल. या उद्देशाने ब्रिटीशांना साथ दिली. ब्रिटीशांनी नाल्वडी वेंकटप्पा नायकला सिंकदराबाद येथे बंदी बनवले. नंतर चौकशी केली व मृत्यूदंडाची शिक्षा दिल्याचे नाटक केले.

ब्रिटीश मेडोस टेलरच्या मागणी पत्राप्रमाणे उच्चाधिकार असलेला गवर्नर जनरलने राज्याच्या मृत्यू दंडाची शिक्षा रद्द करून 4 वर्षे तडीपारची शिक्षा सुनावण्यात आली. त्याला मद्रास जवळच्या चंगलपेट किल्ल्यात ठेवण्यासाठी घेऊन जात असताना रस्यामध्ये विश्रांतीसाठी थांबलेले असनाना चौथ्या वेंकटप्पा नायकाला ब्रिटीशानी धोक्याने गोळी मारून ठार केले. तसेच त्याने आत्महत्या केल्याची खोटी बातमी पसरविली. त्यानंतर ब्रिटीशानी हैद्राबाद निजामाला सुरपूर हे भेटीदाखल दिले. त्यापुढील सर्व संस्थानिकानी निजामाच्या अधिपत्याखाली कार्य चालविले. शेवटी 17 सप्टेंबर 1948 तारखेला हैद्राबाद निजाम हे संस्थान भारतात विलीन झाले तेव्हाच सुरपूर सुद्धा भारतात विलीन झाले.

सुरपूर नायकांच्या राजकीय चरित्राप्रमाणेच त्यांनी सांस्कृतिक क्षेत्रालासुद्धा आपली एक वेगळी देणगी दिलेली आहे. त्यानी अनेक लोकहित कार्यक्रम राबविल्यामुळे ते आजही जनसामान्यांच्या मनामध्ये आहेत. तळी, विहीरी, देवालये, राजवाडे, किल्ले इ. निर्माण केले. अनेकांना जहाँगीरी दिली. एवढेच नसुन आपले कुलदैवत तिरुपती वेंकटरामन आणि गोपालस्वामीच्या रोजच्या पूजेसाठी उत्सवासाठी जहागीरी, तसेच भूमी इनाम म्हणून दिलेली आहे. यांच्या काळात अनेक कलाकार, गायक, चित्रकार, शिल्पकार साहित्यिक आश्रयाला होते. अनेक मौल्यवान साहित्य कृतींची निर्मिती याच काळात झाली. ते सर्वधर्म समभाव जपत होते. चित्रकलेमध्ये सुरपूरच्या नायक घराण्याला प्रमुख स्थान होते. तेथील चित्रकलेने तंत्र आणि उच्च स्थान प्राप्त केले होते. मैसूरुची सांप्रदायिक कलाकृती, विजयनगरच्या शैलीची चित्रे ही विजयपुर आदीलशहाच्या घराण्यापेक्षा सुरपूरच्या चित्रकलेचे वेगळेच वैशिष्ठय होते.

लंडनचे कला संग्रहालय, इंग्लंडची विविध शहरे, दिल्ली, मुंबई, हैद्राबादचे प्राचीन वस्तुसंग्रहालय आणि सालारजंग वस्तू संग्रहालयमध्ये अशा कलाकृती पहायला मिळतात.

## कालगणना

- सुरपूर नायकांचा कालखंड : 1636-1858
- पितांबरी बहरी पिड्डनायक : 1687-1726
- चौथे वेंकटप्पा नायक : 1843-1858
- सुरपूरचा अंत : 9 फेब्रुवारी 1948
- सुरपूर संस्थान भारतात विलीन झाले : 17 सप्टेंबर 1948

**I. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.**

1) सुरपूर संस्थानचा संस्थापक कोण?

2) सुरपूरची राजधानी कोणी निर्माण केली?

**II. खालील प्रश्नांची उत्तरे गटात चर्चा करून लिहा.**

1) चौथ्या वेंकटप्पा नायकाच्या कार्याची टिपा लिहा.

2) सुरपूर नायकांच्या सांस्कृतिक योगदानाबद्धल लिहा.

## यलहंका नाडप्रभू

यलहंका या घराण्याचा संस्थापक रणभैरेगौडा हे होते. त्याच्यानंतर जयगौडा, गिड्डेगौडा, केंपनंजेगौडा अशा काही प्रमुखानी राज्यकारभार सांभाळला. या घराण्यातील लोकप्रिय राजा म्हणजे मोठे केंपेगौडा हे होते. त्यांच्यामुळेच यलहंकाचे नाडप्रभू हे केंपेगौडा घराणे म्हणून प्रसिद्ध झाले. हे विजयनगरचे सेनाधिकारी होते. पुढे 16-18 व्या शतकापर्यंत बेंगळूरु. रामनगर, तुमकूरु आणि अखंड कोलार जिल्ह्यातील काही भागावर राज्य केले. बेंगळूरु ही यलहंका यांची राजधानी असल्याने यलहंका नाडप्रभू असेच संबोधण्यात आले. नंतर बेंगळूरु व मागडी ह्या त्यांच्या राजधान्या झाल्या.

**पहिला केंपेगौडा (सुमारे सा.श. 1532-1597) :** पहिल्या केंपेगौडाने बेंगळूरु शहराची स्थापना सा.श. 1537 साली केली. त्याने बेंगळूरुत किल्ला बांधून तेथून राज्यकारभार केला. बेंगळूरुतील बसवनगुडी येथील बसव देवालय, हलसूरातील सोमेश्वर देवालयांची निर्मिती आणि गवी गंगाधरेश्वर देवालयाचा जिर्णोधार केला. बेंगळूरुमध्ये अनेक तळी निर्माण करण्याचा मान पहिल्या केंपेगौडांना जातो. त्यापैकी केंपांबुधी तळे, धर्मांबुधी तळे, हलसुरू तळे तसेच संपंगी तळे ही काही होत. शिवगंगा गंगाधरेश्वराचा परमभक्त असलेल्या पाहिल्या केंपेगौडाने घरे, तसेच अग्रहारांची निर्मिती केली. धर्मप्रभु असलेल्या केंपेगौडाला 'प्रजावत्सल' अशी बिरूदावली होती.

**दुसरा केंपेगौडा (सुमारे सा.श.1597–1641) :** दुसरा केंपेगौडा हा पहिल्या केंपेगौडाचा मुलगा होय. याच्या काळात विजयपुरच्या आदील शहा रणदुल्ला खान याने सा.श. 1638 मध्ये बेंगळूरु जिंकून आपल्या ताब्यात घेतले. त्यानंतर त्याने आपली राजधानी मागडी येथे वसवून तेथून राज्यकारभार चालविला.

अशा प्रकारे यांच्या वारसाना मागडी केंपेगौडा असे म्हणू लागले. दुसऱ्या केंपेगौडाने बेंगळूरु शहरातील चार गोपूर निर्माण केले. याच्या काळात बेंगळूरुचा विकास झाला.

मागडी सावनदुर्ग, हुलीयूरु दुर्ग, हुत्री दुर्ग या किल्ल्यांची निर्मिती केली. आपल्या वडिलाप्रमाणेच यानेही नवीन खेडी, देवालये आणि तलावांची निर्मिती केली.

दुसऱ्या केंपेगौडाने स्वतःचा मुलगा मम्मडी केंपेगौडाला मागडी प्रांत तसेच केंपेगौडाला कुणीगल हा प्रांत दिला. मम्मडी केंपेगौडा (सा.श. 1641–1674) याच्यावेळी दुष्काळ पडला होता. म्हणून केंपसागर या तळयाची निर्मिती करण्यात आली. इम्मडी मोठे. केंपेगौडानी (सुमारे सा.श. 1641–1662) हा वीर योद्धा नव्हता तर बहुभाषा पंडीत मात्र होता. त्याला 'नव कविता गुंभपुंभवाणी' अशी पदवी होती. त्याने राणीसाठी कुणीगल आणि हुलीयूरु या किल्ल्यात अग्रहार, तलाव, देवालय इत्यादींची निर्मिती केली.

पुढे यलहंका नाडप्रभू संस्थान म्हैसूरु संस्थानात विलीन झाले.

**कालगणतना (सा.श.)**

| | | |
|---|---|---|
| पहिला केंपेगौडा | : | 1532–1597 |
| दुसरा केंपेगौडा | : | 1597–1641 |
| मम्मडी केंपेगौडा | : | 1641–1674 |
| पहिला मोठा केंपेगौडा | : | 1641–1662 |

## माहित असू द्या

केंपेगौडाने निर्माण केलेले कावलू गोपूर येथे आहेत. उत्तरेला-मेख्रीवृत्त, दक्षिणेला-लालबाग, पूर्वेला-अलसुरु, पश्चिमेला-गवीगंगाधरेश्वर

## अभ्यास

### I. एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) यलहंका नाडप्रभू घराण्याचा संस्थापक कोण?

2) बेंगळूरु शहराची स्थापना कोणी केली?

3) यलहंका नाडप्रभूंच्या राजधानीची नावे सांगा ? केंपेगौडाची बिरूदावली कोणती?

4) इम्मडी मोठे केंपेगौडानी कोणती पदवी धारण केली?

### II. दोन तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) पहिल्या केंपेगौडाच्या कार्याचे वर्णन करा.

2) इम्मडी केंपेगौडाबद्धल टिपा लिहा.

### उपक्रम

यलहंकाच्या नाडप्रभूनी बेंगळूरु तसेच परिसातील अनेक तळयांची निर्मिती केली. सद्या जास्त तलावांची आवश्यकता आहे. यावर चर्चा करा. सरकारला पाठवायला अहवाल तयार करा.

★ ★ ★

| पाठ 5 | मैसूरचे वडेयर |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठात मैसूरुच्या वडेयर घराण्याचा परिचय दिलेला आहे. त्यानंतर हैदर अली आणि टिपू सुलतान यांचा परिचय करून दिलेला आहे. नाल्वडी कृष्णराज वडेयर सोबत प्रमुख वडेयरांचा परिचय दिलेला आहे. प्रमुख दिवाणांची माहिती दिलेली आहे.

मैसूरुचे वडेयरांनी विजयनगरच्या राज्य घराण्यातील परंपरा पुढे चालवून समाज-संस्कृतीची अपार सेवा केली आहे. सुदीर्घ काळ राज्यकारभार करून जनतेच्या विश्वासास पात्र ठरले होते.

## सामर्थ्ये

1] चिक्कदेवरायची कारकीर्द समजून घेणे.
2] हैदर अली आणि टिपू सुलतान यानी ब्रिटिशा विरुद्ध केलेल्या लढाईची कारणे व परिणाम समजणे.
3] हैदर अली व टिपू सुलतान यांचे योगदान जाणून घेणे.
4] कृष्णराज वडेयर याची कारकीर्द जाणून घेणे.
5] मैसूरु संस्थानातील ऐतिहासिक ठिकाणे नकाशावर ओळखणे.

## मैसूरुचे प्रमुख वडेयर

यदुराय मैसूरु वडेयर पहिला (सा.श. 1399-1423) राजा होय. राज्याचे प्रतिक गंडभेरूंड होते. वडेयरांची सुरूवातीची राजधानी श्रीरंगपट्टण ही होती.

### चिक्कदेवराय वडेयर (सा.श. 1673-1704)


चिक्कदेवराय

सुरूवातीच्या राजापैकी चिक्क देवराज वडेयर हा प्रमुख राजा होता. त्याने अनेक लोकप्रिय कार्ये केली. त्याने राजधानीत राज्यकारभारासाठी 18 शाखांची स्थापना केली. यालाच 'अठरा कचेरी' असे म्हणतात. श्रीरंगपट्टणाच्या पश्चिमेला कावेरी नदीवर धरण बांधून शेतीसाठी पाण्याची सोय केली. राज्यकारभारात खर्च कमी करून जास्त प्रमाणात निधी संग्रह केला. त्यामुळेच 'नवकोट नारायण' ही पदवी धारण केली.

चिक्क देवरायांच्या काळात मैसूरु हे संपन्न राज्य होते. त्यांच्या मरणानंतर दुर्बळ राजे गादीवर आले. त्यामुळे दलवाई नावाच्या अधिकाऱ्याने कारभार चालविला.



**अठरा कचेरी, मैसूरु**

## हैदर अली आणि टिपू सुलतान

### हैदरअली (सा.श. 1761–1782)



**हैदर अली**

हैदर अली दळवाई नंदराजाच्या सैन्यात समर्थ सेनापती होता. शूर आणि साहसी हैदर अलीने युद्धात विजय मिळवत आपले सैन्यबळ व संपत्ती वाढविली. नंतर बेंगळूरुत मराठयांचा पराभव केला. त्यासाठी राजाने त्याचा गौरव केला. मैसूरु राज्यात गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. राजधानीत सैनिकांनी बंड पुकारले. तेव्हा हैदरने दळवाई नंदराजाना निवृत्त करून स्वतः राज्याधिकारी झाला. याप्रमाणे मैसूरु राज्यात एक शक्ती शाली व्यक्ती पुढे आली. स्वतःला राज्याचा कार्यकर्ता असे म्हणत दुसऱ्या कृष्णदेवरायला बंदी केले व आपण राजा झाला.

अधिकार मिळाल्यानंतर लगेच राज्याचा विस्तार करण्यास सुरूवात केली. केळदीच्या राज्याचा पराभव केला. तेथील अपार संपत्ती लुटून आणून अर्थिक स्थिती आणखी समृद्ध केली. खुप प्रयत्नानंतर चित्रदुर्गाचा किल्ला आपल्या ताब्यात घेतला.

## ब्रिटीशाबरोबर संघर्ष

व्यापाराच्या निमित्ताने भारतात आलेल्या ब्रिटीशानी क्रमाक्रमाने राजकीय शक्ती विकसीत केली. हैदरचा दक्षिण भारतातील राज्य विस्तार त्यांना सहन झाला नाही. त्यामुळेच हैदर अली आणि ब्रिटीश यांच्यातील संघर्ष अनिवार्य होता.

> हैदर अली आणि त्याचा मुलगा टिपू सुलतान यानी ब्रिटीशाविरूद्ध केलेल्या चार युद्धाना 'अँग्लो मैसूरु युद्ध' किंवा 'मैसूरु युद्ध' असे म्हणतात.

पहिल्या अँग्लो मैसूरु युद्धात हैदर अलीच्या आक्रमणाने ब्रिटीशांची फार हानी झाली. त्यामुळे निरुपाय झाल्याने ब्रिटीश तह करण्यास राजी झाले. मद्रास येथे झालेल्या या तहातील मुख्य बाबी म्हणजे हैदर अली किंवा ब्रिटीश यांच्यावर जर कोणी शत्रूने आक्रमण केल्यास परस्पराना मदत करणे हा होता. या तहामुळे हैदर अलीचे महत्व वाढले.

काही वर्षानंतर मराठ्यांनी मैसूरुवर आक्रमण केले. त्यावेळी मद्रासच्या तहानुसार ब्रिटीश हैदर अलीच्या सहाय्याला न येता तटस्थ राहिले. यामुळे चिडलेल्या हैदरने चडफडून ब्रिटीशांशी युद्ध केले. त्यालाच अँग्लो मैसुरुचे दुसरे युद्ध असे म्हणतात. युद्ध चालू असतानाच अनारोग्यामुळे हैदर अलीचा मृत्यू झाला. पुढे टिपू सुलतानने युद्ध चालू ठेवले.

**हैदर अलीचे कार्य :** हैदर अलीने आपल्या समकालीन राजकीयांना चांगलेच समजून घेतले होते. त्याला लिहीता वाचता येत नव्हते तरी त्याला कन्नड सहित काही भाषा अवगत होत्या. त्याने मैसुरू राज्याचा विस्तार केला. शूर योद्धा व दक्ष राजकारणी असलेल्या हैदर अलीला कर्नाटकाच्या इतिहासात प्रमुख स्थान आहे. बेंगळूरु मधील लालबागेची सुरूवात यानेच केली.

## टिपू सुलतान (सा.श. 1782–1799)



टिपू सुलतान

हैदर अलीचा मुलगा टिपू होय. आपल्या वडीलांच्या बरोबर युद्धात भाग घेऊन विजय मिळविणारा टिपू सुलतान वीर तरुण होता. त्याने स्वतःला सुलतान घोषित केले.

त्याने वडीलांच्या निधनानंतर सुद्धा युद्ध सुरू ठेवले. त्यावेळी टिपूच्या मदतीला कोणी आले नाही. टिपू एकटा पडला. तरीसुद्धा त्याने ब्रिटीशांना तोंड दिले. शेवटी ब्रिटीशांनी मंगळूर करार केला. तो दोन्ही पक्षांना हितकारक होता. दोघानीही जिंकलेला प्रदेश ज्याचा त्याला परत देऊन युद्ध कैद्याना मुक्त केले.

अल्पकाळात टिपू आणि ब्रिटीश यांच्यात दोन युद्धे झाली. टिपू आणि ब्रिटीश यांच्यातील द्वेष आणि अविश्वास या युद्धाना कारणीभूत ठरला.

तिसऱ्या मैसूरू युद्धात ब्रिटीशानी टिपूवर आक्रमण केले. राजधानी श्रीरंगपट्टणला वेढा घातला. टिपूकडे दुसरा कोणताच मार्ग न उरल्यामूळे ब्रिटीशाबरोबर श्रीरंगपट्टण येथे शांती करार केला. या शांती करारानुसार त्याचे अर्धे राज्य ब्रिटीशांना दिले. युद्धाचे परिहार धन म्हणून 330 लक्ष रूपये दिले. तसेच आपल्या दोन्ही मुलाना त्यांच्याकडे ओलीस ठेवले.




युद्धाच्या परिणामामुळे टिपू अपमानीत झाला. ब्रिटीशाना भारतातून हाकलून देण्याचा संकल्प केला. हीच चौथ्या मैसुरू युद्धाची नांदी ठरली. युद्धात ब्रिटीशांनी श्रीरंगपट्टणला वेढा घातला. टिपू वीर वृत्तीने त्वेषाने लढत असतानाच 1799 साली मरण पावला. टिपू 'मैसुरूचा वाघ' या नावाने प्रसिद्ध झाला.

टिपू सुलतानाच्या मृत्यूनंतर मैसुरू राज्य ब्रिटीशांच्या ताब्यात आले. ब्रिटीशांनी वडेयर घराण्याच्या मुम्मडी कृष्णराज वडेयर यांच्याकडे हे राज्य सोपविले. तरीसुद्धा मैसुरू राज्य ब्रिटीशांच्या अधिपत्याखालीच राहिले.

**टिपू सुलतानाचे व्यक्तीमत्व व कार्य :** विज्ञान क्षेत्रातील कार्याबद्धल त्याला उत्तम जाण होती. त्याच्याकडे उत्तम ग्रंथालय होते. बेंगळूरुचा राजवाडा, श्रीरंगपट्टणमधील उन्हाळी राजवाडा (दरिया दौलत) निर्माण केला. राजवाडयाच्या भिंती, छप्पर आणि खांब्यांवर सुंदर नक्षी आहेत.



**बेंगळूरुचा राजवाडा**



**दरिया दौलत, श्रीरंगपट्टण**

• टिपूने राज्याच्या समृद्धीसाठी फार प्रयत्न केले. रेशमी व्यवसाय राज्यात व्यापक प्रमाणात लोकप्रिय केला. हे त्याचे विशेष कार्य होय. कागद तयार करण्याचा कारखाना हरिहरमध्ये स्थापन केला. फ्रेंच अधिकाऱ्याच्या सहकार्याने आपले सैन्य अत्याधुनिक

शस्त्रास्त्रानी सज्ज केले. श्रीरंगपट्टण येथे मिश्रधातूंचा बंदूक कारखाना चालू केला. टिपूने रॉकेट वापराचे तंत्रज्ञान विकसित केले हे विशेष होय.

• टिपूने काही हिंदू देवालयाना दत्तक घेतले. तसेच श्रृंगेरी मठाला देणगी दिली. टिपूने शेतकऱ्यांना अनुकूल कर आकारणी केली. शेतीसाठी सुलभ हप्त्याचे कर्ज उपलब्ध करून देत अनेक सुविधा पुरविल्या.

• श्रीरंगपट्टण येथील हैदरची समाधी आणि जुम्मा मशीद टिपूच्या काळात निर्माण करण्यात आली. मशिदीचे मिनार आकर्षक आहेत. बेंगळूरु तसेच श्रीरंगपट्टण येथे टांकसाल निर्माण केली.



**जुम्मा मशीद, श्रीरंगपट्टण**

## मुम्मडी कृष्णराज वडेयर (सा.श. 1799–1831)



मुम्मडी कृष्णराज वडेयर

टिपू सुलतानाच्या मृत्यू बरोरबरच मैसुरूच्या इतिहासातील वीर योध्द्यांचे युग संपले. ब्रिटीशानी मैसुरू संस्थान आपल्या अधिपत्याखाली घेऊन त्याचे चार भागात विभागणी केली. त्यापैकी एका भागावर त्यांचे मित्र मराठे, दुसऱ्या भागावर निजाम, तिसरा भाग स्वतःकडे ठेवला व शिल्लक राहिलेला एक मैसुरूच्या वडेयरांकडे सोपविला. तसेच मुम्मडी कृष्णराज वडेयर याला गादीवर बसवले. कृष्णराज पाच वर्षांचा बालक असतानापासून राज्यकारभार पूर्णय्याकडे देत दिवाण म्हणून नेमणूक करण्यात आली.

मुम्मडी कृष्णराज वडेयर याने शिवमोग्गा जिल्ह्यातील नगर (बिदनू) प्रदेशातील झालेला दंगा व्यवस्थित न हाताळल्याचे कारण पुढे करून 1831 मध्ये त्याला गादीवरून खाली उतरवले. तसेच मैसुरु संस्थानामध्ये कमिशनरचा राज्यकारभार चालू केला.

## कमिशनरांचा राज्यकारभार (सा.श. 1831–1881)

### मार्क कब्बन (सा.श. 1834–1861)



मार्क कब्बन

मार्क कब्बन याने राज्यातील राज्यकारभारात अनेक सुधारणा केल्या. त्याने राजधानी मैसुरुहुन बेंगळूरुला बदलली. त्याने मैसुरुची राज्यकारभाराच्या दृष्टीने अनेक घटकात विभागणी करून त्यांना सुपरिटेंडर दिला. त्या घटकांचे जिल्हा तसेच तालुक्यात विभागणी करण्यात आली. न्यायांग तसेच पोलिस दलाची उत्तमरित्या संघटना करण्यात आली. कन्नड भाषेला राज्य भाषेचा दर्जा देण्यात आला.

नवीन रस्त्यांची निर्मिती करण्यात आली. त्याचा परिणाम म्हणून राज्यातील सर्व प्रमुख शहरांचा संपर्क बेंगळूरुशी करण्यात आला. 1859 मध्ये बेंगळूरु तसेच जोलारपेटे मध्ये रेल्वे मार्गाचा शुभारंभ करण्यात आला. हा मैसुरु राज्याचा प्रथम रेल्वे मार्ग होय. त्याने 1861 मध्ये कमिशनर पदाचा राजीनामा दिला. त्याच्या नावानेच बेंगळूर येथे कब्बन पार्क आहे.

## लुई बेंथाम बौरिंग (सा.श. 1862–1870)



लुई बेंथाम बौरिंग

लुई बेंथाम बौरिंग 1862 मध्ये प्रमुख कमिशनर म्हणून अधिकार स्वीकारला. त्याने मैसुरू राज्याचा संपूर्ण राज्यकारभार पुर्नसंघटित केला. नंदीग्राम नगर आणि अष्टग्राम राज्यकारभाराचा प्रमुख भाग होता. या भागांचा प्रमुख हा कमीशनर होता. भू-करामध्ये सुधारणा करण्यात आली. न्यायांग तसेच पोलिस खाते व्यवस्थितपणे चालविले.

सार्वजनिक शिक्षण खात्याबरोबर शिक्षणामध्ये अमुलाग्र बदल (सुधारणा) करण्यात आल्या. 1870 मध्ये त्याने कमिशनर पदाचा राजीनामा दिला. कमिशनरानी मैसुरू राज्याच्या अभिवृद्धिसाठी मजबूत पाया घातला.

## दहावे चामराज वडेयर (सा.श. 1881–1894)

1881 मध्ये ब्रिटीशांनी दहाव्या चामराज वडेयरला पुन्हा राज्य सोपविले. यालाच पुनर्दान म्हणतात. दहाव्या चामराज वडेयरच्या हाताखाली सी. रंगाचारलू तसेच के. शेषाद्री अय्यर यांनी दिवाण म्हणून राज्यकारभार सांभाळला. दहाव्या चामराज वडेयरच्या काळात प्रजाप्रतिनिधी सभा 1881 साली सुरू करण्यात आली.



दहावे चामराज वडेयर



नाल्वडी कृष्णराज वडेयर

## नाल्वडी कृष्णराज वडेयर (सा.श. 1902–1940)

दहावे चामराज वडेयर कलकत्याला असताना आरोग्याच्या तक्रारीने तिथेच त्यांचे निधन झाले. त्यांचे उत्तराधिकारी म्हणून नाल्वडी कृष्णराज वडेयर अधिकारावर आल्यावर (1895) केवळ आकरा वर्षांचे बालक होते. त्यावेळी त्यांची आई केंप नंजमण्णी ही राज्यकारभार पहात होती. 1902 पासून

नाल्वडी यांनी स्वतः कारभारात लक्ष घातले. उत्तम शिक्षण घेतलेल्या नाल्वडी कृष्णराज वडेयर यांनी मैसुरु संस्थानाला एक आदर्श असे संस्थान आपल्या काळात बनविले. दूरदृष्टीकोन, दीन-दलीतांबदल त्यांना कळवळ होती. समाजातील प्रत्येक घटकाला (समाजाला) राज्यकारभारात स्थान देण्यासाठी मिल्लर आयोगाची रचना केली.

### नाल्वडी कृष्णराज वडेयरांचे प्रमुख कार्य

- जे.एन. टाटा यांना बेंगळूरमध्ये विज्ञान संस्था स्थापण्यास 371 एकर जमीन आणि 5 लाखापेक्षा अधिक धन सहाय्य दिले.
- 1907 मध्ये न्याय विधायक सभा याची स्थापना करून जनप्रतिनिधीद्वारे जनतेच्या समस्यावर चर्चा करून उपाय शोधण्यास संधी दिली.
- सद्याचा मैसुरुचा राजवाडा 1910 मध्ये बांधून पूर्ण केला.
- कृष्णराजसागर (के.आर.एस.) धरण बांधून त्याचा उपयोग कृषी अभिवृद्धीसाठी केला.
- 1911 मध्ये मैसुरु संपत अभ्युदय परिषद (The Mysore Economic Conference) सुरू केली.
- मागास वर्गांना सरकारी सेवेत विशेष प्रतिनिधित्व देण्याची घोषणा केली व अंमलात आणली.
- सर्वप्रथम महिलाना मताधिकार देण्यास (मतदान करण्यास) अनुमती दिली.

अशाप्रकारे नाल्वडी यांनी शिक्षण, लघुउद्योग, बँक इत्यादी क्षेत्रांच्या प्रगतीसाठी मार्गदर्शन व प्रेरक म्हणून उभे राहिले. त्यांच्या दूरदृष्टीमुळेच क्रियात्मक प्रतिभावंत दिवाणांची नेमणूक करून राज्याची प्रगती साधली.

त्यापैकी सर. एम. विश्वेश्वरय्या, तसेच सर. मिर्जा इस्माईल हे प्रमुख होत.

नाल्वडी यांच्या मैसुरु संस्थानाला महात्मा गांधीजीनी 'रामराज्य' असे म्हटले होते. त्याना 'राजश्री' या नावाने बोलवत असत. 20 व्या शतकाच्या पूर्वार्धामध्ये नाल्वडी कृष्णराज वडेयरासारखे दुसरे वैभवसंपन्न संस्थानिक भारतात कोणीही नव्हते.

मैसुरुचा राजवाडा पुन्हा नव्याने 1910 मध्ये बांधण्यात आला. यापूर्वीचा राजवाडा अग्नीच्या भक्षस्थानी पडला होता. नवीन राजवाडयाच्या निर्माणासाठी देश-विदेशातून कुशल कारागीरांना बोलावण्यात आले होते. राजवाडयाचे सभांगण (दरबार हॉल) प्रसिद्ध चित्रकार राजा रविवर्मा याने रेखाटला आहे. कृष्णराज सागर (के.आर.एस.) धरण बांधताना नाल्वडी कृष्णराज यांना आर्थिक तुडवडा जाणवला. त्यासाठी त्यानी राजपरिवारातील सोन्याचे दागिने मुंबईच्या चिनीवार पेठेत विकून आलेल्या पैशातून धरणाचे काम पूर्ण केले.



**मैसुरुचा राजवाडा**

## सर. एम विश्वेश्वरय्या (सा.श. 1912-1918)



**सर. एम विश्वेश्वरय्या**

आधुनिक मैसुरुचे शिल्पकार आणि निर्माणकर्ता अशी उपाधी लाभलेले सर एम. विश्वेश्वरय्या, एक प्रतिभावंत इंजिनियर म्हणून 1909-1912 पर्यंत मैसुरु संस्थानचे मुख्य इंजिनियर म्हणून काम पाहिले. नाल्वडी कृष्णराज वडेयरांनी यांना 1912 मध्ये मैसुरुचे दिवाण म्हणून नेमणूक केली. यांच्या काळात मैसुरुचा सर्वतोमुखी विकास झाला होता.

'कारखानदारी नसेल तर विनाश' ही विश्वेश्वरय्या यांनी दिलेली प्रसिद्ध घोषणा होती. भद्रावती येथील साखर कारखाना, मैसूरुचा वासाच्या तेलाचा कारखाना, बेंगळूरुमधील साबणाचा कारखाना, केंद्र कारखानदारीची कार्यशाळा, चामडयापासून विविध वस्तू बनविण्याचा कारखाना तसेच लोखंडाचा कारखाना सुरु केला. व्यापार आणि उद्योगाला प्रोत्साहन देण्यासाठी बेंगळूरुमध्ये चेंबर्स ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीजची स्थापना करण्यात आली. व्यापार आणि उद्योगांच्या अभिवृद्धीसाठी 1913 मध्ये मैसूरु बँकेची स्थापना करण्यात आली. प्रत्येक देशातील प्रगती ही जनसामान्यांच्या शिक्षणावर अवलंबून असते.

असे सर एम. विश्वेश्वरय्या यांनी जाणले होते. त्यानी प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले. तांत्रिक शिक्षणाला महत्व दिले. बेंगळूरुमधील हेब्बाळ येथे कृषी शाळेची स्थापना केली. 1916 मध्ये स्थापना केलेल्या मैसूरु विश्वविद्यालयाची शैक्षणिक क्षेत्रात फार मोठी उपलब्धी आहे. 1915 मध्ये बेंगळूरुमध्ये कन्नड साहित्य परिषदेची स्थापना करण्यात आली. कृष्णराज सागर धरणाच्या निर्मितीचे कार्य विश्वेश्वरय्या यांच्या कालावधीत 1932 मध्ये पूर्ण झाले. मैसूरु-अरसीकेरे, तसेच बौरींगपेटे-कोलार रेल्वे मार्ग घालण्यात आले. नाल्वडी कृष्णराज वडेयर यांच्या अनेक योजना दूरदृष्टीकोन समोर ठेवून यशस्वीपणे सर एम. विश्वेश्वरय्या यानी राबविल्या. शेवटी 1918 मध्ये विश्वेश्वरय्या यांनी दिवाण पदाचा राजीनामा दिला. त्यांचे उत्तुंग कार्य पाहून ब्रिटीश सरकारने त्यांना 'सर' ही पदवी दिली. 1955 मध्ये भारत सरकारने त्यांना 'भारतरत्न' देऊन त्यांचा गौरव केला. असा पुरस्कार लाभलेले ते कर्नाटकातील पहिली व्यक्ती होत.



**कन्नड साहित्य परिषद, बेंगळूरु**



**स्टेट बँक ऑफ मैसूरु**



कृष्णराजसागर धरण

## सर मिर्जा इस्माईल (सा.श. 1926-1941)



सर मिर्जा इस्माईल

मैसूरुचे दुसरे दिवाण असलेले सर मिर्जा इस्माईल हे सुद्धा आधुनिक मैसूरुचे निर्माते म्हणून ओळखले जातात. त्यानी कारखानदारीच्या विकासासाठी प्रोत्साहन देऊन अनेक नवीन व्यवसाय सुरू केले. बेंगळूरुमध्ये हिंदुस्थान एरोनॉटीक्स लिमिटेड, काच कारखाना, चिनी मातीच्या भांड्याचा कारखाना, बेळगोळ येथे रासायनिक खतांचा कारखाना, मंड्यामध्ये साखर कारखाना, शिवमोग्गा येथे माचीसचा कारखाना तसेच भद्रावती येथील पोलाद व कागद कारखाना यांची निर्मिती केली. जक्कुरी येथे विमानतळाची निर्मिती केली. आकाशवाणी (रेडिओ) केंद्र बेंगळूरु व मैसूरु येथे सुरू केले. त्यांनी खेडयातील व्यवसायाना प्रोत्साहन दिले. बदनवाळ येथे खादी उत्पादनाचे केंद्र स्थापले. इरवीन कालव्याची निर्मिती करून मंड्या जिल्हातील शेतीला पाण्याची व्यवस्था करून दिली.

मैसूरमध्ये विविध फुलांच्या बागा तसेच उद्यानांची निर्मिती केली. कृष्णराज सागर जलाशयाच्या पाठीमागे वृंदावन उद्यानाची निर्मिती केली.



**वृंदावन उद्यान**

बेंगळूरु मध्ये राष्ट्रीय मानसिक आरोग्य आणि नररोग शस्त्रचिकित्सा संस्था (NIMHANS), कोलारमध्ये नरसिंहराज दवाखाना, शिवमोग्गा येथे मेग्गान दवाखाना तसेच मैसूरुमध्ये वाणीविलास दवाखान्याची निर्मिती यांच्या काळात झाली.

शिक्षणाला प्रोत्साहन देण्यासाठी प्राथमिक शिक्षण कायदा जारी केला. खासगी शाळांना अनुदान देण्यात आले. प्रौढ शाळामध्ये कन्नड माध्यमाच्या शिक्षणाला सुरूवात करण्यात आली. इत्यादीमुळे मैसूरुच्या विकासात सर मिर्जा ईस्माईल यांचे योगदान मोठे आहे. नाल्वडी कृष्णराज वडेयर यांचे सहकारी असलेले मिर्जा ईस्माईल यांनी त्यांच्या दूरदृष्टीतील योजना यशस्वीपणे कार्यान्वित केल्या.

नाल्वडी कृष्णराज वडेयर यांच्या मृत्यूनंतर जयचामराज वडेयर गादीवर आले. ते मैसूरुचे शेवटचे राजे होत.

भारत स्वतंत्र झाल्यानंतर एकरूप भारतात मैसूरु संस्थान यावे यासाठी के.सी. रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली राजवाड्यात सत्याग्रह सुरु झाला. या सत्याग्रहाचे फळ म्हणजे जयचामराज वडेयर हे एकरूप भारतात विलीन होण्यास तयार झाले. त्याचा परिणाम म्हणून के.सी. रेड्डी यांच्या नेतृत्वाखाली 24 ऑक्टोबर 1947 रोजी जबाबदार सरकार अस्तित्वात आले. जयचामराज वडेयर हे मैसूरु राज्याचे पहिले राज्यपाल म्हणून कार्य करू लागले.

### कालगणना (सा.श.)

| | |
|---|---|
| चिक्कदेवराज वडेयर | : 1673-1704 |
| हैदर अली | : 1761-1782 |
| टिपू सुलतान | : 1782-1799 |
| पहिले अँग्लो मैसूरु युद्ध | : 1767-1769 |
| दुसरे अँग्लो मैसूरु युद्ध | : 1780-1784 |
| तिसरे अँग्लो मैसूरु युद्ध | : 1790-1792 |
| चौथे अँग्लो मैसूरु युद्ध | : 1799 |
| मार्क कब्बन | : 1834-1861 |
| लुई बेंथाम बौरिंग | : 1862-1870 |
| दहावे चामराज वडेयर | : 1881-1894 |
| नाल्वडी कृष्णराज वडेयर | : 1902-1940 |
| सर. एम. विश्वेश्वरय्या | : 1912-1918 |
| सर. मिर्जा ईस्माईल | : 1926-1941 |

## अभ्यास

## I. रिकाम्या जागा योग्य शब्दाने भरा.

1) मैसूरु वडेयर यांची पहिली राजधानी ............. होती.

2) दुसऱ्या अँग्लो मैसूरु युद्धानंतर ब्रिटीशांनी टिपू सुलतानबरोबर ............ येथे तह केला.

3) 'मैसुरुचा वाघ' म्हणून ............ हे प्रसिद्ध आहेत.

4) तिसरा कृष्णराज वडेयरचे दिवाण ............होते.

5) मैसूरु संस्थानमध्ये न्यायविधायक सभा ............. मध्ये सुरू झाली.

6) मैसूरु संस्थानचे गांधीजी म्हणून ............... यांना ओळखतात.

7) 'भारतरत्न' ही पदवी मिळालेला पहिला कर्नाटक वासी ..............होय.

8) इरवीन कालव्याची निर्मिती ............... या दिवाणाने केली.

## II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1) अठरा कचेरीची स्थापना कोणी केली?

2) दरिया दौलत कोठे आहे?

3) लालबाग उद्यान कोठे आहे? त्याची सुरूवात कोणी केली?

4) टिपू सुलतानच्या मृत्यूनंतर मैसूरुच्या सिंहासनावर कोण बसला?

5) मैसूरु संस्थानमध्ये कमिशनर राज्यकारभार कशासाठी अंमलात आला?

6) मैसूरुच्या प्रमुख कमिशनरांची नावे सांगा.

7) पुनर्दान म्हणजे काय?

8) प्रजाप्रतिनिधी सभा केव्हा सुरू झाली?

9) कन्नड साहित्य परिषद कोठे आहे? त्याची स्थापना केव्हा झाली?

10) राजवाडयाचा सत्याग्रहाचे नेतृत्व कोणी केले?

## III. गटात चर्चा करून उत्तरे लिहा.

1) हैदर अलीची कामगिरी कोणती?

2) तिसऱ्या मैसूरु युद्धाचा परिणाम काय झाला?

3) टिपू सुलतानच्या कार्याचे वर्णन करा.

4) नाल्वडी कृष्णराज वडेयर यांच्या प्रमुख कार्याची यादी करा.

5) सर एम. विश्वेश्वरय्या यांच्या कार्याचे वर्णन करा.

## IV. जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| चिक्कदेवराज वडेयर | राजश्री |
| टिपू सुलतान | भारतरत्न |
| नाल्वडी कृष्णराज वडेयर | नवकोटी नारायण |
| सर एम. विश्वेश्वरय्या | पहिले राज्यपाल |
| जयचामराज वडेयर | मैसूरुचा वाघ |

## कृती.

1) नकाशावर मैसूरु राज्याची ऐतिहासीक स्थळे ओळखा.

2) टिपू सुलतानने परकीयांचे आक्रमण थांबवण्याचा प्रयत्न केला. पण त्यात त्याला यश आले नाही? का? चर्चा करून उत्तर लिहा.

☆ ☆ ☆

| पाठ 6 | दिल्लीचे सुलतान |
|---|---|

**पाठाचा परिचय**

11-12 व्या शतकामध्ये तुर्कीयांच्या सैन्याने भारतावर वेळोवेळा आक्रमण केले. ही आक्रमणेच दिल्लीच्या सुलतानाच्या राजवटीस (1206-1526) कारणीभूत ठरली.

या पाठामध्ये दिल्लीच्या सुलतानांचा राज्य कारभार, त्यांच्या काळातील सामाजिक, आर्थिक स्थिती आणि वास्तुशिल्पकला, साहित्य यामध्ये त्यानी दिलेल्या योगदान या संबंधी माहिती देण्यात आली आहे.

**सामर्थ्ये**

1. 11-12 व्या शतकात झालेला ऐतिहासिक उत्कर्ष दिल्लीच्या सुलतानांच्या राज्य स्थापनेस कारणीभुत ठरला हे समजून घेणे.
2. सुलतानांचा राज्य कारभार, भारतीय समाज, आर्थिक व संस्कृतीवर पडलेला प्रभाव समजून घेणे.
3. दिल्लीच्या सुलतानांच्या काळातील ऐतिहासिक स्थळे नकाशात दाखविणे.

आपल्या देशावर पूर्वीपासून अनेक वेळा परकीयानी आक्रमण केले. हे परकीय भारताच्या वायव्य सरहद्दीतून आले होते. संपतीची लूट, राज्याचा विस्तार आणि धर्म प्रचार हा त्यांचा आक्रमणाचा प्रमुख उद्देश होता.

**अरबांचे आक्रमण** भारतावर सर्व प्रथम अरब लोकानी आक्रमण केले. त्यानी 1300 वर्षापूर्वी सिंध व मुल्तान प्रांत आपल्या ताब्यात घेतला व त्या प्रदेशात इस्लामचा पाया घातला. परंतू अल्पशा कालावधीतच अरबांचे अतिक्रमण थंडावले.

**तुर्कांचे आक्रमण** यानंतर सुमारे तीन शतकानंतर तुर्कांच्या महंमद गझनी याने भारतावर आक्रमण केले. हा अफगाणिस्थानातील गझनी नावाच्या छोटयाशा राज्याचा

सुलतान होता. त्याने भारतावर 17 वेळा स्वाऱ्या केल्यामुळे भारतातील अनेक ऐश्वर्य-संपन्न शहरे उध्वस्त झाली. धार्मिक स्थळे नाश पावली.



**महंमद गझनी**



**महंमद घोरी**

**महंमद घोरी:** 8 शतकापूर्वी अफगाणिस्तानच्या महंमद घोरी याने भारतावर आक्रमण करुन भारतातील सिंध व पंजाब प्रांत आपल्या ताब्यात घेतला. त्याने आक्रमण पुढे चालू ठेवले. दिल्लीचा राजा पृथ्वीराज चौहान याने महंमद घोरीचा तराईच्या पहिल्या युद्धात पराभव केला. दुसऱ्याच वर्षी पुन्हा त्यांच्यामध्ये झालेल्या घनघोर युद्धात पृथ्वीराजाचा पराभव केला व ठार मारले व दिल्लीचा सुलतान झाला.

## गुलाम वंश

घोरीने जिंकलेला प्रदेश त्याने आपला सेनापती कुतुबुद्दीन ऐबक याच्याकडे सोपविला. घोरीच्या निधनानंतर कुतुबुद्दीन ऐबक दिल्लीचा सुलतान म्हणून स्वतंत्र कारभार पाहू लागला. दिल्लीचा कारभार गुलाम, खिलजी, तुघलक, सय्यद आणि लोदी या 5 वंशाच्या राजानी चालविला. यापैकी प्रमुख वंशाबाबत माहिती मिळवूया.

**कुतुबुद्दीन ऐबक** : कुतुबुद्दीन हा सुरुवातीला महंमद घोरीचा गुलाम होता. त्यामुळे त्याना 'गुलाम' वंश म्हणतात. त्याने शत्रुला जिंकून तुर्कांचे राज्य बळकट केले. आपण मिळविलेल्या विजयाची आठवण म्हणून दिल्ली येथील मेहरौली येथे कुतुबमिनार बांधण्यास सुरुवात केली. इल्तून मिशन काळात तो बांधून पूर्ण झाला.



कुतुबुद्दीन ऐबक



कुतुब मिनार, दिल्ली

दिल्लीच्या सुलतानांच्या काळात अधिकाराची सुत्रे आपल्या हाती घेतलेली एकमेव महिला म्हणजे सुल्ताना रजिया ही होय. ही वीरांगणा आपल्या राज्याचा न्यायनिवाडा करत पुरुषाना लाजवेल अशी रणांगणे तिने गाजविली. परंतू स्थानिक सरदाराना महिलेचे वर्चस्व सहन झाले नाही. त्यामुळे त्यानी तिचा वध केला.

## खिलजी वंश

गुलाम वंशानंतर खिलजी वंश अधिकारावर आला. खिलजी वंशातील अल्लाउद्दीन खिलजी हा प्रबळ सुलतान होऊन गेला. त्याने राज्याची सर्वसत्ता आपल्या हाती घेतली.

**अल्लाउद्दीन खिलजी** अल्लाउद्दीनने राज्य कारभार, सैन्य व आर्थिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या. अत्यावश्यक वस्तूंच्या व्यापारावर नियंत्रण ठेवले. मादक पदार्थांचे सेवन आणि जुगार याचा निषेध केला. असे करणाऱ्याना क्रुरपणे दंड केला.

**सैन्याचे आक्रमण** संपूर्ण भारत जिंकून आपल्या अधिपत्याखाली आणावे अशी अल्लाउद्दीन खिलजी याची महत्वाकांक्षा होती. सुरुवातीला त्याने आपल्या सैन्य शक्तीच्या जोरावर उत्तर भारतावर ताबा मिळविला. पुढे दक्षिण भारतावर ताबा मिळविण्यासाठी आपला गुलाम मलीक कपूर नावाच्या सरदाराला मोठ्या सैन्यानिशी पाठविले. मलिक कपूरने दक्षिण भारतातील चार राज्ये जिंकून घेतली व त्यांची राजधानी लूटली.

मलीक कपूरने जिंकलेली राज्ये– महाराष्ट्राचे यादव (राजधानी देवगिरी) आंध्राचे काकतीय (वारंगलू) कर्नाटकातील होयसळ (द्वार समुद्र) आणि तमिलनाडूचे पांड्य (मदुराई).

त्यानंतर कपूरने आपल्या सैन्याचे आक्रमण पुढे रामेश्वर पर्यंत चालू ठेवले. या दरम्यान त्याने अनेक देवालयांची अपार संपत्ती लूटली. धनसंपत्ती मोठ्या प्रमाणामध्ये जमा केली. दक्षिण भारतातून दिल्लीला इतक्या जास्त प्रमाणात संपत्तीचा ओघ यापूर्वी कधीही गेला नव्हता.

अल्लाउद्दीन खिलजी यानी अमीर खुस्त्रो, अमीर हसन इत्यादी पारशी कवीना प्रोत्साहन दिले. दिल्लीमध्ये सिरी नावाच्या किल्ल्याची निर्मिती केली. 'अलाई दरवाजा' ही त्यांची भव्य रचना होय.



**अलाई दरवाजा, दिल्ली**

अल्लाउद्दीन खिलजीचा शेवट फार दुःखद झाला. राजवाड्यात दंगा झाला. शेवटी मलीक कपूरने अधिकाराच्या जोरावर अल्लाउद्दीनला ठार मारले व स्वतः राजगादीवर बसला.

## तुघलक

तुघलक घराण्यामध्ये महंमद बिन तुघलक हा प्रमुख सुलतान होऊन गेला. हा अत्यंत विद्वान होता. परंतू अत्यंत रागीट व घाईगडबडीने निर्णय घेत असे. व्यवहार कौशल्य कमी होते. असे विचित्र गूण त्याच्याकडे होते.

**राज्यकारभारतील प्रयोग** आपल्या राज्यकारभारात सुधारणा घडवून आणण्यासाठी त्याने अनेक प्रयोग केले. त्यामध्ये प्रमुख म्हणजे राजधानीचे स्थलांतर राजधानी दिल्ली ऐवजी भारताच्या मध्यभागी असलेल्या देवगिरी येथे केल्यास ते आपल्या साम्राज्याचे मध्यवर्ती ठिकाण होईल असे त्याचे मत होते. दिल्लीहून 700 मैल दूर असणाऱ्या देवगिरीला दौलताबाद असे नामकरण करुन दिल्लीतील सर्व लोकांनी तेथे जावे असा सक्तीचा आदेश दिला. परंतू स्थलांतरासाठी गेलेल्या लोकांचे अपार कष्ट झाले. अनेक लोक वाटेतच मरण पावले. त्याने केलेली चूक त्याला समजली आणि लोकाना पून्हा दिल्लीला परत जायचे आदेश दिले. परंतू या कष्टातून जगलेले काही थोडेच लोक दिल्लीला परत जाऊन पोहचले.

महंमद बिन तुघलकाने हाती घेतलेली दुसरी एक सुधारणा म्हणजे चांदीच्या नाण्याऐवजी तेवढ्याच किंमतीची तांब्याची नाणी चलनात आणली. परंतू तांब्याची नाणी छापण्याचा अधिकार सरकारलाच आहे अशी राजाज्ञा केली नाही. परिणामी अनेक लोकांनी तांब्याची नाणी छापण्यास सुरुवात केली. त्या नाण्याच्या बदल्यात सरकारला चांदीची नाणी देणे साध्य झाले नाही. शेवटी तांब्याची नाणी रद्द करण्यात आली. एकूण लोकाकडून राजाची फसवणूक झाली. या प्रयोगामुळे राज्याची आर्थिक स्थिती बिकट झाली. महंमद बिन तुघलकाच्या राज्य कारभाराला कंटाळलेल्या असंतुष्ठ लोकानी बंड पुकारले. सिंध लोकांचे बंड मोडून काढत असताना तीव्र तापाने त्याचा मृत्यू झाला.

तुघलकानंतर सय्यद आणि लोदी वंशाच्या राजानी दिल्लीवर अल्पकाल कारभार केला. लोदी वंशाचा शेवटचा राजा इब्राहीम लोदी याचा मोगल राजा बाबराकडून पाणिपतच्या पहिल्या युद्धात पराभव केला. याप्रमाणे मोगल साम्राज्याचा पाया घातला.

## दिल्लीच्या सुलतानांचे योगदान

● **राज्यकारभार** दिल्लीच्या सुलतानांच्या राज्यात बहुसंख्येने हिंदू लोक होते. तरीसुद्धा त्याचा राज्यकारभार तुर्कीयांच्या पद्धतीनुसार चालत असे. सैन्यशक्ती हा त्याच्या राज्याच्या पाठीचा कणा होता. सैन्य शक्तीच्या जोरावर सुलतान हे निरंकुश सत्तेचे राजे होते. बल्बन हा सुलतान स्वतःला देवाचा प्रतिनिधी मानत असे. तो स्वतःला सर्वस्व समजत असे. दिल्लीच्या सुलतानाना स्थानिक राजांच्या प्रबळ विरोधाला सतत तोंड द्यावे लागत असे.

● **अर्थिक स्थिती** शेतकऱ्यांच्या जमिनीवरील कर अत्यंत विपरीत होते. महंमद बिन तुघलकाने आपल्या काळात जमिनीवरील कर अधिक वाढविले होते. त्याशिवाय त्याने निर्दयपणे त्याची वसुलीही केली. परिणामी शेतकऱ्यानी बंड पुकारले. विणकाम हा येथील लोकांचा प्रमुख उद्योग होता. शहरात बांधकाम व्यवसाय मोठया प्रमाणात चालत असे. त्यामुळे अनेक लोकाना रोजगार उपलब्ध होत होता. सुलतान प्रामुख्याने युद्धासाठी वापरणारे घोडे आयात करत असत.

● **वास्तुशिल्प आणि साहित्य** दिल्ली सुलतानाच्या काळातील प्रमुख वास्तुशिल्प म्हणजे प्रसिद्ध कुतुबमिनार (71 मी.उंच), अलाई दरवाजा हे सुंदर द्वार, कव्वत-उल-इस्लाम मशीद आणि सिरी किल्ला ही होत.

याच काळात उर्दू भाषा प्रचलित झाली. अमीर खुस्रो आणि अमीर हसन हे त्या काळातील प्रसिद्ध पर्शियन कवी होत अमीर खुस्रो हा एक प्रसिद्ध संगीतकार होता. तबला, सतार या संगीत वाद्यामध्ये तो पारंगत होता. त्याने स्वतःची अशी वेगळी ओळख निर्माण केली होती. जयशी नावाच्या उर्दू कवीने ‘पदमावत्’ हे सूफी काव्य लिहिले. रामानंद, कबीर, राईदास, मीरा हे सर्व या काळातील संत होत.

### कालगणता (सा.श.)

| | |
|---|---|
| सिंध प्रांतावर अरबांचे आक्रमण | 712 |
| महंमद गझनीच्या स्वाऱ्या | 1000 -1026 |
| तराईचे युद्ध (महंमद घोरी आणि पृथ्वीराज चौहान यांच्यातील) | 1191-1192 |
| दिल्लीच्या सुलतानांची कारकीर्द | 1206-1526 |
| कुतुबुद्दीन ऐबक | 1206-1210 |
| रजिया सुलताना | 1236-1240 |
| अल्लाउद्दीन खिलजी | 1296-1316 |
| महंमद बिन तुघलक | 1325-1351 |
| पानिपतची लढाई आणि मोगल साम्राज्याचा उदय | 1526 |

### नवीन शब्द.

मिनार-उंच खांबाचे गोपूर

## अभ्यास

### I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून पूर्ण करा.

1. पृथ्वीराज चौहान याने तराईच्या युद्धात __________ चा पराभव केला.
2. अल्लाउद्दिन खिलजीने दिल्लीत __________ किल्ल्याची निर्मीती केली.
3. इब्राहीम लोदीचा पराभव __________ याने केला.

### II. खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा.

1. तराईच्या दुसऱ्या युद्धात महंमद घोरीने कोणाचा पराभव केला?
2. कुतुबमिनार कोणी निर्माण केला?
3. दिल्ली सुलतानांच्या काळातील कारभार केलेली महिला कोण?
4. दक्षिण भारतावर आक्रमण केलेल्या अल्लाऊद्दीन खिलजीचा सेनापती कोण?
5. महंमद बिन तुघलखाने राजधानी कोठून कोठे स्तलांतरीत केली?
6. मी देवाचा प्रतिनिधी असे कोणत्या राजाने म्हटले?

### III. गटात चर्चा करुन उत्तरे लिहा.

1. महंमद गझनीच्या स्वाऱ्यांचे परिणाम लिहा.
2. दिल्लीवर कोणकोणत्या घराण्यानी राज्य केले?
3. कुतुबुद्दीन ऐबकाची कामगिरी लिहा.
4. अल्लाउद्दीन खिलजीची महत्वाकांच्छा काय होती?
5. महंमद बिन तुघलकाने केलेले प्रयोग कोणते?
6. दिल्लीच्या सुलतानानी वास्तुशिल्पकला व साहित्याला दिलेले योगदान कोणते?

## IV. अ गटातील घटकांचा ब गटातील घटकाशी जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| जयशी | अलाई दरवाजा |
| दौलताबाद | सितार |
| अल्लाउद्दीन खिलजी | पद्मावत |
| अमीर खुस्रो | देवगिरी |

### उपक्रम

1. दिल्लीच्या सुलतानांच्या काळातील वास्तुशिल्प कलांची चित्रे वर्णनासह संग्रह करा.
2. नकाशात दिल्ली सुलतानाच्या काळातील ऐतिहासीक स्थळे ओळखा.

☆ ☆ ☆

| पाठ 7 | मोगल |
|---|---|

**पाठाचा परिचय**

बाबरने भारतावर 1526 मध्ये आक्रमण केले. दिल्लीच्या सुलतानांचा पराभव करून मोगल साम्राज्याची स्थापना केली. या पाठामध्ये अकबर आणि औरंगजेबाच्या कारकिर्दीविषयी माहिती देण्यात आली आहे. याबरोबरच मोगलांचा राज्य कारभार आणि सांस्कृतिक योगदानाची माहिती दिलेली आहे. शेवटी या साम्राज्याच्या ऱ्हासाला कारणीभूत असलेली कारणे सांगितली आहेत. एकूणच हा दोन शतकांचा काळ प्रमुख राजकीय शक्ती म्हणून मोगलानी मिरवला. साहित्य कलेला दिलेले योगदान, साम्राज्याचा उदय आणि अस्त याविषयी माहिती दिलेली आहे.

**सामर्थ्ये**

1. अकबराच्या उदार निती आणि कामगिरीचे कौतुक करणे.
2. औरंगजेबाची संकुचित वृत्ती, देशामधील दंगे आणि ऱ्हासाला कशी कारणीभूत झाली ते समजून घेणे.
3. साहित्य आणि कलेमध्ये मोगल सम्राट कसे श्रीमंत होते हे जाणून घेणे.
4. मोगल साम्राज्यातील ऐतिहासिक स्थळे नकाशावर ओळखणे.

भारताच्या इतिहासात तीन प्रसिद्ध साम्राज्ये होऊन गेली. त्यापैकी पहिले म्हणजे मौर्य साम्राज्य, दुसरे गुप्त साम्राज्य, तिसरे म्हणजे मोगल साम्राज्य. मोगल साम्राज्याची स्थापना बाबर याने केली. सुरूवातीला त्याने अफगाणिस्तानातील काबूल या छोटया प्रदेशावर राज्य केलेले होते. समृद्ध अशा भारतावर आक्रमण करण्याची तो वाटच पहात होता.

बाबर : दिल्लीचे सुलतान दुर्बल झाल्यामुळे बाबरने दिल्लीवर आक्रमण करून तो भाग आपल्या अधिपत्याखाली आणला. तरी तो यावरच समाधानी झाला नाही. कारण येथील रजपूत आणि अफगाण राजानी त्याला प्रबळपणे विरोध केला. वीरयोद्धा असलेल्या बाबरने आपल्या युद्धकौशल्य आणि उत्तम शस्त्रांस्त्रांच्या जोरावर विरोधकाना धैर्याने तोंड देऊन पळवून लावले.

बाबरने दिल्ली, आग्रा आणि आजूबाजूचा प्रदेश तीन युद्धामध्ये जिंकून आपले साम्राज्य स्थापन केले. पण तो अल्पावधीतच मरण पावला. त्यानंतर त्याचा मुलगा हुमायून गादीवर आला.

**हुमायून** हुमायूनने सुरुवातीला आपल्या शत्रूना युद्धात हरविले पण अफगानचा सरदार शेर शाह सुरी याच्याकडून त्याला पराजय स्वीकारावा लागला. राज्य गमावल्यानंतर त्याने पर्शियाला पलायन करून तेथे 15 वर्षे वास्तव्य केले. अफगाण दुर्बल झाल्यावर हुमायूनने पुन्हा भारतावर आक्रमण करून दिल्ली ताब्यात घेतली. पण तो अल्पशा कालावधीतच मरण पावला.

## अकबर

हुमायूनचा मुलगा अकबर हा भारतावर साम्राज्य स्थापन्याची आकांक्षा घेऊनच भारतात आला होता. त्यासाठी त्याने रजपूत राजाना स्वतःला मदत करण्यास सांगण्याचा प्रयत्न केला. त्यापैकी काहीनी अकबराला साथ दिली. परंतु मेवाडचा राणा प्रतापसिंह याने अकबराला विरोधच केला. तो स्वाभिमानी तसाच महाशूरही होता. पुढे त्याच्याबरोबरच अकबराचे हळदीघाट (राजस्थान) येथे महाभयंकर युद्ध झाले. या युद्धात राणा प्रतापसिंहाचा पराभव झाला.



**अकबर**

तरीसुद्धा शेवटच्या क्षणापर्यंत त्याने आपली मान खाली वाकवली नाही.

अकबराने पुढे अनेक वर्षांचा काळ सैनिकांच्या संगतीत घालविला. त्याचा परिणाम म्हणून गुजरात, बंगाल, काश्मीर, काबूल इ. प्रदेश जिंकून मोठ्या साम्राज्याची स्थापना केली.

## अकबराची कामगिरी

**राज्यकारभार** अकबर हा उत्तम राज्यकर्ता तसेच विशाल मनोभावाचा होता. उत्तम राज्य चालविण्यासाठीचे सर्व चांगले गुण त्याच्याकडे होते. तो क्रुर राज्यकर्ता नव्हता. बहुसंख्य प्रजा हिंदु असल्याने त्यांची मने जिंकणे आवश्यक असल्याची जाणीव त्यांना होती. हिंदुना उच्च पदे दिली. मंगोल मुस्लीम राज्य कर्त्यानी हिंदुवर लादलेला 'जिसिया' (जिझिया) कर तसेच यात्रा कर रद्द केला. अकबराने सती पद्धत बंद केली. बाल विवाहाला विरोध केला. अकबराची भू-कर पद्धत सर्वसामान्याना रूचली होती. भू-कर पद्धत (महसूल पद्धत) राजा तोडरमल या मंत्र्याने शोधून काढली व यशस्वीपणे राबविली.

**धार्मिक निती** अकबर हे धार्मिक सहिष्णू होते. स्वतःची नवीन राजधानी फतेपूर सिक्री येथे इबादत खाना नावाचे एक प्रार्थना मंदिर बांधले. तेथे मुस्लीम पंथातील प्रमुखा बरोबर धार्मिक विचारांची चर्चा केली. हिंदु, जैन, बौद्ध, पारसी, ख्रिश्चन इत्यादी धर्म प्रमुखांना येथे बोलावून त्यांचे विचार समजून घेत असे. या चिंतनाचे फळ म्हणजे अकबराने 'दिन-ए-ईलाही' नावाचा नवा पंथ स्थापन केला. त्यामध्ये सर्व धर्मातील उत्तम अंशाचा स्वीकार केलेला होता. तरी केवळ हाताच्या बोटावर मोजण्या इतक्या लोकांनी त्याचा स्वीकार केला.

**कलेचे पोषण** अकबराने साहित्य कलेला प्रोत्साहन दिले. फैजी अबुल फजल आणि बिरबल हे त्यांच्या दरबारी असलेले श्रेष्ठ कवी होत. अमर संगीतकार तानसेन त्याच्या दरबारातील शोभा वाढवत असे. वास्तुशिल्प आणि चित्रकलेलाही अकबराने भरपूर प्रोत्साहन दिले.

अकबरानंतर आलेल्या जहाँगीर आणि शहाजहान यानी त्याची बरीचशी निती अवलंबली होती. शहाजहानने आग्र्यातील प्रसिद्ध ताजमहल, दिल्लीचा मोठा लाल किल्ला आणि भव्य राजमहल बांधून प्रसिद्धी मिळविली.

## औरंगजेब



औरंगजेब

शहाजहानचा मुलगा औरंगजेब हा शेवटचा प्रसिद्ध मोगल सम्राट होय. त्याने 50 वर्षांचा सुदीर्घ काळ राज्यकारभार केला. साम्राज्याचा अजूनही विस्तार केला. तरीसुद्धा त्याचा फार लवकर शेवट झाला.

**धार्मिक निती** औरंगजेब हा संप्रदायवादी मुसलमान होता. तो मद्यपान, द्यूत व संगीतापासून दूर होता. तो सरळजिवी होता. औरंगजेबाने अकबराची उदारनिती सोडून दिली. जिझीया कर पुन्हा लावला. यामुळे राजकीय अस्थिरता पसरली.

**शीखांचे दंगे :** औरंगजेबाच्या धर्म धोरणाने शीख, मराठा आणि जाटरसुद्धा भडकले. शीख गुरु तेज बहादुर याना बंदी करण्यात आले. त्याचा मुलगा गुरु गोविंद सिंग याने संपूर्ण शीख समुदायाला वीरदिक्षा दिली. दिक्षा घेतलेल्याना सिंग (सिंह) असे संबोधण्यात आले. ते पंच 'क' चे पालन करायचे. क म्हणजे केश (लांब केस), कंगा (कंगवा) कृपाण (किरूगती) कच्छे (छोटी विजार) आणि कंकण (लोखंडाचे कांकण) वापरत असत. हे आचरण शीखामध्ये आजही आहे.

**दंगे** उत्तर भारतामध्ये शीख आणि रजपूतानी औरंगजेबाचा कडाडून विरोध केला. दक्षिणेमध्ये शिवाजी महाराजांचा उदय झाला. ही भांडणे (दंगे) दिर्घकाल चालत राहिल्याने औरंगजेबाची सत्ता, संपत्ती, सैनिक आणि राज्याचा बराचसा भाग त्याला गमवावा लागला. त्यामुळे त्याची प्रतिष्ठाही कमी झाली. साम्राज्याचे बरेच प्रदेश स्वतंत्र झाले. दखखनच्या युद्धात तो आर्थिक आणि दैहिकरित्या बराच खचला होता. त्यामुळे तो दखखनमध्येच मरण पावला. याच्या अस्ता बरोबरच मोगलांची राज्यावरची पकड ढिली झाली.

## मोगलांचे सांस्कृतिक योगदान

### मोगलांचा राज्यकारभार

मोगल सम्राटाला सर्व नागरिक तसेच सैनिकी अधिकार होते. न्यायदान करताना याचा निर्णय हा अंतिम असायचा.

साम्राज्याचे प्रांत (सुपा), जिल्हा (सरकार) आणि तालुका (परगणा) असे भाग होते. नगरामध्ये कोतवाल नावाचा अधिकारी कायदा आणि सुव्यवस्था पहायचा.

**महसूल पद्धत** अकबराचा मंत्री राजा तोडरमलने भू-कर पद्धत ठरविली होती. त्यामुळे पिकाऊ जमिनीच्या आधारावर महसूल जमा केला जायचा.

**साहित्य** मोगलानी पर्शियन साहित्याला विशेष प्रोत्साहन दिले. अकबराच्या दरबारात अबुल फजल, निजामुद्दीन आणि बदौनी नावाचे प्रसिद्ध इतिहासकार होऊन गेले. अकबरनामा ही अबुल फजलची मुख्य कृती होय. मोगल राजकुमार 'दारा शुको' श्रेष्ठ विद्वान होता. त्याने भगवत गीतेचे भाषांतर केले. हिंदी साहित्यालाही राजाश्रय मिळाल्याने ती समृद्ध झाली 'रामचरितमानस' ही तुलसीदासांची प्रमुख कृती याच काळात तयार झाली.

**वास्तुशिल्पः** दिल्ली मधील हुमायूनची समाधी अकबराच्या सुरुवातीच्या काळातच बांधण्यात आली. त्याने फतेपूर सिक्री (आग्रा जवळ) येथे नवीन राजधानी निर्माण केली. राजधानीत भव्य असे राजमहल, मशिदी आणि मंटप देश विदेशातील प्रवाशांना आकर्षित करतात. येथील जामा मशिदीचे प्रवेशद्वार (बुलंद-दरवाजा) भारतामध्ये अति उंच आहे.



हुमायूनची समाधी, दिल्ली

मोगलांची वास्तुशिल्पकला शहाजहानच्या काळात आपल्या अत्यूच्य शिखरावर होती. त्याने आग्र्याच्या किल्ल्यात बांधलेला राजमहल, मोतीमहल अदूभूत आहेत. आग्र्यात बांधलेला ताजमहल हा मोगलांच्या वास्तूशिल्पकलेचा कळस ठरतो. त्याची राणी मुमताज हिच्या स्मरणार्थ ताजमहल बांधण्यात आला (17 वे शतक). या ताजमहल मध्ये मुमताज आणि शहाजहानची समाधी स्थळे आहेत. दिल्लीचा प्रसिद्ध लाल किल्ला शहाजहाननेच बांधला.



**किल्ला आग्रा**



**लाल किल्ला, दिल्ली**

**चित्रकला** मोगलांच्या काळात नवीन चित्रकला संप्रदाय जन्माला आला. त्याला 'चिकणी' असे म्हणतात. अकबराच्या दरबारात शंभरपेक्षा जास्त चित्रकार होते. जहांगीरच्या आश्रयाखाली चित्रकला परिपक्व झाली. मात्र संप्रदायवादी असलेल्या औरंगजेबाने चित्रकलेला प्रोत्साहन दिले नाही.



**तानसेन**

**संगीत** अकबराच्या काळात संगीत कलेला प्रोत्साहन देण्यात आले. त्या काळातील संगीतकारांचे सात भागात विभागणी करून गट तयार केले होते. दिवसाला एक गट अशाप्रकारे संगीत सभा चालवली जायची. 'तानसेन' हा अकबराच्या काळातील अमर संगीतकार होता. जहांगीर तसेच शहाजहानच्या काळातसुद्धा संगीताला प्रोत्साहन मिळाले. तरीसुद्धा औरंगजेबाने संगीताचा निषेध केला. पण लोकांच्या हृदयातील संगीताची आवड मात्र कमी करू शकला नाही.

### मोगल साम्राज्याचा ऱ्हास

औरंगजेबाच्या काळात मोगल साम्राज्य दुर्बल झाले. त्याची काही कारणे खालील प्रमाणे आहेत.

- ✻ सरदार भ्रष्ट झाले होते.
- ✻ सिंहासनाचा उत्तराधिकारी होण्यासाठी बराच अंतरकलह माजला होता.
- ✻ प्रांताधिकाऱ्यांनी याचा फायदा उठवत स्वतंत्र राज्यकारभार सुरु केला.
- ✻ सर्वात मुख्य कारण म्हणजे भारताचे इस्लाम धर्माच्या राज्यात परिवर्तन करण्यास औरंगजेबाला सर्व थरातून कडाडून विरोध झाला.
- ✻ शीख, रजपूत आणि मराठयाबरोबर दीर्घकाळ सुरू असलेल्या संघर्षामुळे साम्राज्याची शक्ती कमी झाली.
- ✻ या काळात नादीरशहा नावाच्या पर्शियन राजाने दिल्लीवर आक्रमण केले. त्या लढाईत त्याचा विजय झाला. मोगलानी 200 वर्षापासुन जमा केलेली धन संपत्ती त्याने लुटून नेली. जगप्रसिद्ध कोहीनूर हिरा आणि शहाजहानचे मयुरासन (मयूरसिंहासन) तो घेऊन गेला. मोगलांचा खजिना त्याने खाली केला.

### कालगणना (सा.श.)

| | |
|---|---|
| बाबर | : सा.श. 1526 - 1530 |
| अकबर | : सा.श. 1556 - 1605 |
| औरंगजेब | : सा.श. 1659 -1707 |

### नवीन शब्द

जिझीया : मुसलमान राजानी प्रत्येक हिंदुना दरडोई लावलेला कर.

यात्रा कर : तिर्थ क्षेत्रांना येणाऱ्या हिंदुना लावलेला कर.

## अभ्यास

### I. रिकाम्या जागा भरा.

1. हळदीघाटातील लढाईत अकबराने________________रजपूत राजाचा पराभव केला.
2. अकबराच्या ________________या मंत्र्याने भू कर पद्धत ठरविली.
3. ________________ या मोगल राजाने कलेला प्राधान्य दिले.
4. ________________ या राजाने संगीताला विरोध केला.

### II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

1. मोगल साम्राज्याचा संस्थापक कोण होता?
2. अकबराला विरोध केलेल्या मेवाडच्या राणांचे नाव लिहा.
3. ताजमहल कोठे आहे? तो कोणी बांधला?
4. मोगलाच्या काळातील प्रमुख इतिहास कारांची नावे लिहा.

### III. गटात चर्चा करुन उत्तरे लिहा.

1. इबादत खान बद्धल टिपा लिहा.
2. अकबराच्या धार्मिक धोरणाबाबत लिहा.
3. मोंगल साम्राज्याच्या काळातील वास्तुशिल्पा बाबत माहिती लिहा.
4. मोगल साम्राज्याच्या ऱ्हासाची कारणे कोणती?

## IV. जोड्या जुळवा.

| अ | ब |
|---|---|
| तुळशीदास | मयूर सिंहासन |
| अबुल फजल | दरडोई कर |
| शहाजहान | रामचरित मानस |
| जिझिया | फतेहपूर सिक्री |
| अकबर | अकबरनामा |

## V. उपक्रम

1. मोगलांच्या वास्तुकृतीची चित्रे माहितीसह संग्रह करा.
2. मोगल काळातील ऐतिहासीक स्थळे नकाशावर दाखवा.
3. अकबर आणि औरंगजेब यांच्या धार्मिक नितीतील विरोधाभास यावर चर्चा करा.

☆ ☆ ☆

| पाठ 8 | मराठे |
|---|---|

## पाठाचा परिचय

या पाठात शिवाजीचे बालपण, त्यांचे आदर्श, मोगल साम्राज्य आणि विजयपूर राज्यांच्या पराभवाच्या कथा, मराठी साम्राज्याची स्थापना, राज्यकारभार आणि त्यांचे अद्भूत व्यक्तित्व यांची माहिती दिलेली आहे.

## सामर्थ्य

1. शिवाजीचे जीवन, साहसी गूण आणि केलेले कार्य समजून घेणे.
2. नकाशात शिवाजीशी संबंधित ऐतिहासिक स्थळे ओळखणे.

उत्तर भारतामध्ये मोगलांच्या वर्चस्वाच्या काळातच दक्षिण भागात मोगलांचा पराजय करून मराठे सत्तेवर आले. मराठा घराण्याचा संस्थापक शिवाजी होय.

## शिवाजी



शिवाजी

शिवाजीचा जन्म पुण्याजवळील शिवनेरी किल्ल्यावर झाला. शिवाजीचे वडिल शहाजी भोसले हे विजापूरच्या आदिलशहाच्या दरबारी सरदार या उच्च पदावर होते. त्यामुळे शिवाजीचे पालन-पोषण आई जिजाबाई यांच्याकडे झाले. गुरू दादोजी कोंडदेव आणि तानाजी मालुसरे यानी शिवाजीला युद्धकला, शस्त्रास्त्र विद्या शिकविली. प्रारंभी शिवाजीने मराठ्याना व पश्चिम घाटातील मावळ्याना एकत्रित जमवून त्याना गनिमी युद्धनितीचे शिक्षण देऊन आपले मावळे तयार केले.

## शिवाजीची कामगिरी

शिवाजीने 19 व्या वर्षी विजयपूरच्या आदीलशहाच्या अधिन असलेला तोरणा किल्ला जिंकून घेतला. नंतर रायगड, सिंहगड, प्रतापगड इत्यादी किल्ले जिंकून घेतले. यामुळे क्रोधित झालेल्या विजापूरच्या आदिलशहाने शिवाजीला जीवे मारण्यासाठी सेनापती अफझलखानला पाठविले. अफझल खान व शिवाजी समोरासमोर भेटले. एकमेकाना आलिंगण देतेवेळी अफझलखानने शिवाजी राजाच्या पाठीत खंजीर खुपसणार इतक्यात शिवाजीने चपळाईने 'व्याघ्रनखांनी' त्याचा वध केला.

शिवाजीची किर्ती दिवसेंदिवस पसरत चालली. ती औरंगजेबाच्या कानापर्यंत पोहचली. औरंगजेबाने दख्खनमध्ये असलेला सरदार शाहिस्तेखान याला शिवाजीच्या बंदोबस्तासाठी पाठविले. परंतु शिवाजीनेच शाहिस्ते खानचा पराभव केला.

शाहिस्तेखानाने पुण्याच्या राजमहालात मुक्काम केला. दोन वर्ष झाली तरी त्याला शिवाजीला पकडणे शक्य झाले नाही. शिवाजीने एके रात्री वेष पालटून खान रहात होता तेथे हल्ला केला. खान तेथून पळून जात असताना शिवाजीने त्याची बोटे कापली. शाहिस्तेखानने भयभीत होऊन पुण्यातून पलायन केले.

शिवाजीच्या उपद्रवाने औरंगजेब संतापला. त्याने राजा जयसिंगला शिवाजीवर आक्रमण करण्यास पाठविले. यावेळी राजा जयसिंगचा उद्देश सफल झाला. शिवाजीने राजा जयसिंगबरोबर तह केला व काही किल्ले मोगलाना दिले. तह केल्यानंतर राजा जयसिंग शिवाजीला घेऊन औरंगजेबाची भेट घेण्याकरीता दिल्लीला गेले. औरंगजेबाने कपटाने शिवाजीला कैद करून आग्र्याला पाठविले. तेथून शिवाजीने युक्तीने पेठाऱ्यातून सूटका करून घेतली. तेथून तो आपल्या राज्यात सुखरूप पोहोचला.

पुढील दोन वर्षात शिवाजीने आपले स्थान पुन्हा भक्कम केले. तहात मोगलाना दिलेले सर्व किल्ले पुन्हा जिंकून घेतले. सुरत शहरावर पुन्हा हल्ला करून अपार संपत्ती लुटून स्वराज्यात आणली.



**शिवाजीचा किल्ला, रायगड**

## शिवाजीचा राज्याभिषेक

शिवाजीचा राज्याभिषेक राजधानी रायगडावर अत्यंत दिमाखात झाला. 'छत्रपती' ही पदवी धारण केली. आपले स्वराज्य 'हिंदवी स्वराज्य' असल्याची घोषणा केली. नंतर शिवाजीने जिंजी, येल्लूरू, मैसूरु प्रांताचा विशाल प्रदेश जिंकून अपार संपत्ती जमविली. पण मराठ्यांचे हे वैभव पाहण्यास शिवाजी फार काळ जगले नाहीत.

## शिवाजीचा राज्यकारभार

राज्य कारभारासाठी आठ प्रधानांचे एक मंडळ स्थापले होते. या अष्टप्रधान मंडळाच्या प्रधानमंत्रीला पेशवा असे संबोधन होते. शिवाजी महाराजांच्या मरणानंतर मराठा राज्यात निर्माण झालेले राजकीय संकट पेशव्यानी दूर केले. तसेच उत्तम राज्यकारभार सांभाळला. पुढे मराठा साम्राज्य हे पेशवा म्हणूनच उदयाला आले. बाळाजी विश्वनाथ, पहिले बाजीराव आणि बाळाजी बाजीराव हे मराठा साम्राज्यातील प्रमुख पेशवे होते.

**नवीन शब्दः**

गनिमी कावा : शत्रुशी समोरासमोर युद्ध न करता लपून केलेले युद्ध

छत्रपती : महाराज

## अभ्यास

**I. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहून पूर्ण करा.**

1. शिवाजीचे गुरु ________ हे होते.
2. शिवाजीने ________ च्या सहाय्याने अफजल खानाचा वध केला.
3. औरंजेबाच्या ________ या सरदाराने शिवाजीचा पराभव केला.

**II. खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

1.शिवाजीचा जन्म कोठे झाला?

2.शिवाजीच्या आई वडिलांची नावे सांगा.

3.विजयपुरच्या सुलतानाने शिवाजीला का विरोध केला?

4.शाहिस्तेखान कोण होता?

5.शिवाजीचा राज्याभिषेक कोठे झाला ? त्यावेळी त्यानी कोणती पदवी धारण केली?

6.मराठा साम्राज्यातील प्रमुख पेशव्यांची नावे लिहा.

**उपक्रमः-**

नकाशात शिवाजीशी संबंधित स्थळे ओळखा.

☆ ☆ ☆

## नागरिक शास्त्र

| पाठ 9 | आपले संविधान |
| --- | --- |

### पाठाचा परिचय

या पाठात संविधानाचा अर्थ, महत्व, रचना आणि त्याची लक्षणे यांचे निरूपण केले आहे.

सामर्थ्ये

1. संविधानाचा अर्थ आणि महत्व समजून देणे.
2. संविधानाच्या प्रस्तावनेचे महत्व समजून देणे.
3. भारतीय संविधानाची लक्षणे जाणून घेणे व प्रशंसा करणे.
4. संविधानाच्या रचना कार्यात भाग घेतलेल्या प्रसिद्ध व्यक्तीबद्धल समजून घेणे.
5. प्रजासत्ताक कल्पना समजून घेणे.
6. सर्वधर्म समभाव या तत्वाचा आशय जाणून नित्य जीवनात या मूल्यांचा समावेश करण्यास सशक्त होणे.
7. संविधानाचा गौरव करण्याची प्रवृती वाढविणे.

### संविधानाचा अर्थ आणि महत्व

संविधान म्हणजे एखाद्या देशाने अनुसरलेले मुलभूत कायदे होय. हा सरकारचा भाग असतो. त्यांचे अधिकार आणि कार्यांचे स्पष्टिकरण असते. संविधानात नागरिकांचे हक्क आणि कर्तव्ये यांचा उल्लेख असतो. संविधान सरकारसाठी मार्गदर्शक असते. संविधानाचे कोणीही उलंघन करू शकत नाही.

### संविधानाचे महत्व

संविधानात देशाचे मुलभूत कायदे असल्यामुळे ते फार महत्वाचे आहे. त्याला सर्वजण कटीबद्ध राहतात. राष्ट्रपती, पंतप्रधान, खासदार, न्यायाधीश, अधिकारी वर्ग आणि देशातील सर्वजण संविधानाचे पालन करण्यास कटीबद्ध आहेत.

- कायद्यासमोर सर्वजण समान आहेत हे सुत्र प्रजेच्या हक्कांच्या रक्षणाला महत्व देते.
- सरकारने कार्य करावयाच्या कार्याना मार्गसूची प्रमाणे कार्य करते.
- सरकारची अंगे असलेली शासकांग, कार्यांग आणि न्यायांग यांची कार्ये मार्गदर्शीत केली असून त्यांच्या मध्ये असणारा समन्वय साधण्यासाठी मदत होते.
- संविधान सरकार आणि व्यक्ती मधील उत्तम संबंध प्रस्तावीत करते.

**कृती:** डॉ. आंबेडकर हे कोण? त्याना आपण आज कृतज्ञता पूर्वक स्मरण का करतो. चर्चा करा.

### भारताच्या संविधान रचना सभा

भारताच्या संविधानासाठी संविधान रचना सभा ही विशेष सभा तयार केली. या सभेच्या सदस्यानी त्यांच्या पहिल्या अधिवेशननात डॉ. राजेन्द्र प्रसाद यांची अध्यक्ष म्हणून निवड केली.

संविधानाच्या सभेत 299 जण होते. 9 डीसेंबर1946 रोजी त्यांचे प्रथम अधिवेशन झाले.

### मसुदा समिती

संविधान रचना सभेने आपले कार्य गतीशील करण्याच्या उद्देशाने काही समित्यांची रचना केली. तसेच संविधानाची मसुदा प्रत तयार करण्यासाठी संविधान मसुदा समिती नेमली. या समितीचे अध्यक्ष डॉ. बी. आर. आंबेडकर होते.

• सदस्यानी संविधानाची मसुदा प्रत परिशिलन करून 2473 दुरुस्त्या सुचविल्या. मसुदा संविधान आणि दुरुस्त्यावर संविधान रचना सभेत सविस्तर चर्चा केली. या प्रमाणे संविधानाला अंतिम रूप देण्यासाठी सुमारे तीन वर्षांचा कालावधी लागला.

• डॉ. आंबेडकर 15-8-1947 पासून 26-1-1950 पर्यंत कायदा मंत्री होते.

भारताचे संविधान 26 जानेवारी 1950 रोजी अंमलात आले. या संविधानाने भारताला प्रजासत्ताक असे घोषित केले. त्याच्या आठवणीसाठी आम्ही प्रत्येक वर्षी 26 जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिन हा राष्ट्रीय सण म्हणून साजरा करतो. प्रत्येक वर्षी 26 नोव्हेंबर रोजी संविधान दिन म्हणून साजरा करतो. कारण या दिवशी केंद्र सरकारने संविधानाच्या मसुदा प्रतीचा स्वीकार करून अधिकृत स्वरूपात स्वीकारले.

संविधानाच्या मार्गदर्शी सुचनेनुसार भारतात 1951-52 साली प्रप्रथम निवडणूक झाली. राज्यसभा आणि लोकसभा या दोन सदनात प्रथम लोकनियुक्त संसद (पार्लमेंट) 1952 साली अस्तित्वात आली.

**आमच्या संविधानाची व्याप्ती :** भारतीय संविधानात 395 कायदे व 12 परिच्छेदांचा समावेश आहे.

## प्रस्तावना

आपल्या संविधानाच्या प्रारंभी सविस्तर प्रस्तावना आहे. ही प्रस्तावना संविधानाच्या ह्दयाप्रमाणे असून ती भारतीयांचे आदर्श आणि आकांक्षा प्रतिबिंबित करते. न्याय, स्वातंत्र्य, समानता, व्यक्ती गौरव, बंधुत्व, राष्ट्रीय एकात्मता या आदर्शांचा उल्लेख या मध्ये केला आहे.

## भारताचे सांविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम
समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य
घडवण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय;**
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा
व उपासना यांचे **स्वातंत्र्य;**
दर्जाची व संधीची **समानता;**
निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा आणि त्या
सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा व राष्ट्राची एकता
आणि एकात्मता यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन;

**आमच्या संविधानसभेत**

आज दिनांक 26 नोव्हेंबर 1949 रोजी याद्वारे
हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित करुन
स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.

## संविधानाची प्रमुख लक्षणे

**आपल्या संविधानाला स्वत:ची अशी काही लक्षणे आहेत.**

**लिखित संविधान** - भारताचे संविधान जगातील अती विस्तारीत संविधान आहे. त्यामध्ये शासकांग, कार्यांग व न्यायांग अशा शासनाच्या विविध अंगांची रचना, अधिकार आणि कर्तव्यांचा समावेश आहे. केंद्र सरकार व राज्य सरकार यासाठी एकच संविधान आहे. त्यामुळे त्याचा आकार मोठा आहे.

**गणराज्य :** भारत हे एक प्रजासत्ताक गणराज्य असल्याचे संविधानाने सुचविले आहे. प्रजासत्ताक गणराज्यात कोणा एका राजाचा कारभार चालत नसतो तर प्रजेकडून निवडून आलेल्या लोकप्रतिनिधी मार्फत कारभार चालविला जातो. अशी राजकीय व्यवस्था असलेला भारत देश हा एक प्रजासत्ताक गणराज्य आहे.



**डॉ. राजेंद्र प्रसाद**
संविधान समितीचे अध्यक्ष भारताचे प्रथम राष्ट्रपती



**डॉ. बी.आर. आंबेडकर**
संविधान मसुदा समितीचे अध्यक्ष



**जवाहरलाल नेहरु**
भारताचे पहिले पंतप्रधान

**मूलभूत हक्क व कर्तव्ये :** संविधानामध्ये सहा मूलभूत हक्क प्रजेला दिले आहेत. ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणलाही नाही. त्याच प्रमाणे तसा कोणताही कायदा करण्याचा अधिकार कोणत्याही राज्य सरकारला नाही. मूलभूत हक्कांचे उलंघन झाल्यास त्याचे संरक्षण करण्याचा अधिकार न्यायालयाला आहे. नागरिकानी आपल्याला मिळालेल्या हक्कांचा मनाला वाटेल तसा वापर करून सामाजिक अशांतीस कारणीभूत होऊ नये. संविधानामध्ये नागरिकांनी करावयाच्या अकरा कर्तव्यांचा उल्लेख आहे.

**सर्व धर्म समभाव (सेक्युलॅरीजम):** संविधानाने सर्वधर्म समभाव धर्म निरपेक्षता या तत्वाचा अंगिकार केला आहे. संविधानात्मक सर्वधर्म समभावाला धर्म निरपेक्षता असे म्हणतात. यामध्ये जात, पंथ, धर्म यात भेदभाव नसतो. सरकारने कोणत्याही प्रकारचा पक्षपात न करता सर्व धर्मियाना समान भावनेने पाहणे होय. सरकारने कोणत्याही धर्माला राष्ट्रीय धर्म म्हणून मान्यता दिलेली नाही. प्रत्येकाला आपल्या धर्मा प्रमाणे व चालीरीती प्रमाणे आचरण करण्याचे स्वातंत्र दिले आहे. सामाजिक हीताच्या दृष्टीने धार्मिक स्वातंत्र्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार सरकारला आहे.

**स्वतंत्र न्यायांग:** आपली न्याय व्यवस्था शासकांग व कार्यांग यापासून स्वतंत्र असून अनेक अधिकार त्याच्याकडे आहेत. सरकार किंवा संसद न्याय व्यवस्थेमध्ये कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप करू शकत नाही. कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. न्याय मिळविण्याचा अधिकार सर्वांना आहे. या तत्वांचा पुरस्कार न्यायांगने केला आहे. सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय सर्वांनी पाळलाच पाहिजे. तोच अंतीम निर्णय होय.

**प्रौढ मतदान पद्धत :** सर्व पौढ मतदार (18 वर्षा वरील) मतदानाद्वारे लोक प्रतिनिधींची निवड करतात. या पद्धतीला प्रौढ मतदान पद्धत म्हणतात. नागरिक कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता मतदान करतात. तेव्हा उत्तम सरकार स्थापन होते.

सर्वांना सामाजिक आणि आर्थिक सुबत्ता मिळवून देण्याचे ध्येय ठेवलेल्या राज्याला सुखी कल्याणकारी राज्य असे म्हणतात.

सुखी व कल्याणकारी (वेल्फेअर स्टेट) राज्याची स्थापना करणे हेच भारतीय संविधानाचे मुख्य ध्येय आहे.

**निवडणूक पद्धत :** भारत हा जगातील सर्वात मोठा लोकशाही देश आहे. गेल्या सहा दशकामध्ये वेळोवेळी सार्वजनिक निवडूणका झाल्या आहेत. या काळात लोकशाहीची मुळे खोलवर रूजली आहेत. या कार्य पद्धती मध्ये काही कमतरता असल्या तरी ही पद्धत समाधानकारक आहे.

**नवीन शब्द :** संविधान मसुदा समिती : संविधान समिती मध्ये संविधानाचा मूळ कच्चा मसुदा तयार करण्यासाठी नेमण्यात आलेली उपसमिती होय.

प्रजासत्ताक : प्रजेच्या हातात सत्ता असणे होय.

## अभ्यास

### I. गटात चर्चा करून उत्तरे द्या.

1. संविधान म्हणजे काय ?
2. संविधान समितीचे अध्यक्ष कोण होते ?
3. डॉ. बी.आर. आंबेडकर यानी संविधान रचना कार्यात कोणते योगदान दिले ?
4. भारताला कोणत्या दिवशी प्रजासत्ताक राष्ट्र म्हणून घोषित करण्यात आले ?
5. प्रौढ मतदान पद्धत म्हणजे काय?
6. गणराज्य म्हणजे काय ?
7. सर्वधर्म समभाव म्हणजे काय ?

### II. चर्चा करा.

प्रस्तावनेत उल्लेखिलेली तत्वे व आदर्श या संबंधी चर्चा करा.

### III. उपक्रम

1. आपल्या संविधानाने आम्हाला हक्क व कर्तव्ये दिलेली आहेत. हक्क व कर्तव्ये या मध्ये तुमच्या मते कोणते मुख्य आहेत ? गटात चर्चा करून तुमचा अभिप्राय लिहा.
2. संविधान रचना समितीतील सदस्यांच्या चित्रांचा संग्रह करा.

☆ ☆ ☆

| पाठ 10 | मूलभूत हक्क आणि कर्तव्ये |
|---|---|

**पाठाचा परिचय**

आपल्या संविधानाने भारताच्या प्रत्येक नागरिकास दिलेल्या हक्क व कर्तव्यांचा परिचय या पाठात दिला आहे.

**सामर्थ्ये**

1. स्वाभाविक हक्क व मूलभूत हक्क यातील फरक समजून देणे.
2. भारतीय नागरिकाना संविधानाने दिलेल्या मूलभूत हक्कांचा अर्थ समजून देणे.
3. संविधानाने सांगितलेल्या अकरा मूलभूत कर्तव्ये समजून घेऊन ती आपल्या जीवनात आचरणात आणणे.
4. आपल्याला मिळालेले हक्क उपभोगताना अडचण आल्यास ते हक्क पुन्हा मिळविण्याचे उपाय समजून घेणे.

**हक्क** म्हणजे नागरिकाला मिळालेला अधिकार होय. या मध्ये **स्वाभाविक हक्क** सुद्धा असू शकतात. उदा. जगण्याचा हक्क, जीव रक्षणाचा हक्क तसेच **न्याय संमत हक्क** असू शकतील. उदा. समानतेचा हक्क, शिक्षणाचा हक्क.

प्रत्येक नागरिकाच्या विकासासाठी आणि राष्ट्राच्या प्रगतीसाठी काही हक्क आणि कर्तव्ये असलीच पाहिजेत. त्या साठीच आपल्या संविधानाने नागरिकासाठी काही मूलभूत हक्क दिलेले आहेत.

## मूलभूत हक्कांचा अर्थ

व्यक्तीच्या व्यक्तीत्व विकासासाठी संविधानाने दिलेल्या संधी म्हणजेच **मूलभूत हक्क** असे म्हणतात. हे नागरिकाला दिलेले संविधानात्मक हक्क आहेत. मूलभूत हक्क सामाजिक जीवनाला आवश्यक आहेत. याचे कोणी उल्लंघन करू नये. मूलभूत हक्काना न्यायालयीन रक्षण आहे.

## मूलभूत हक्कांचे प्रकार

संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला सहा मूलभूत हक्क दिले आहेत. ते पुढील प्रमाणे.

| | |
|---|---|
| 1. समानतेचा हक्क | 4. धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क |
| 2. स्वातंत्र्याचा हक्क | 5. सांस्कृतिक व शैक्षणिक हक्क |
| 3. शोषणा विरुद्ध हक्क | 6. संविधानानुसार न्यायालयात दाद मागण्याचा हक्क |

### आता हे सहा हक्क समजून घेऊ

### 1] समानतेचा हक्क

कायद्यासमोर सर्वजण समान आहेत. कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. सर्वांना समान संरक्षण मिळावे असा समानतेच्या हक्काचा आशय आहे.

धर्म, वंश, जात, लिंग, जन्मस्थळ या कारणावरुन राज्यानी कोणताही पक्षपात करु नये. दुकान, उपाहारगृह, मनोरंजनाची स्थळे येथे प्रवेशासाठी कोणालाही निर्बंध घालू नये. सार्वजनिक विहिरी, तलाव, रस्ते आणि विश्रांती स्थळांचा वापर करण्यासाठी बंदी असू नये. सरकारी सेवेत रुजू होण्यासाठी सर्वांना समान संधी आहे. सार्वजनिक प्रार्थना स्थळामध्ये त्या त्या जाती धर्माच्या व्यक्तीस प्रवेश व प्रार्थना करणेस कोणत्याही प्रकारचा निर्बंध असणार नाही.



**समानता**

## 2] स्वातंत्र्याचा हक्क

संविधानाने प्रत्येकाला दिलेले स्वातंत्र्याचे हक्क पुढीलप्रमाणे आहेत.

1. भाषण व विचार व्यक्त करण्याचे स्वातंत्र्य.
2. शांततेने सभेत भाग घेण्याचे स्वातंत्र्य.
3. संघ संस्था स्थापन करण्याचे स्वातंत्र्य.
4. देशात कोठेही मुक्तपणे संचार करण्याचे स्वातंत्र्य.
5. भारताच्या कोणात्याही भागात वास्तव्य करण्याचे स्वातंत्र्य.
6. कोणताही उद्योग, व्यापार, नोकरी, धंदा, व्यवहार करण्याचे स्वातंत्र्य.



**भाषण स्वातंत्र्य**

**कृती :** भाषण स्वातंत्र्याच्या महत्वाबद्धल एक चर्चासत्र आयोजित करुन अभिप्राय संग्रह करा.

स्वातंत्र्याचा हक्क एक मूलभूत हक्क असला तरी त्याचा मनाला येईल तसा वापर करता येणार नाही. काही संदर्भात व्यक्ती स्वातंत्र्यावर राज्याना काही निर्बंध घालता येतील असे संविधानाने सुचविले आहे. उदा. भाषण स्वातंत्र्य आहे म्हणून कोणत्याही व्यक्ती बद्धल अवास्तव बोलू नये. त्यांची मानहानी करु नये.

### 3] शोषणा विरूद्ध हक्क

गरिबांचे, स्त्रियांचे, बालकांचे आणि दुर्बलांचे शोषण करु नये. हाच या हक्काचा उद्देश होय. धर्म, जात, वर्ग आणि लिंगानुसार होणाऱ्या शोषणाचा निषेध करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारने अनेक कायदे अस्तित्वात आणले आहेत. उदा. हुंडा देणे व घेणे कायद्याने गुन्हा मानला आहे. खाणकाम, बिडी तयार करणे, फटाके तयार करणे अशा अपायकारी कामावर मुलाना ठेवण्यास मनाई आहे. बालकाने चौदा वर्षापर्यंत सक्तीने शिक्षण घेतले पाहिजे.

### 4] धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क

भारतीय नागरिक आपल्याला आवडलेला धर्म स्वीकारुन त्याचे नियम लक्षात घेऊन आपल्या धर्माचे आचरण करण्याचा हक्क सर्वाना आहे. सार्वजनिक शांती, शिस्त, आरोग्य आणि प्रदूषणाला धक्का न लावता इतर नियम लक्षात घेऊन आपल्या धर्माचे आचरण करण्याचा हक्क सर्वाना आहे. जबरदस्तीने, फसवून तसेच अमिष दाखवून धर्मांतर करु नये असे संविधानाने सुचविले आहे.



**धार्मिक स्वातंत्र्याचा हक्क**

## 5]     सांस्कृतिक व शिक्षणाचा हक्क

धार्मिक आणि भाषिक अल्प संख्याकांच्या हिताचे संरक्षण करणे हा या हक्काचा मुख्य उद्देश आहे. प्रत्येकाला आपली भाषा, लिपी अथवा संस्कृतीचे रक्षण करण्याचा हक्क आहे. अल्पसंख्यांकाना स्वतःची शैक्षणिक केंद्रे स्थापन करुन ती व्यवस्थित चालविण्याचा हक्क आहे. मात्र या शिक्षण संस्था राज्य सरकारच्या नियमानुसार चालविल्या पाहिजेत.



**सांस्कृतिक व शिक्षणाचा हक्क**

## 6]     संविधानानुसार न्यायालयात दाद मागण्याचा हक्क

मूलभूत हक्कांचे उल्लंघन झाल्यास नागरिक न्यायालयात दाद मागू शकतो. या हक्काला संविधानानुसार **न्यायालयात दाद मागण्याचा हक्क** असे म्हणतात. या द्वारे इतर मूलभूत हक्कांचे संरक्षण होऊ शकते.

मुलभूत हक्क म्हणजे प्रत्येक नागरिकाला संविधानाकडून प्राप्त झालेले हक्क होत. या हक्कांचे संसद, विधानसभा, कायद्याने कोणताही अधिकारी वर्ग, पोलिस यांच्यासह कोणत्याही सरकारी, सार्वजनिक संस्थाना हे हक्क हिरावून घेता येत नाहीत. यांचे उल्लंघन झाल्यास सदर व्यक्ती सरळपणे उच्च न्यायालय अथवा सर्वोच्च न्यायालयात आपल्यावर झालेल्या अन्यायाविरुद्ध दाद मागू शकते, मूलभूत हक्कासंबंधी सर्वोच्च न्यायालयात अथवा उच्च न्यायालयात दाद मागण्याचा अर्जाला **रिटअर्ज** म्हणतात.

## 2.3 मूलभूत कर्तव्ये

मूलभूत हक्क व कर्तव्ये या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. कर्तव्य म्हणजे नागरिकाने आपल्या देशासाठी करावयाचे कार्य होय. प्रत्येक नागरिकाने या मूलभूत कर्तव्यांचे पालन स्वयंस्फर्तीने केल्यास देशाची प्रगती सहजपणे होते. संविधानामध्ये अकरा मूलभूत कर्तव्यांचा समावेश आहे. ती खालील प्रमाणे.

1. संविधान, राष्ट्रध्वज आणि राष्ट्रगीत यांचा आदर करणे.
2. स्वातंत्र्य संग्रामातील स्फूर्तिदायी आदर्शाची जोपासणा करणे.
3. भारताच्या एकात्मतेचे रक्षण करणे.
4. मातृभूमीचे रक्षण करणे.
5. आम्ही सर्व भारतीय आहोत ही भावना वाढविणे.
6. आपली समृद्ध सांस्कृतिक परंपरा तसेच ऐतिहासिक स्मारकांचे रक्षण करणे.
7. नैसर्गिक साधन संपत्तीचे संरक्षण व संवर्धन करणे.
8. वैज्ञानिक मनोभाव व वैचारिकता वाढविणे.
9. सार्वजनिक संपत्तीचे रक्षण करणे व हींसेचा त्याग करणे.
10. वैयक्तीक आणि सामुहीक कृतीद्वारे प्राविण्यता मिळवून देशाच्या प्रगतीसाठी हातभार लावणे.
11. सर्व आईवडीलानी आणि पोषकानी 6 ते 14 वयोगटातील मुलाना शिक्षण घेण्याची संधी प्राप्त करून देणे.



राष्ट्रध्वजाचा मान राखणे



परिसराचे संरक्षण

**कृती :** परिसर संरक्षण व संवर्धनात विद्यार्थ्यांचे पात्र या विचारा संबंधी चर्चासत्र आयोजित करून अभिप्राय संग्रहित करा.

नागरिकानी आपली मूलभूत कर्तव्ये योग्य रितीने पार पाडल्यास सरकार न्यायालयात विचारणा करण्याचा प्रश्नच उदभवणार नाही. परंतू देशातील सर्व नागरिकानी स्वयंस्फूर्तीने मूलभूत हक्कांचे पालन केले पाहिजे.

## अभ्यास

### गटात चर्चा करून उत्तरे द्या.

1. मूलभूत हक्क म्हणजे काय ?
2. समानतेचा हक्क म्हणजे काय ?
3. सामाजिक आणि आर्थिक शोषण कसे होते ? उदा द्या.
4. मूलभूत कर्तव्ये आपण स्वयंस्फूर्तीने का केली पाहिजेत ?
5. कोणतीही तीन मूलभूत कर्तव्ये लिहा.

### चर्चा करा.

1. मूलभूत हक्कांचे महत्व.
2. शालेय परिसरात विद्यार्थ्यानी करावयाची कर्तव्ये.

### उपक्रम

1. मूलभूत हक्क आणि कर्तव्ये याबध्दल मुलाना दोन तीन मिनिटे भाषण करण्यास सांगा.
2. नागरिकाकडून मूलभूत कर्तव्ये न केलेल्या प्रसंगाची माहिती मुलाकडून विचारून घेणे. उदा. गावच्या सार्वजनिक तळयात टाकाऊ वस्तू टाकतात. प्राचीन किल्ल्यावर नावे लिहितात. मतदान करत नाहीत.
3. हक्काप्रमाणे कर्तव्याना द्यावयाच्या प्राधान्याबाबत चर्चा करा.

☆ ☆ ☆

| पाठ 11 | राज्यांची मार्गदर्शक तत्वे |
| --- | --- |

## पाठाचा परिचय

आपल्या संविधानाच्या प्रस्तावनेत काही मार्गदर्शक तत्वांचा समावेश आहे. त्या ध्येय धोरणांची पूर्तता करण्यास ती तत्वे आपल्याला उपयुक्त ठरतात. त्यांचे वर्णन या पाठात केले आहे.

### सामर्थ्ये

1. राज्यांच्या मार्गदर्शक तत्वांचा उद्देश समजून घेणे.
2. राज्याची मार्गदर्शक तत्वे ही सुखी-कल्याणकारी राज्याच्या निर्मितीस कशी उपयुक्त ठरतात हे समजून घेणे.

## राज्य मार्गदर्शक तत्वांचा अर्थ

आपल्या संविधानाने सुखी राज्य निर्मितीच्या ध्येयाची तरतूद केली आहे. अशा मार्गदर्शक ध्येय धोरणाना **राज्याची मार्गदर्शक तत्वे** असे म्हणतात. कोणतेही सरकार अधिकारावर आले तरी मार्गदर्शक तत्वांचे भान ठेवून राज्यकारभार चालवावा हा त्यामागील प्रमुख उद्देश आहे. भारताच्या संपूर्ण प्रगतीसाठी ही मार्गसूची आहे.

## राज्य मार्गदर्शक तत्वांची प्रामुख्यता

राज्य मार्गदर्शक तत्वे केंद्र आणि राज्य सरकारना संविधानाने दिलेली मार्गसूची होय. कायद्याची रचना करताना, नीती नियम करताना व त्यांची अंमल बजावणी करताना या तत्वांचा अवलंब करणे आवश्यक असते. स्वातंत्र्य, समानता, एकता साध्य करण्यासाठी आणि सुखी राज्य निर्माण करण्यासाठी राज्य मार्गदर्शक तत्वे मुख्य असतात.

## राज्य मार्गदर्शक तत्वे खालील प्रमाणे आहेत

1. **सामाजिक न्याय** समाजात नागरिकाना सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळवून देऊन लोककल्याण साधणे.
2. **दुर्बलाना सामाजिक न्याय** दुर्बलाना जीवनाधार देऊन त्यांची आर्थिक शोषणापासून मुक्तता करणे. शैक्षणिक सोयी मिळवून देणे आणि मोफत कायद्याचा सल्ला मिळवून देणे.
3. **महिला आणि बालकल्याण** एकाच प्रकारचे काम करणाऱ्या स्त्री पुरुषाना समान वेतन मिळावे. महिलाना प्रसूती सुविधा मिळवून देणे. शोषणाला आळा घालणे. त्यांची निरोगी वाढ होण्यासाठी सकस आहार देणे. तसेच मोफत व सक्तीचे प्राथमिक शिक्षण देणे.



**महिला व बाल कल्याण**



**मोफत व सक्तीचे शिक्षण**

**4. कामगार कल्याण :** कामगारांचे हित पाहणे. काम करण्याचा हक्क, तसेच ते करण्यासाठी अनुकूल वातावरण निर्माण करणे. त्याना किमान वेतन मिळवून देणे व राज्यकारभारात भाग घेण्याची संधी देणे.

**5. गरजूना मदत :** वृद्ध, रोगी आणि निरुद्योगी यांना सरकारकडून मदत मिळवून देणे.

**6. सर्वाना समान कायदा :** भारतातील सर्व नागरिकाना समान नागरी कायदा लागू करणे.

**7. मद्यपान निषेध:** मद्यपानाने आरोग्याची हानी होते. कुटूंबाची आर्थिक स्थिती बिघडते. स्त्रियांची पिळवणूक वाढते. याकरिता आपल्या संविधानामध्ये मद्यपान निषेध कायदा लागू करण्यास सर्व राज्य सरकारना मार्गदर्शन करण्यात आले आहे.

**8. कृषी आणि प्राणी संगोपन संघटना**

राज्यानी कृषी आणि पशू, संगोपनासाठी आधुनिक आणि वैज्ञानिक पद्धतीने संघटना बांधण्याचा प्रयत्न करणे. विशेष जातीचे संरक्षण करुन उत्तम उत्पन्नासाठी गायी व म्हशी तसेच दूध देणाऱ्या इतर प्राण्यांची व वजन वाहणाऱ्या प्राण्यांची हत्याबंदीचा कायदा करण्याचा क्रम हाती घ्यावा असे संविधानाने मार्गदर्शक केले आहे.



**कृषी अभिवृद्धी**



**आधुनिक शेती**

**9. परिसर:** परिसरातील नैसर्गिक साधन संपत्तीचे रक्षण करणे व यांचे संवर्धन करणे. उदा: खाणकाम, उद्योगधंदे यापासून होणाऱ्या प्रदुषणापासून परिसराचे रक्षण करणे. तसेच वन्य जीवांचे रक्षण करणे.

**10. ऐतिहासिक स्मारकांचे रक्षण :** ऐतिहासिक स्थळे व स्मारकांचे रक्षण करणे. उदा. हंपी, बेलूर, हळेबिडू, पट्टदकल इत्यादी प्रेक्षणीय स्थळांचे रक्षण करणे.



**चन्नकेशव देवालय बेलूर**

**11. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता:** आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी देशाने भाग घेणे.

सामाजिक न्याय म्हणजे काय ? जात, धर्म, लिंग, भाषा, वर्ग, प्रदेश आणि अंतर्गत भेदभाव न करता सर्व नागरिकांचे रक्षण करणे. तसेच सर्वांना समान दृष्टिकोनातून पाहणे म्हणजेच सामाजिक न्याय होय. मागास वर्गीयांचे हित, कनिष्ठ वेतन, गुलामगिरीचे निर्मूलन, मुलांच्या शोषणाचे निर्मूलन, स्त्रियाना समान हक्क, तसेच त्यांचा आदर करणे. या सर्वांचा समावेश सामाजिक न्यायामध्ये होतो.

संविधानाने राज्यांना अनेक मार्गदर्शक तत्वे दिली आहेत. परंतू त्यांचे उल्लंघन झाले तरी नागरिकांना त्याविरुद्ध न्यायालात दाद मागता येणार नाही. उदा. सहा दशके झाली तरी केंद्र सरकारने व अनेक राज्य सरकारनी मद्यपान निषेध कायदा अंमलात आणला नाही. त्याविरुद्ध न्यायालयात दाद मागता येणार नाही.

**कृती :** राज्य मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी आपल्या राज्यात किती प्रमाणात झाली आहे ? आजही वेगवेगळ्या प्रकारे शोषण होत आहे. याविषयी चर्चा सत्राचे आयोजन करुन अभिप्रायांचा संग्रह करा.

## अभ्यास

### I. गटात चर्चा करुन उत्तरे द्या.

1. राज्यांची मार्गदर्शक तत्वे म्हणजे काय ?
2. महिला आणि बालकल्याण स्थापन्यासाठी संविधानाने कोणती मार्गदर्शक तत्वे सांगितली आहेत?
3. सर्वांना समान कायद्याची आवश्यकता का आहे?
4. मद्यपान निषेध कायदा अंमलात आणण्यासाठी राज्याना का निर्देश दिले आहेत?

### II. चर्चा करा.

1. दुर्बलाना सामाजिक न्याय.
2. मद्यपान निषेध.
3. ऐतिहासिक स्मारकांचे रक्षण.
4. मुलांचा शिक्षण हक्क कायदा अधिक प्रभाविपणे राबविण्यासाठी काय करु शकतो?

### III. उपक्रम

1. तुमच्या सभोवताली समाजात आढळणाऱ्या सामाजिक आणि आर्थिक दुर्बल असणाऱ्यांचे निरिक्षण करा. ते का दूर्बल आहेत याविषयी मित्राशी चर्चा करा.
2. मद्यपान आणि मादक पदार्थांचा युवा पिढीवर काय दुष्परिणाम होत आहे. याबाबत एक चर्चासत्र आयोजित करुन अभिप्राय संग्रह करा.
3. मुलांचा हक्क मुलांच्या सर्वांगिण विकासाला आवश्यक आहे. त्याचे उल्लंघन झाल्यास '**चाईल्ड** लाईन 1098' या सहाय्यवाणीला फोन करु शकता. या संदर्भात चर्चासत्राचे आयोजन करुन अभिप्राय संग्रह करा.

☆ ☆ ☆

| पाठ 12 | उत्तर अमेरिका - 'प्रेअरी प्रदेश' |
|---|---|

## पाठाचा परिचय

मागील वर्गात तुम्ही आशिया, युरोप आणि आफ्रिका या खंडांचे भूस्वरुप स्वाभाविक विभाग आणि त्यांची प्रामुखता याविषयीचा अभ्यास केला आहात. या वर्गात तुम्ही उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया आणि अंटार्क्टिका या खंडांची अधिक माहिती समजून घ्याल.

प्रस्तूत पाठात उत्तर अमेरिका खंडाचे स्थान, विस्तार, भौगोलिक स्वरुप, स्वाभाविक विभाग, हवामान आणि नैसर्गिक साधन संपत्ती, वनस्पती, प्रमुख खनिजे तसेच उद्योगधंदे, लोकसंख्यावाढ, विभागणी आणि घनता याचा परिचय करुन दिला आहे.

## सामर्थ्ये

1) उत्तर अमेरिकेचे स्थान, विस्तार, भौगोलिक स्थिती समजून घेणे.
2) उत्तर अमेरिकेच्या स्वाभाविक विभागाच्या विविधतेची तुलना करुन समजून घेणे.
3) उत्तर अमेरिकेतील नद्या आणि महासरोवरासंबंधिची माहिती समजून घेणे.
4) उत्तर अमेरिकेच्या हवामानातील विविधतेचा नैसर्गिक साधन संपत्ती तसेच प्राणी जीवनावर होणारा प्रभाव समजून घेणे.
5) उत्तर अमेरिकेतील शेतीचा विकास समजून घेणे.
6) प्रमुख खनिजांच्या समृध्दीचा वापर करुन उत्तर अमेरिकेने उद्योगधंद्यांचा विकास कसा साधला हे समजून घेणे.
7) उत्तर अमेरिकेतील लोकसंख्येची वाढ, घनता व विभागणी समजून घेणे.

काही शतकापूर्वीच उत्तर अमेरिका खंडाचा शोध लागला. 1501 मध्ये इटलीचा नाविक अमेरिगो वेसपुसी या खंडावर पोहोचला. त्यामुळे त्याच्या नावातील प्रथम पद अमेरिगो यावरुन या खंडाचे नाव अमेरिका असे संबोधण्यात आले. या खंडातील बहुतेक रहिवासी हे युरोपियन आणि इतर देशातून स्थलांतरित होऊन आलेले आहेत. त्यातील स्पेनच्या लोकांनी मेक्सिकोच्या सोन्याचा व्यापार केला.

फ्रेंचानी कॅनडामध्ये लोकरीच्या (Fur) व्यापारामध्ये भरपूर फायदा मिळविला. ब्रिटिशांनी कॅनडातील अटलांटिक प्रांत आणि न्यू इंग्लंड मध्ये मच्छीमारीचा व्यवसाय

केला त्याचबरोबर तेथील अरण्य संपत्तीची लूट केली.




*उत्तर अमेरिका (राजकीय)*

उत्तर अमेरिकेत असणारी नैसर्गिक समृध्द साधन संपती तेथील विज्ञान आणि

तंत्रज्ञानाच्या विकासास पोषक ठरली आहेत. विस्तीर्ण अशा स्थानिक बाजारपेठा, आंतरराष्ट्रीय व्यापारी संबंध, विकसित दळणवळण व्यवस्था इत्यादी गोष्टी उत्तर अमेरिका हा जगातील अति विकसित प्रदेश होण्यास सहाय्यक ठरल्या आहेत. त्यामुळे उत्तर अमेरिकेतील देश श्रीमंत आणि आर्थिकदृष्ट्या समृद्ध आहेत. त्यामुळेच हा खंड एक आदर्श खंड म्हणून इतर खंडांशी तुलना करुन समजून घेणे आवश्यक आहे.

## 1. जमीन, स्थान आणि विस्तार

उत्तर अमेरिका हा खंड पूर्णपणे विषुववृत्ताच्या उत्तरेला आहे. तो 19° उत्तर अक्षांशापासून 71° उत्तर अक्षांशा पर्यंत पसरला आहे. 50° पश्चिमेपासून 150° पश्चिम रेखांशापर्यंत आहे. कर्कवृत्त (23 1/2 ° उ. अक्षांश) हे याखंडाच्या दक्षिण भागातून तर आर्क्टिक वृत्त (66 1/2 ° उ.अ) हे या खंडाच्या उत्तरेकडील भागातून गेले आहे. या खंडाच्या पूर्वेला अटलांटिक महासागर, पश्चिमेला पॅसिफिक महासागर आणि उत्तरेला आर्क्टिक (उत्तर शीत) सागर यांनी वेढला आहे. बेरींगच्या साम द्रधुनीमुळे हा खंड आशिया खंडापासून वेगळा झाला आहे. त्याच बरोबर पनामा कालव्यामुळे याचा दक्षिण अमेरिका खंडाशी संपर्क साधला आहे. येथे अनेक लहान लहान जलभाग आपल्याला पाहावयास मिळतात. उदा. मेक्सिको खाडी, हडसन सरोवर, अलास्का खाडी, कॅलिफोर्निया खाडी इ. वेस्ट इंडिज आणि क्युबा ही बेटे कॅरेबियन समुद्रात आढळतात. कॅनडाच्या पूर्व किनाऱ्यावर न्यू फाउंडलँड प्रदेश आहे. आर्क्टिक महासागरात असंख्य बेटे असून, त्यामध्ये ग्रीनलँड अत्यंत मोठे बेट आहे. उत्तर अमेरिकेच्या दक्षिणेकडील शेवटच्या भागाला मध्य अमेरिका असे म्हणतात.

**विस्तार** विस्ताराच्या दृष्टीने उत्तर अमेरिका (16.46%) आशिया आणि आफ्रिका खंडानंतर तिसऱ्या क्रमांकाचा मोठा खंड आहे. हा खंड भारतापेक्षा सुमारे सात पट (24.24 दशलक्ष चौ.कि.मी) मोठा आहे. उत्तर अमेरिकेत एकूण 24 राज्ये आहेत. कॅनडा, अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि मेक्सिको ही तीन राज्ये आकाराने मोठी आहेत. कॅरेबियन बेटांचाही समावेश भौतिकदृष्ट्या उत्तर अमेरिका खंडात होतो.

**तुम्हाला हे माहित आहे का ?**

| देश | वैशिष्ट्य |
|---|---|
| मेक्सिको | ट्रान्स कॅनेडियन रेल्वे |
| कॅनडा | हिम हॉकी, हिम अस्वल |
| यु.एस.ए | ग्रँड कॅनॉल, होम्स, बार रिंगर क्रेटर, होल्कॅनोज (ज्वालामुखी) |
| वेस्ट इंडिज | क्रिकेटची - बेटे. |

## 2 स्वाभाविक विभाग

उत्तर अमेरिका हा चार मुख्य स्वाभाविक विभागात विभागला आहे.

1) पश्चिमेकडील पर्वत रांगा किंवा रॉकी पर्वत.

2) विस्तीर्ण मध्यवर्ती मैदाने.

3) ॲप्लेशियन पर्वत रांगा.

4) किनारपट्टीचा प्रदेश




उत्तर अमेरिका प्राकृतिक

## 1. पश्चिमेकडील पर्वत रांगा

भारतातील हिमालय पर्वताप्रमाणेच यासुद्धा घडीच्या पर्वत रांगा आहेत. पश्चिमेकडील या पर्वतरांगा उत्तरेकडील अलास्कापासून दक्षिणेला पनामापर्यंत पसरल्या आहेत. यामध्ये अनेक पठारांचा समावेश आहे. उदा - कोलाराडो, ओकाटस्‌चे पठार, मेक्सिकन पठार.



रॉकी पर्वत रांगा



आलास्का पर्वत रांगा



मॅकिन्ले पर्वत

पश्चिमेकडील पर्वत रांगामध्ये रॉकी पर्वत रांगा अत्यंत महत्वाच्या आहेत. या प्रदेशातील माऊंट मॅकिन्ले (6194 मी.) हे अती ऊंच पर्वत शिखर असून मृत्यूदरी (समुद्र सपाटीपासून 86 मी. खोल भाग आहे.) कॅलिफोर्नियातील वाईट्‌नो पर्वत आणि श्वेत पर्वत हे स्वतःच्या अशा वेगवेगळ्या वैशिष्ट्यानी तसेच सृष्टी सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहेत.

या पठाराच्यामध्ये काही अंतर्गत पर्वत, पठारे आढळतात. कोलंबिया, कोलाराडो आणि मेक्सिकन पठार ही येथील प्रमुख पठारे होत. कोलाराडो नदी ही कोलाराडो पठारातून अत्यंत वेगाने वाहताना (ग्रँड कॅनॉन) धबधब्याच्या निर्मितीस कारणीभूत ठरली आहे.

'ओल्ड फेथफुल' हे जगातील अत्यंत प्रसिद्ध गरम पाण्याचे झरे आहेत. हे अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामधील यलोस्टोन राष्ट्रीय उद्यानामध्ये आहेत.



*ओल्ड फेथफूल गाईसर*

## 2. विस्तीर्ण मध्यवर्ती मैदाने

या मध्यवर्ती मैदानाना प्रेअरीची महा मैदाने असेही म्हणतात. ही मैदाने पूर्वेकडे ॲप्लेशियन पर्वत रांगा आणि पश्चिमेकडे पर्वत रांगाच्यामध्ये आढळतात. ही मैदाने अत्यंत विस्तीर्ण (उत्तर अमेरिकेच्या एकूण भागाच्या 3/5 इतका) असून येथे काही ठिकाणी सपाट तर काही उताराच्या भूभागाचा यामध्ये समावेश आहे. ही मैदाने मिसीसिपी आणि मिसोरी नदी आणि त्यांच्या उपनद्या यांनी मिळून तयार झाली आहेत. ही मैदाने जगातील अत्यंत सुपीक मैदानापैकी एक असून उत्तम शेतीसाठी ती प्रसिद्ध आहेत. यांच्या उत्तरेकडील भागात हिमनद्या असल्यामुळे तेथे अनेक सखल भाग तयार झाले आहेत. हे भाग सरोवरांनी जोडले गेले आहेत.

धुळीचा कटोरा (dust bowl) - हे धुळयुक्त स्थानिक वादळ आहे. अमेरिका आणि कॅनडाच्या प्रेअरी प्रदेशात 1930 मध्ये आलेल्या धुळीच्या वादळामुळे शेतीसाठी हानी झाली आहे.

### 3. ॲप्लेशियन पर्वत रांगा

पूर्वेकडील उंचवटयाच्या प्रदेशाला ॲप्लेशियन पर्वत असेही म्हणतात. या रांगा याखंडाच्या पूर्वेकडील न्यूफाउंडलँडपासून अलाबामापर्यंत पसरलेल्या आहेत. ॲप्लेशियन रांगा प्राचीन घडीचे पर्वत असून भूकंपामुळे निर्माण झालेला प्रदेश आहे. ॲप्लेशियन पर्वत रांगा या पूर्वभागात पठारामध्ये आणि अटलांटिक महासागराच्या किनारपट्टीवरील भागात आढळतात. लॅब्राडोर पठार व ॲप्लेशियन पर्वत रांगा या सेंटलॉरेन्सच्या खोऱ्यामुळे वेगळ्या झाल्या आहेत. येथे दगडी कोळसा, शिसे, लोह, खनिज, तांबे, जलशक्ती (धबधबे) अरण्यसंपत्ती इत्यादी साधन संपत्ती मोठया प्रमाणात आहे. या प्रदेशात दाट लोकवस्ती असून तो नेहमी गजबजलेला असतो. हा प्रदेश म्हणजे उत्तर अमेरिकेच्या आर्थिक समृध्दीचा एक मुख्य भाग आहे.



*ॲप्लेशियन घडीचे पर्वत*

**4. किनारपट्टीचा प्रदेश :** दक्षिण पनामा सोडल्यास उत्तर अमेरिकेला फार लांबीची व दंतूर किनारपट्टी लाभली आहे. किनारपट्टी मैदाने इशान्येला अरुंद आणि दक्षिण व पश्चिमेला रुंद होत गेली आहेत. सरासरी उंची समुद्र सपाटीला 150 मी. आहे. ही समतल व साधारण मैदानी प्रदेश आहेत. नापीक जमीन आहे. बराचसा भाग दलदलीचा आहे. नद्याचा मुख भागानी व खाडीमुळे समुद्र किनारपट्टी दंतूर बनली आहे. येथे अनेक बंदरे आहेत.

### नद्या आणि मोठी सरोवरे

उत्तर अमेरिकेमध्ये काही मोठी सरोवरे व लहान नद्या आहेत. या खंडातील कॅनडाची ढाल या प्रदेशात एकाच प्रकारची भौगोलिक स्थिती असल्यामुळे येथे असंख्य सरोवरे निर्माण झाली आहेत. ती हिमनद्यामुळे निर्माण झाली आहेत.

**नद्या:** मिसिसिपी आणि मिसोरी या उत्तर अमेरिकेतील मोठ्या नद्या होत. त्या एकूण 2/3 भागातून वाहतात. मिसिसिपी सर्वात मोठी नदी असून मेक्सिकोच्या खाडीला जाऊन मिळते.




*उत्तर अमेरिकेतील नद्या*



*मिसिसिपी नदी*

कोलाराडो नदी ही कोलाराडो पठारातून वाहत जाऊन पुढे ग्रॅन्ड कॅनन (मोठी अरुंद खाडी) निर्माण करते. ती निसर्ग सौंदर्य आणि वाहतूक व्यवसायाचा केंद्रबिंदू आहे. 'ग्रॅन्ड कॅनन 'ही जगातील नैसर्गिक आश्चर्य आहे.



*मिसोरी नदी*

## हे तुम्हाला महित आहे का?

ॲरिजोन (यू.एस.ए) खोली-सुमारे 1800 मी. रुंदी 3 ते 29 कि.मी.



*ग्रंड कॅनन (मोठी अरुंद खाडी)*

सेंट लॉरेन्स ही अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि कॅनडातील अत्यंत महत्वाची नदी आहे. ही महासरोवरातून वाहते. एका वर्षाच्या कालावधित ती 3 महिने बर्फामुळे गोठलेल्या स्वरुपात असते.

**सरोवरे** उत्तर अमेरिकेत असंख्य गोडया आणि खाऱ्या पाण्याची सरोवरे आहेत. ती कॅनेडीय पठाराच्या दक्षिणेकडील सीमाभागात आढळतात. हयुरान, ओटारिओ, मिसिगन, ऐरी, सुपिरिअर ही पंच महासरोवरे प्रसिद्ध आहेत. एकूणच यांना होम्स (Homes) असे म्हणतात.



*सुपिरीयर सरोवर*

यापैकी सुपिरिअर हे सरोवर जगातील सर्वात मोठे गोडया पाण्याचे सरोवर आहे. शिकागो आणि डेट्राइट ही शहरे मिसिगन सरोवराच्या काठावर वसली आहेत. या सर्व सरोवरांचा प्रामुख्याने अंतर्गत जलमार्गासाठी उपयोग करतात.

## 3 हवामान आणि नैसर्गिक वनस्पती

**हवामान :** उत्तर अमेरिका खंडाचा विस्तार आणि स्वाभाविक विभागातील विभिन्नता यामुळे येथील हवामानात विविधता आढळते. अलास्का आणि ग्रीनलँड ही नेहमी बर्फाच्छादित असतात. त्यामुळे येथील हवामान टंड्रा प्रकारचे असते. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानांच्या नैर्ऋत्येकडील वाळवंटी प्रदेशातील हवामान अत्यंत उष्ण असते. फ्लोरिडाचा आग्नेय भाग, कॅरेबियन आणि अमेरिकेच्या मध्य भागात उष्ण कटिबंधातील हवामान आढळते. या खंडाच्या मध्य आणि दक्षिणेकडील प्रदेशात हरिकेन्स आणि टोर्नाडो या सारखी चक्रीवादळे आढळतात.



हरिकेन्स



टोर्नाडो




उत्तर अमेरिका नैसर्गिक वनस्पती

**नैसर्गिक वनस्पती:** नैसर्गिक वनस्पती आणि प्राणी यांचे जीवन हे तेथील हवामान, माती आणि तेथील भूस्वरुपावर अधिक अवलंबून आहे. उत्तर अमेरिकेतील हवामान आणि भूस्वरुपातील विविधतेमुळे या खंडात अधिक प्रमाणात समशीतोष्ण कटिबंधातील वनस्पती आढळतात. या वनस्पती प्रामुख्याने हवामानाच्या पट्ट्यानुसार आहेत. उदा. टंड्रा प्रकारच्या वनस्पती आर्क्टिक वृत्ताच्या बाजूला आढळतात. त्या प्रामुख्याने कॅनडा, अलास्का आणि ग्रीनलँड मध्ये आढळतात.



सूचीपर्णी अरण्ये

येथे दीर्घकाळ हिवाळा असतो. हिवाळ्यात तापमान 0° से. पेक्षा कमी असते. उन्हाळ्याचा कालावधी कमी असतो. येथे आढळणाऱ्या वनस्पती म्हणजे शेवाळ होय. उहाळ्यामध्ये काही सुगंधी फुले येणाऱ्या वनस्पतींची लागवड केली जाते. अशा कठीण आणि क्लिष्ट परिसरात जगणारी रेनडिअर, कॅरिबू आणि शाकाहारी हिम अस्वल (पांढरे अस्वल) येथे आढळतात.

तंड्रा प्रदेशाच्या दक्षिणेकडे थंड समशीतोष्ण प्रकारच्या हवामानाचा प्रदेश असल्याने शीत प्रदेशातील कोल्हे आढळतात. वास्तविक पाहता हा सूचिपर्णी अरण्याचा पट्टा असल्याने याला 'तैगा' असे म्हणतात. सूचिपर्णी अरण्ये ही सदाहरित असतात. या मध्ये पाइन, फर, फ्रुस, लार्च इत्यादी प्रकारच्या वनस्पती आढतात. लोकरी प्रमाणे मऊ केसाचे प्राणी येथे आढळतात. उदा - लैनाक्स, सांबर, सिल्वर फॉक्स (पांढरे कोल्हे) इत्यादी.



**बीवर**



**काळे माकड**



**बर्फातील काळे अस्वल**



**सिल्वर फॉक्स**



सायप्रस



चेस्टनट

पानझडी प्रकाराची अरण्ये सेंटलॉरेन्स आणि पंच महासरोवराच्या पूर्वेकडील प्रदेशात आढळतात. या प्रदेशातील उत्तरेकडील भागात थंडी तर दक्षिणेकडील भागात उष्ण हवामान आढळते. हिवाळा थंड असून उन्हाळा उबदार असतो. सामान्यपणे उन्हाळ्यात पाऊस पडतो. येथे आढळणाऱ्या वनस्पतींच्या झाडाची पाने निर्दिष्ठ काळात झडतात (गळून पडतात). उदा. सैप्रस, ओक, ॲश आणि चेस्टनट. येथे बिवर, काळे अस्वल, अस्वल, हिमउंदीर आणि पोर्कूपाइन इत्यादी प्राणी आढळतात.

समशीतोष्ण हवामानाच्या पट्ट्यातील अरण्ये व हवामान मुख्यत्वे अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामध्ये आढळते. रॉकी पर्वतरांगा आणि महानदीचे उगम स्थान (मिसिसिपी-मिसोरी) या मध्ये विस्तीर्ण असा गवताळी प्रदेश आहे. यालाच 'प्रेअरी' असेही म्हणतात. वास्तविक पाहता हा प्रदेश म्हणजे विस्तीर्ण वृक्षविरहित मैदान आहे. या मैदानी प्रदेशात गव्हाची लागवड तसेच पशूपालन हे व्यवसाय प्रसिद्ध आहेत. याला जगाचे 'गव्हाचे कोठार' किंवा 'भाकरीची टोपली' असे म्हणतात.



प्रेअरी गवताळ प्रदेश

सूचिपर्णी आणि पानझडी अरण्यातील झाडे ही समशीतोष्ण मिश्र अरण्यात आढळतात. कॅनडा आणि उत्तर कॅलिफोर्निया येथे अशा प्रकारची अरण्ये आढळतात. या अरण्य प्रदेशामध्ये आढळणारी प्रमुख वनस्पती म्हणजे बर्च, बिच, मॅपल, ओक इत्यादी होत.



महोगणी वृक्ष



मॅपल

**कॅनडा :** हा सरोवरांनी जोडलेला देश आहे. तैगा वनस्पतीच्या प्रकारची अनेक अरण्ये येथे आहेत. जगात सर्वाधिक झाडांची निर्यात येथून केली जाते.

मेक्सिकोचा दक्षिण भाग आणि वेस्ट इंडिज हे प्रदेश उष्ण कटिबंधातील अरण्यासाठी प्रसिद्ध आहेत. येथे महोगनी आणि लॉगवूड या जातीची झाडे असणारी मिश्र अरण्ये

आढळतात. कॅलिफोर्नियाच्या पश्चिम किनाऱ्यावरील मेडिटरेनियन येथील हवामानात विविधता आढळते. दक्षिण कॅलिफोर्निया, मेक्सिको आणि अरिझोना येथे या खंडाच्या पश्चिम भागात वाळवंटासारखे कोरडे हवामान आढळते. विविध प्रकारचे निवडुंग, काटेरी झुडपे येथे खूप आहेत. जोशूव हे येथील निवडूंगाचे उत्तम उदाहरण आहे. वाळवंटी प्रदेशातील रात्रीचे हवामान म्हणजे या प्रदेशातील हिवाळा असे म्हणतात.





*वाळवंटी वनस्पती - विविध प्रकारचे निवडुंग*

## 4 शेती

शेती हा उत्तर अमेरिकेचा एक प्रमुख व्यवसाय आहे. या खंडाच्या मध्य भागातील सखलमैदाने, प्रामुख्याने कॅनडा आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथे आधुनिक कृषी तंत्राचा वापर करणारी राष्ट्रे आहेत. उत्तर अमेरिकेच्या एकूण भू-भागापैकी शे. 10% प्रदेश शेतीसाठी उपयुक्त आहे. मात्र या प्रदेशातून येणारे कृषी उत्पादन अधिक आहे. कारण विस्तीर्ण कृषी क्षेत्र, सुपीक जमीन, पुरेसा पाणीपुरवठा, शेतीसाठी आधुनिक तंत्राचा वापर तसेच इतर सुविधांबरोबरच माणसांचे श्रम इत्यादीमुळे उत्तर अमेरिका जगातील सर्वात मोठा कृषी उत्पादन करणारा प्रदेश ठरला आहे.

एका विशिष्ठ प्रकारच्या पिकाच्या उत्पादनासाठी प्रसिद्ध असलेल्या प्रदेशाला पिकांचा पट्टा असे म्हणतात. उदा. मक्याचा पट्टा, गव्हाचा पट्टा, कापूस पट्टा, तंबाखू पट्टा इत्यादी.

उत्तर अमेरिकेतील प्रामुख्याने कॅनडा आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथे गहु प्रमुख अन्नधान्य पीक म्हणून पिकविले जाते. प्रेअरी प्रदेशात गव्हाच्या पिकासाठी उपयुक्त सुपीक जमीन आढळते. येथे लोकसंख्या कमी असून उत्पादन अधिक असल्यामुळे ते निर्यात केले जाते. मक्याला 'कॉर्न' असे संबोधले जाते. याचे उत्पादन संयुक्त संस्थाने आणि मेक्सिको येथील विस्तीर्ण प्रदेशात केले जाते. मक्याचा उपयोग गाई आणि डुकरांचा खाद्य पदार्थ म्हणून अधिक प्रमाणात करतात. हे एक आहार धान्य बनले आहे. परंतु आज इंधनासाठी उपयुक्त पीक म्हणून मक्याचे उत्पादन केले जाते.



गहू



मक्का

बार्ली, ओट्स आणि बटाटा ही इतर प्रमुख पिके आहेत. बार्ली आणि ओट्स ही थंड हवामानात येणारी पिके आहेत. बार्लीचा उपयोग बीअर (पेय) तयार करण्यासाठी करतात. ओट्सचा उपयोग प्राण्यांचा (चारा) खाद्य म्हणून करतात. या खंडात बटाटयाचे उत्पादन केले जाते. त्याचा उपयोग प्रामुख्याने आहारासाठी करतात.

या खंडाच्या दक्षिण भागात कापूस आणि तंबाखू ही व्यापारी पिके पिकवितात. मिसिसिपी नदीच्या खोऱ्यात कापसाचा प्रदेश आढळतो. अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि मेक्सिको हे उत्तम प्रतिचा लांब धाग्याचा कापूस उत्पादन करणारे प्रमुख देश आहेत. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाचा दक्षिण भाग, क्यूबा, जमैका आणि मेक्सिकोमध्ये तंबाखू पिकविला जातो. तंबाखू उत्पादनात जगातील प्रमुख देशात चीन नंतर अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाचा दुसरा क्रमांक लागतो.

ऊस हे येथे पिकणारे आणखी एक महत्वाचे पीक आहे. साखर उत्पादनात क्यूबाचा जगात तिसरा क्रमांक लागतो. क्यूबाला 'जगाचा साखरेचा डबा (भांडे) असे म्हणतात. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानामध्ये शुगर बीटचे उत्पादनही काढले जाते. ऊसाप्रमाणेच साखर उत्पादनासाठी याचा उपयोग होतो.



संत्र्याची बाग



द्राक्षे

कॉफी आणि कोक ही उष्णकटिबंधातील बागायती पिके होत. यांचे उत्पादन मध्य अमेरिकेचा भाग आणि वेस्ट इंडिज मध्ये केले जाते. कॅलिफोर्निया, फ्लोरिडा, न्यूजर्सी आणि मोठ्या शहराच्या सभोवतालच्या प्रदेशात द्राक्षे, संत्री, लिंबू, सफरचंद, पीच इत्यादी फळे अधिक प्रमाणात पिकवितात. कॅलिफोर्निया हा उत्तर अमेरिकेचा शेकडा 90% द्राक्षाचे उत्पादन करणारा देश आहे. त्यामुळे कॅलिफोर्नियाला द्राक्षांचे राज्य असे म्हणतात.

उत्तर अमेरिका खंडाच्या ईशान्येकडील अटलांटिक महासागराच्या किनाऱ्यावरील ग्रँड बँक, न्यू इंग्लंडचा जॉर्जस बँक (किनारा) आणि न्यू-फाऊंडलँड किनाऱ्यावर कमी खोलीचा खडकाळ किनारा हे प्रदेश मच्छिमारीसाठी प्रसिद्ध आहेत.

## 5 प्रमुख खनिजे आणि उद्योगधंदे

उत्तर अमेरिका हा नैसर्गिक साधन संपत्तीने समृद्ध असा खंड आहे. त्यामध्ये विविध प्रकारची सुपीक माती, विस्तीर्ण गवताळ प्रदेश, खनिजे, ऊर्जा उत्पादनाची साधने आणि अरण्य संपत्ती यांचा समावेश होतो.

या खंडात विविध प्रकारची मौल्यवान खनिजे अधिक प्रमाणात आढळतात. येथील सोन्याच्या उत्पादनाने लोकांना यापूर्वीच आकर्षित केले आहे. याव्यतिरिक्त लोखंडाचे

खनिज, तांबे, निकेल, चांदी आणि जस्त यांची खनिजे येथे मोठया प्रमाणात आढळतात. या खंडात भरपूर प्रमाणात दगडीकोळसा, खनिज तेल आणि नैसर्गिक वायू यांचे साठे आहेत.

उत्तर अमेरिकेतील खाण व्यवसायाची सुरुवात सोन्याच्या खाणीच्या रुपाने झाली. कॅलिफोर्निया आणि यूकॉटन येथे प्रमुख सोन्याच्या खाणी आहेत. सुपिरिअर सरोवर आणि त्याच्या सभोवतालच्या प्रदेशात मोठ्या प्रमाणात लोखंडाचे खनिज आढळते. उत्तम प्रतिचे लोखंडाचे खनिज कॅनडाचे पठार आणि त्याच्या सभोवतालच्या प्रदेशात आढळते. मेक्सिको हा देश जगात चांदीच्या उत्पादनातील प्रमुख देश होय. जगात सर्वात अधिक तांब्याचे उत्पादन अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशात होते. कॅनडा मध्येही खाण व्यवसाय मोठया प्रमाणात चालतो.


सोने


लोखंड


लोखंडी सळया


दगडी कोलसा



तांबे



निकेल




चांदी



अभ्रक

उत्तर अमेरिकेतील ॲप्लेशियन प्रदेशामध्ये उत्तम प्रतिच्या दगडी कोळशाचा साठा अधिक आहे. पेन्सिल्वेनिया हा जगाच्या उत्पादनापैकी शे. 20% दगडी कोळसा उत्पादित करतो. अमेरिकेची संयुक्त संस्थाने हा जगातील सर्वात जास्त दगडी कोळशाची निर्यात करणारा देश आहे. अलास्का, टेक्सास, लूसियान, कान्सास आणि कॅनडाचा पश्चिम भाग व मेक्सिको येथे तेल आणि नैसर्गिक वायूचे साठे आढळतात. पॅसिफिक महासागराच्या शेवटच्या भागात नैसर्गिक वायूचे साठे अधिक प्रमाणात आढळतात. अमेरिकेची संयुक्त संस्थाने हा पेट्रोलियम उत्पादन करणारा प्रमुख देश आहे.

उत्तर अमेरिकेतील देशामध्ये अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि कॅनडा येथे मोठ्या प्रमाणात उद्योगधंदे वसलेले आहेत. या औद्योगिकरणासाठी येथील उपलब्ध असलेले लोखंडाचे खनिज, दगडी कोळसा, तांबे, बॉक्साइट इत्यादी कच्च्यामालाचे मोठ्या प्रमाणात आढळणारे साठे उपयुक्त ठरले आहेत. ऊर्जा, वाहतूक, आधुनिक तंत्रज्ञानाची उपलब्धता ही औद्योगिकरणास सहाय्यक ठरली आहेत.



पिटस बर्ग (पोलादी शहर)

ऐरी, सुपिरिअर आणि मिसिगन सरोवरांच्या प्रदेशामध्ये लोखंड आणि पोलादाच्या कारखान्यांच्या विकास अधिक झालेला आहे. यासाठी येथील कच्चामाल आणि जलवाहतूक व्यवस्था सहाय्यक ठरली आहे. अमेरिकेची संयुक्त संस्थाने या देशाची अनुकूल औद्योगिक निती या उद्योगधंद्याच्या वाढीस कारणीभूत ठरली आहे. कॅलिफोर्निया प्रदेशात आढळणारे दगडी कोळशाचे साठे, जलविद्युत शक्ती आणि अवजड वस्तूंची सहजपणे वाहतूक करण्यासाठी उपयुक्त वाहतूक व्यवस्था असल्यामुळे येथील पीट्सबर्ग या शहराला 'पोलादी शहर' (steel city) असे संबोधतात. लोखंड आणि पोलाद कारखाने हा येथील मुख्य उद्योग असल्याने हे इतर उद्योगांना म्हणजे ऑटोमोबाइल, जहाजबांधणी, लोकोमोटिव्ह, अवजड इंजिनिअरिंग, विमान निर्माण इत्यादी उद्योग धंद्यांच्या विकासास कारणीभूत ठरले आहेत.




शिकागो उद्योगधंद्याचे नगर

उत्तम प्रतिच्या झाडापासून कागद तसेच वृतपत्रासाठी लागणाऱ्या कागदाचे उत्पादन कॅनडा आणि अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथे होते. महू जातीच्या झाडांचा उपयोग कागदाचा लगदा, तसेच कार्डबोर्ड आणि वृत्तपत्रासाठीचा कागद तयार करण्यासाठी करतात. लगद्याचा उपयोग कृत्रिम धागा तयार करण्यासाठी करतात. कागदाचा लगदा आणि वृतपत्रासाठी लागणारा कागद निर्यात करण्यामध्ये कॅनडा हा अत्यंत प्रमुख देश आहे. उत्तर अमेरिकेमध्ये वृक्षतोड हा एक संघटन व्यवसाय बनला आहे. कॅनडा मध्ये वृक्षतोड व्यवसायावर असणाऱ्या लोकाना 'लंबर जाक्स' असे म्हणतात.

रासायनिक उद्योगधंदे, कृत्रिम रबर, प्लॅस्टिक, रासायनिक खते आणि औषधे इत्यादी विभिन्न वस्तूंचे उत्पादन करतात. आता झाडांच्या ऐवजी प्लॅस्टिकचा अधिक वापर केला जात आहे. अमेरिकेच्या संयुक्त संस्थानाच्या सर्व भागात प्लॅस्टिक तयार केले जाते. शिकागो शहर हे प्लॅस्टिक उत्पादनासाठी प्रसिद्ध आहे.

मांस डब्यातून सीलबंद करणे हा उद्योग प्रमुख उद्योगापैकी एक होय. असंख्य ठिकाणी म्हणजे शिकागो, कॅन्सास शहर आणि सेंट लुयीस येथे हा उद्योग मोठ्या प्रमाणात चालतो. विद्युत आणि विद्युत उपकरणांचे उत्पादनही मोठया प्रमाणात करतात. अनेक औद्योगिक यंत्राची निर्यात अमेरिकेची संयुक्त संस्थाने आणि कॅनडा या देशातून केली जाते. मध्य अमेरिकेतील मेक्सिको तसेच इतर देशामध्ये औद्योगिक विकास कमी प्रमाणात झाला आहे. कारण ते देश आकाराने लहान असून उद्योगासाठी लागणारा कच्चा माल, ऊर्जा आणि विद्युतशक्ती यांचा येथे अपूरा साठा आहे.




अमेरिकेची लोकसंख्या घनत्ता

## 6. लोकसंख्या

उत्तर अमेरिकेतील बहुतेक लोक हे युरोपियन, अमेरिकन इंडियन्स् आणि आफ्रिकन वंशाचे आहेत. परंतु तेथे काही स्थानिक अथवा एका गटाचे लोक असून त्यातील बहुतेक लोक स्पॅनिश, इंग्लिश, फ्रेंच अथवा अमेरिकन इंडियन्स भाषा बोलतात.

उत्तर अमेरिकेच्या पूर्व भागात अत्यंत जास्त लोकवस्ती आढळते. तसेच येथे शहरीकरण अधिक झाले आहे. उदा. न्यूयॉर्क, वॉशिंग्टन, शिकागो इत्यादी. परंतु या खंडाचा उत्तर भाग सामान्यपणे बर्फाच्छादित असतो. त्यामुळे तेथे लोकवस्ती नाही.

अमेरिकेची संयुक्त संस्थाने येथील शहरांमध्ये आणि औद्योगिक प्रदेशामध्ये लोकवस्ती अधिक आहे. उत्तर अमेरिकेचे 98% लोक हे शहरात राहतात.

## नवीन शब्द

प्रेअरीज, कॅरिबियन, ॲप्लेशियन, कॅनेडियन, घडीचे पर्वत, पठार (ढाल), होम्स, हरिकेन्स, टॉर्नोडो, तंड्रा, हिममृग, कॅरिबो, तैगा, पिकांचा पट्टा, कॉर्न जाट्स, डस्टचौल, कोर्किंग, लोकोमोटिव्हज्, लंबर जाक्स. कार्डबोर्ड, न्यूजप्रिंट.

## अभ्यास

### I. दोन किवा तीन वाक्यात उत्तरे लिहा.

1) उत्तर अमेरिका खंडाला 'प्रेअरीचा प्रदेश' असे का म्हणतात ?

2) उत्तर अमेरिका खंडाचे स्थान आणि विस्तार सांगा.

3) उत्तर अमेरिका खंडातील प्रमुख देशांची यादी करा.

4) उत्तर अमेरिकेच्या ग्रँड कॅननची निर्मिती कशी झाली आहे ?

5) उत्तर अमेरिकेतील प्रमुख वनस्पती आणि प्राणी कोणते ?

6) उत्तर अमेरिकेतील प्रमुख नद्यांची यादी करा.

7) उत्तर अमेरिकेत 'लंबर जाक्स' असे कोणाला म्हणतात ?

8) उत्तर अमेरिकेत आढळणारे प्रमुख लोक व त्यांची भाषा कोणती ? ते सांगा.

### कृती :

1 उत्तर अमेरिकेचा नकाशा काढून ॲटलासच्या सहाय्याने त्यामध्ये त्या खंडातील प्रमुख पर्वत, नद्या, महासरोवरे, मैदाने दाखवा.

2 उत्तर अमेरिका खंडात आढळणाऱ्या प्रमुख वनस्पती तसेच प्राणी यांची यादी तयार करा व त्यांच्या चित्रांचा संग्रह करा.

☆ ☆ ☆

| पाठ 13 | दक्षिण अमेरिका - अँडीज प्रदेश |
| --- | --- |

## पाठाचा परिचय

दक्षिण अमेरिका खंडाचे स्थान, विस्तार आणि स्वाभाविक विभाग, नद्या आणि सरोवरे, हवामान, नैसर्गिक वनस्पती, प्राणी, शेती, पशुपालन, लोकसंख्या नियोजन, विभागणी आणि घनता याचा परिचय या पाठात आहे.

## सामर्थ्ये

1) दक्षिण अमेरिकेचे स्थान, विस्तार आणि भौगोलिक (स्वाभाविक) विभागाची माहिती समजून घेणे.
2) दक्षिण अमेरिकेतील नद्या आणि सरोवरे याबद्दल समजून घेणे.
3) दक्षिण अमेरिकेच्या हवामानातील वैविध्यता, प्राण्यातील विविधता तसेच वनस्पतींची माहिती समजून घेणे.
4) दक्षिण अमेरिकेच्या शेती आणि पशुसंगोपनातील वैशिष्ट्यांना समजून घेणे.
5) दक्षिण अमेरिकेची लोकसंख्या, तेथील लोकांची मिश्र वांशिकता, विभागणी, घनता यांची माहिती समजून घेणे.

दक्षिण अमेरिका हा जगातील चौथ्या क्रमांकाचा मोठा खंड आहे. तो लॅटीन अमेरिकेचा एक भाग आहे. ख्रि.श. 1498 मध्ये ख्रिस्तोफर कोलंबस या भूखंडावर येऊन पोहोचला आणि त्याने त्याला भारत असे म्हटले. तेथील गोऱ्या रंगाच्या स्थानिक लोकांना रेड इंडियन्स असे म्हटले. नंतर युरोपियनांनी (स्पॅनिश आणि पोर्तुगीज) या खंडात गर्दी केली.

दक्षिण अमेरिका हा खंड अँडीज पर्वत आणि अमेझॉन नदी यानी मिळून तयार झालेला वैशिष्ट्यपूर्ण खंड आहे. जगात सर्वात जास्त कॉफीचे उत्पादन येथे होते. सामान्यपणे त्याला 'गवताळी कुरणांचा प्रदेश' असे म्हणतात.

## 1. स्थान, विस्तार आणि स्वाभाविक विभाग

या खंडाचा बहुतेक भाग दक्षिण गोलार्धात येतो. याचा थोडासा भाग उत्तर गोलार्धामध्ये आहे.




दक्षिण अमेरिका

विषुववृत आणि मकर वृत ही दोन वृत्ते या खंडातून गेली आहेत. याचा आकार त्रिकोणी असून उत्तरेकडे रुंद आणि दक्षिणेकडे चिंचोळा होत गेला आहे. हा खंड $12^0$

उत्तर अक्षांशापासून $56^0$ दक्षिण अक्षांशापर्यंत तसेच $35^0$ पश्चिम रेखांशापासून ते $81^0$ पश्चिम रेखांशापर्यंत याचा विस्तार आहे. दक्षिण अमेरिका खंड पश्चिमार्धगोलात आहे.

या खंडाचा उत्तर भाग वगळला की इतर सर्व दिशाना पाण्याने वेढले आहे. उत्तरेकडे पनामा कालव्यामुळे हा खंड उत्तर अमेरिका खंडापासून वेगळा झाला आहे. उत्तरेकडे कॅरेबियन समुद्र किनारा, पूर्वेकडे आणि ईशान्येकडे अटलांटिक महासागर, पश्चिमेला पॅसिफिक महासागर आणि दक्षिणेला अंटार्क्टिका महासागराच्या बर्फमय पाण्याने वेढला गेला आहे.

दक्षिण अमेरिकेचा एकूण भूभाग सुमारे 177.1 लक्ष चौ. कि.मी. इतका आहे. हा खंड भारतापेक्षा 3 1/2 पट मोठा आहे. या खंडात एकूण 13 देश आहेत. ब्राझील हा सर्वात मोठा तर फ्रेंच गयाना हा सर्वात लहान देश होय. बोलिव्हिया आणि पॅराग्वे हे भूभागानी वेढलेले देश होत. या व्यतिरिक्त सर्व देशांना किनारपट्टी लाभली आहे. चिली हा देश आकाराने लांबट आहे.

- पनामा कालवा (1912) उत्तर अमेरिका आणि दक्षिण अमेरिकेच्या मध्ये असलेला प्रमुख सागरी मार्ग होय.
- इकवेडार देशाचे नाव इक्वेटर या इंग्लिश शब्दावरुन आले आहे.
- सागे पौलो-सिटी ऑफ स्काय स्क्वेअर (गगनचुंबी इमारतीचे शहर)
- अर्जेंटिना आणि ब्राझिल हे देश फुटबॉल खेळासाठी प्रसिद्ध आहेत.
- ख्रि.श. 2016 साली ब्राझिल मध्ये ऑलिंपिक स्पर्धा भरविण्यात आल्या होत्या.
- व्हेनिन्झुवेला देश मॉडेलिंग आणि कलेसाठी प्रसिद्ध आहे.

## 2. स्वाभाविक विभाग

दक्षिण अमेरिका खंडाचे वैशिष्ट्यपूर्ण स्वाभाविक विभाग आहेत. या खंडात हिमपर्वतांची शिखरे आणि घनदाट विषुववृतीय अरण्ये आहेत. या खंडात अत्यंत सुपीक मैदानी प्रदेश तसेच ओसाड वाळवंटी प्रदेश आहे. या खंडाचे स्वाभाविक विभाग पुढील प्रमाणे :

| | |
|---|---|
| 1 अँडिज पर्वत | 2 पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश |
| 3 मध्यवर्ती सखल मैदानी प्रदेश | 4 पश्चिमेकडील किनारपट्टीचा प्रदेश |




दक्षिण अमेरिकेचे स्वाभाविक विभाग

## 1. अँडीज पर्वत

पॅसिफिक महासागराच्या किनारपट्टीत समांतर अशा सुमारे 6,440 कि.मी. इतक्या लांब पसरलेल्या या रांगा जगातील सर्वात लांब पर्वत श्रेणी आहेत. पॅसिफिक महासागराचा किनारा ज्वालामुखीचा असल्याने या भागात वारंवार भूकंपाचे धक्के



अँडीज पर्वत

जाणवतात, तसेच ज्वालामुखीची ठिकाणेही येथे आहेत उदा. माऊंट अँकाँकागुवा (6960 मी.) अर्जेंटिना - चिली ही अती उंच शिखरे आहेत. इक्वेडोरमधील माउंट कोटोपाक्षी (5,896 मी.) माउंट चिंबीराजों (6,272 मी.) इत्यादी शिखरे आहेत. अँडीज पर्वतामध्ये तांबे आणि तवर यासारखी समृद्ध खनिजे आहेत.

## 2. पूर्वेकडील उंचवटयाचा प्रदेश

हा प्रदेश दोन वेगवेगळया उंच प्रदेशांनी वेढला आहे (i) उत्तरेकडील गयानाचा उंच प्रदेश (पठार) आणि (ii) दक्षिणेकडील ब्राझीलचा उंच प्रदेश (पठार). हा भाग भारतातील दख्खनच्या पठारा प्रमाणे कठीण दगडांचे बनलेले आहेत. ओरिनोको नदीची उपनदी चोरन नदीवर जगातील अत्यंत उंच 'एंजल धबधबा' (974 मी.) हा गयानाच्या पठारामध्ये निर्माण झाला आहे.



ॲकाँकागुवा

## 3. मध्य भागातील सखल मैदानी प्रदेश

हा प्रदेश अँडीज पर्वत आणि पूर्वेवडील उंचवटयाचा प्रदेश यांच्या मध्ये आहे. हा प्रदेश विस्तीर्ण अशा नद्यांचा बनला आहे. त्या म्हणजे ॲमेझॉन, ओरीनोको आणि लाप्लाटा नद्यांचा त्रिभूज प्रदेश. त्यामधील ॲमेझॉन नदीचे पात्र फार मोठे आणि प्रसिद्ध आहे.

## 4. पश्चिम किनारपट्टीचा मैदानी प्रदेश

हा प्रदेश म्हणजे छोटी मैदाने असून पॅसिफिक महासागर आणि अँडीज पर्वत रांगाच्या मध्ये आढळतो. पश्चिम किनारपट्टीचा प्रदेश काही ठिकाणी रुंद होडीच्या आकारा प्रमाणे असून बहुतेक ठिकाणी किनारा तुटक व दंतूर आहे. कारण किनारपट्टी पासून अँडीज पर्वतांची उंची पूर्वेकडे शेवटपर्यंत वाढत गेली आहे. चिलीचा मध्यभाग आणि कोलंबियाच्या पश्चिम किनारपट्टीवर सर्वत्र लहान लहान मैदाने आपल्याला

पाहावयास मिळतात. हा किनारा तुटक आहे. अनेक मोठी शहरे या किनारपट्टीवर वसली आहेत. या किनारापट्टीच्या दक्षिण भागात तसेच इतर ठिकाणी अनेक बेटे आहेत.

## नद्या आणि सरोवरे

ॲमेझॉन, पाराना, पेराग्वे, ऊरुग्वे आणि ओरिनोको या दक्षिण अमेरिकेच्या प्रमुख नद्या आहेत. ॲमेझॉन (6,450 कि.मी.) ही नदी अँडीज पर्वतात उगम पावणारी दक्षिण अमेरिकेतील सर्वात लांब नदी असून ती जगातील सर्वात मोठी नदी आहे. या नदीच्या पात्रामुळे दुरवर जलमार्गासाठी उपयोग झाला आहे. ओरिनोको ही आणखी एक महत्वाची नदी होय. पाराना, पॅराग्वे आणि ऊरुग्वे या नद्यांच्या बनलेल्या त्रिभूज प्रदेशाला **लाप्लाटा** म्हणून संबोधले जाते.

टिटिकाक सरोवर (बोलिव्हीया) हे जगातील सर्वात उंचावर असलेले सरोवर आहे. तसेच दक्षिण अमेरिकेतील नौकायानासाठी (जलमार्गासाठी) अत्यंत उपयुक्त सरोवर आहे.



टिटिकाक सरोवर




दक्षिण अमेरिकेतील नद्या

| | | |
|---|---|---|
| ➢ ॲमेझॉन | – | माराजो नदी द्विप |
| नदीची | – | ॲनाकोंडा आणि पिरान्ह मासे |
| वैशिष्टये | – | अत्यंत मोठी नदी. 1000 पेक्षा अधिक उपनद्या |
| | – | जगाच्या एकूण भूभागापैकी सुमारे 11.50% भूभाग व्यापला आहे. |

## 3. हवामान

दक्षिण अमेरिकेच्या हवामानात विविधता आढळते. या खंडाच्या हवामानातील विविधतेला येथील अक्षांश, उंची आणि पॅसिफिक व अटलांटिक महासागरांचे सानिध्य कारणीभूत ठरले आहे.

या खंडाच्या उत्तर भागातून विषुववृत्त गेले आहे. तसेच दक्षिण भागातून मकरवृत्त गेले आहे. या दोन्ही अक्षवृत्तांच्या मधला भूभाग हा उष्ण कटिबंधात येतो. उत्तरेकडील रुंद भागात उष्ण कटिबंधातील हवामानाचा प्रभाव दिसून येतो. त्यामुळे येथील हवामान उष्ण आणि दमट असते. विषुववृत्त असल्याकारणाने ॲमेझॉन नदीच्या मैदानी प्रदेशामध्ये उष्ण आणि दमट असे विषुववृत्तीय हवामान आढळते. या प्रदेशात बहुतेक वर्षभर **परिसरण पाऊस** पडत असतो. या प्रदेशात भरपूर पाऊस पडत असल्यामुळे येथे घनदाट अरण्ये वाढली आहेत. ॲमेझॉन नदीच्या त्रिभूज प्रदेशात घनदाट अरण्ये असून येथे विविध प्रकारचे प्राणी, वनस्पती आढळतात. विविध पक्षी आणि माकडे हे येथे सामान्यपणे आढळणारे प्राणी आहेत.

एका भूभागातील पाण्याच्या साठयातील पाण्याचे सकाळपासून सूर्याच्या उष्णतेमुळे बाष्पीभवन होऊन त्याचे ढगात रुपांतर होऊन त्याच दिवशी त्याच प्रदेशात पाऊस होण्याच्या नैसर्गिक क्रियेला परिसरण पाऊस म्हणतात. चारचा पाऊस - चहाच्या सुट्टीतील पाऊस - 4 वाजता पडणारा पाऊस म्हणतात.

या खंडाच्या पश्चिमेला लांब अशा अँडीज पर्वत रांगा पसरल्या आहेत. किनारपट्टीच्या शेवटच्या भागात वाहणारे वारे या भागात पाऊस पाडतात. परंतु अँडीज पर्वताच्या पूर्व भागात अत्यंत कमी पाऊस पडतो. हा पर्जन्य छायेचा भाग असल्याने दक्षिण अमेरिकेचा समशीतोष्ण कटिबंधातील वाळवंटी प्रदेश येथे आहे.

अटकाम वाळवंट - (चिली) पृथ्वी वरील अत्यंत कोरडा प्रदेश आहे. गेल्या 200 वर्षात येथे पाऊस पडला नही



अटकाम वाळवंट

# 4. नैसर्गिक वनस्पती



सदाहरित अरण्ये



सेल्वास

ॲमेझॉन नदीच्या खोऱ्यातील विषुववृत्तीय प्रदेशात बाष्पयुक्त हवामान आढळते. या प्रदेशात सदाहरित अरण्ये आहेत. ही जगातील सर्वात मोठी सदाहरित अरण्ये असून या अरण्याना 'सेल्वास' असे म्हणतात. या अरण्यात कठीण लाकडाच्या जातीची महोगनी, एबोनी या सारखी मौल्यवान झाडे येथे आढळतात. येथे आढळणाऱ्या रबराच्या झाडांचे 'ल्याटिक्स' (रबराचे दूध) काढण्यासाठी उपयोग करतात. विषुववृत्तीय अरण्याच्या दोन्ही बाजूला गवताळ प्रदेश आढळतो. याना ओरिनोको नदीच्या मैदानामध्ये

'लानोस' असे म्हटले जाते. व्हेनिझुएला व ब्राझीलच्या उंच प्रदेशातील गवताळ प्रदेशाला 'कंपोस' असे म्हणतात. ब्राझीलच्या आग्नेय किनारपट्टीवरील उष्ण कटिबंधात पानझडी अरण्ये आहेत.




**दक्षिण अमेरिका नैसर्गिक वनस्पती**

**दक्षिण अमेरिका 'गवताळी कुरणांचा देश'**

- व्हेनेंझुएलाचा लानोस (Lianos)
- ब्राझीलचा कंपोस (Compos)
- अर्जेंटिनाचा पंपोस (Pampos)

ग्रॅन चाको प्रदेशाचा दक्षिण भाग (अर्जेंटिना आणि ऊरुग्वे) आणि विस्तीर्ण अशा समशीतोष्ण कटिबंधातील गवताळी प्रदेशानी व्यापलेला आहे. यांना 'पंपोस' असे म्हणतात. अँडीज पर्वताच्या पूर्वेकडे पँटागोनियाचे पठार असून येथे खुरठ्या, काटेरी जातीच्या वनस्पती असून सम शीतोष्ण कटिबंधातील वाळवंटी प्रदेश आढळतो.


समशीतोष्ण कटिबंधातील गवताळ प्रदेश

मध्यवर्ती प्रदेशात मिश्र, विविध अरण्ये आहेत. समशीतोष्ण कटिबंधातील पानझडी अरण्ये येथे सुद्धा आहेत. तसेच पर्वतांच्या उतारावर सूचिपर्णी अरण्ये येथे आढळतात. मध्य चिली मध्ये भूमध्य सामुद्रिक हवामान आढळते. येथे सदाहरित अरण्ये आणि खुरटया वनस्पती आढळतात.

## 5. वन्य प्राणी

दक्षिण अमेरिकेत विविध प्रकारचे वन्य प्राणी, पक्षी आणि सरपटणारे प्राणी येथे आहेत. दक्षिण अमेरिका खंडाला 'पक्षांचा खंड' असे म्हणतात. कॅन्डर हा जगातील सर्वात मोठा पक्षी येथे असून आफ्रिकेतील ऑस्ट्रिचप्रमाणे ऱ्हीया हा न उडणारा एक मोठा पक्षी येथे आहे.

उडणारी माकडे, खार आणि माकडे हे प्राणी ॲमेझॉन नदी खोऱ्यातील अरण्यात राहतात. अजगर (ॲनाकोंडा) हा येथील पर्जन्य छायेतील अरण्यात असणारा सर्वातमोठा सरपटणारा प्राणी होय. प्योम आणि जाग्वार हे येथील विशाल प्राणी असून ते वानर आणि इतर लहान प्राण्यांचा आहार म्हणून उपयोग करतात. लामा आणि आल्पाक हे उंटासारखे प्राणी असून त्यांची मान लांब असते. स्थानिक लोक त्यांचा उपयोग आपल्या दैनंदिन कामासाठी करतात. गॉल्टगोस बेटे ही मोठया आकाराच्या कासवांसाठी प्रसिद्ध आहेत. तेथील माशा आणि किटक यांचा उपद्रव झोप उडवणारा आहे. ॲमेझॉन नदी विविध प्रकारच्या माशासाठी प्रसिद्ध आहे. येथे स्टींग, रे, एलेक्ट्रिक फिश आणि पिरान्ह (जगात सर्वात जास्त अपायकारी मासा) यासारखे मासे येथे आढळतात. येथील नद्यामध्ये मगरी आढळतात.



लामा



जाग्वार



गिधाड



ॲनाकोंडा



अल्पाक



प्युमा



कासव



पिरान्ह मासा



ऱ्हीया

## 6. शेती आणि पशुपालन

दक्षिण अमेरिकेत शेतीसाठी उपयुक्त जमीन कमी आहे. फक्त शे. 10% जमीनीच्या भागात शेती केली जाते. अर्जेंटिनाचा पंपोस आणि उरुग्वे, ब्राझीलचा उंचवटयाचा प्रदेश तसेच मध्य चिलीचा पूर्व किनार पट्टीचा प्रदेश हे शेतीसाठी उपयुक्त असलेले प्रदेश आहेत. मक्का, गहू, भात, कॉफी, कापूस, ऊस इ. येथील महत्त्वाची पिके आहेत.

मक्का हा दक्षिण अमेरिकेचे देशीय पीक असून ते उबदार उष्णकटिबंध प्रदेशातील अत्यंत प्रमुख आहार धान्य आहे. गव्हाचे उत्पादन अर्जेंटिना आणि चिली देशातील थंड समशीतोष्ण कटिबंधाच्या प्रदेशात घेतले जाते. अर्जेंटिना मधून सुद्धा गव्हाची निर्यात केली जाते. बटाटयाचे पीक अँडीजच्या विशाल प्रदेशात पिकवितात. ब्राझीलच्या किनारपट्टीच्या प्रदेशात भात पिकविले जाते.

ब्राझीलला 'जगाचे कॉफीचे पात्र' असे म्हणतात. आफ्रिकेतील इथीयोपिया देशातील 'कॉफा' प्रदेशात कॉफ हे पीक असून त्याला 'कॉफा' अथवा कॉफी असे म्हणत. ब्राझिलमध्ये हजारो कॉफीचे मळे आहेत. रियो डी जानिरो या बेटाला 'जगाचे कॉफीचे बंदर' असे म्हणतात.



कॉफी

आहार धान्य या व्यतिरिक्त, कॉफी आणि कोकच्या उत्पादनात दक्षिण अमेरिका हा प्रमुख खंड आहे. जगात सर्वात जास्त कॉफीचे उत्पादन ब्राझीलमध्ये केले जाते. कोलंबिया आणि इक्वेडार हे देश सुद्धा प्रामुख्याने कॉफी पिकवितात. ब्राझीलच्या किनारपट्टी प्रदेशात कोकचे मोठ्या प्रमाणात उत्पादन काढले जाते. कोलंबिया आणि इक्वेडार हे कोक उत्पादन करणारे इतर देश होत.



ऊस

अँडीज पर्वतांच्या उतारावरील प्रदेशात कापूस पिकविला जातो. तसेच इतर देशांना त्याची निर्यात केली जाते. दक्षिण अमेरिका हा ऊस उत्पादन करणारा प्रमुख खंड आहे. ब्राझील ऊस उत्पादन करणारा प्रमुख देश असून हा जगातील ऊस उत्पादन करणारा दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे.

पंपोस गवताळी प्रदेश पशुपालनास उपयुक्त ठरला आहे. पशुपालनामध्ये घोडे, डुक्कर, शेळी-मेंढी आणि गायी यांचा समावेश होतो. एकेकाळी अर्जेंटिना हा देश जगातील सर्वात जास्त पशुचे मांस निर्यात करणारा देश म्हणून प्रसिद्ध होता. गाईच्या मांसासाठी पंपोस हा गवताळी प्रदेश प्रसिद्ध आहे. उत्तम प्रतिचा हिरव्या गवताचा चारा असणारे प्रदेश डेअरी उत्पन्न मिळवून देण्याऱ्या प्राण्यासाठी, तसेच कमी प्रमाणात चारा मिळणारा पेटॅगोनियाचा मैदानी प्रदेश आणि पर्वतमय प्रदेश हे मेंढया पालनासाठी राखीव असतात.

येथील धनगरांना 'गौचोस' असे म्हटले जाते. ते मेंढी पालन करतात.



मेंढया पालन



गाई पालन

पॅसिफिक महासागराच्या किनारपट्टीचा शेवटचा भाग मासेमारीसाठी प्रसिद्ध आहे. पेरु आणि चिली देशांच्या किनारपट्टीच्या प्रदेशात प्रसिद्ध मासेमारी केंद्रे आहेत. बहुतेक माशांचा वापर आहारापेक्षा अधिक उद्योगधंद्यासाठी केला जातो. टिटिकाक सरोवर आणि ॲमेझॉन नदी ही गोडया पाण्यातील मासेमारीसाठी प्रसिद्ध आहेत.







मत्स्य पालन

## 7 लोकसंख्या

दक्षिण अमेरिकेतील रहिवाशी हे मिश्र वंशातील लोक आहेत. युरोपियन हे सोन्याच्या शोधात येथे आले. नंतर ते तेथेच स्थायिक झाले. त्यांनी तेथील मळ्यामध्ये काम करण्यासाठी कामगार म्हणून आफ्रिकनांना आणले. या वंशामध्ये एकमेकांशी विवाह होऊन मिश्र वंशाचे लोक जन्माला आले. दक्षिण अमेरिकेत प्रमुख तीन वंशाचे लोक राहतात.

दक्षिण अमेरिकेमध्ये सरासरी (शे. 47%) शहरीकरण झाले असून काही ठिकाणी अधिकाधिक (80%) पर्यंत पोहोचले आहे. सर्वाधिक लोकसंख्या उरुग्वे (93%) मध्ये आणि शहरातील कमी लोकसंख्या गयानामध्ये (36%) आहे.




दक्षिण अमेरिका लोकसंख्येची घनता

घनदाट अरण्यानी व्यापलेल्या ॲमेझॉन तसेच अँडीज पर्वत रांगा, ॲटकाम वाळवंटी प्रदेश आणि पेटेगोनिया सारख्या घनदाट अरण्यामध्ये अति विरळ लोकसंख्या आहे. ग्रास, चाको आणि गयानामधील उंचवटयाच्या प्रदेशामध्ये सुद्धा विरळ लोकसंख्या आढळते. बहुतेक लोकसंख्येचे प्रमाण मोठी शहरे आणि बंदरे येथे अधिक आहे. ब्योनस ऐरीश, रिओ-डी जानिरो, सापो, पालो इत्यादी शहरांमध्ये लोकसंख्येची घनता अधिक आहे.

दक्षिण अमेरिकेच्या किनारपट्टीच्या प्रदेशात लोकवस्ती दाट आहे. खंडाच्या मध्य भागात लोकवस्ती विरळ असल्याने त्याला कमी लोकसंख्येच्या प्रदेशाचा खंड असे म्हणतात.

दक्षिण अमेरिकेत जगाच्या सरासरी लोकसंख्येचे जनन प्रमाण (21/1000) येथे दाखल झाले आहे.परंतु मरण प्रमाण जगाच्या सरासरी प्रमाणापेक्षा (9/1000) कमी (6/1000) आहे. त्यामुळे दक्षिण अमेरिकेचे लोकसंख्या वाढीचे प्रमाण जगाच्या सरासरी प्रमाणापेक्षा अधिक आहे.

## नवीन शब्द

लॅटीन अमेरिका, रेड इंडियन्स, अँडीज, अग्नीमुख (ज्वालामुखी) गयाना, ओरिनोको, ॲमझॉन, लाप्लाटा, ग्रानचाको, गालपगोस, होर्नास, पारान, पॅराग्वे, उरुग्वे, टिटिकाक, शीतोष्ण , मेडिटरेनियन, सेल्वास, ल्याटेक्स, पिरान्ह, गौचोस, झोंबोस, पॅटागोनिया, अटकाम.

## अभ्यास

**I एक किंवा दोन वाक्यात उत्तरे लिहा.**

1) दक्षिण अमेरिका खंडातील लोकांना रेड इंडियन्स असे का म्हणतात?

2) दक्षिण अमेरिकेचे स्थान आणि विस्तार सांगा.

3) दक्षिण अमेरिकेतील सर्वात मोठा व लहान देश कोणता ?

4) दक्षिण अमेरिकेत आढळणारा जगातील सर्वात उंच धबधबा कोणता ? तो कोणत्या नदीमुळे तयार झाला आहे ?

5) दक्षिण अमेरिकेतील प्रमुख गवताळ प्रदेश कोणते ?

6) दक्षिण अमेरिकेतील प्रमुख वनस्पती आणि प्राण्यांची नावे सांगा.

7) दक्षिण अमेरिकेतील महत्वाच्या वंशाच्या गटांची नावे लिहा.

8) दक्षिण अमेरिकेतील दाट लोकवस्ती असणाऱ्या प्रमुख शहरांची नावे सांगा.

**कृती**

1 दक्षिण अमेरिका खंडाचा नकाशा काढून अॅट्लासच्या सहाय्याने देश आणि त्यांच्या राजधान्या, प्रमुख पर्वत, नद्या, सरोवरे, गवताळ प्रदेश नकाशात दाखवा.

2 दक्षिण अमेरिकेत आढळणाऱ्या प्रमुख वनस्पती, प्राणी आणि पक्षी यांची यादी करा व त्यांच्या चित्रांचा संग्रह करा.

☆ ☆ ☆